रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १८६ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

## आज मिनीडोअर चालकांचा मोर्चा

**रायगड :** आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी उद्या शुक्रवारी (दि. १२) सकाळी रायगड जिल्हा विक्रम-मिनीडोअर चालक मालक संघटनेचे अध्यक्ष विजयभाऊ पाटील यांच्या नेतृत्वाखाली अलिबागमध्ये धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. न्यायासाठी जिल्ह्यातील हजारो चालक रस्त्यावर उतरणार आहेत. त्याची तयारी अंतिम टप्प्यात असून, या मोर्चासाठी चालक व मालक सज्ज झाले आहेत. तीन चाकी, सहा आसनी मिनीडोअर वाहनांची सरसकट दोन वर्षे वयोमर्यादा वाढविण्यात यावी, चारचाकी सहा आसनी बीएस फोर मानांकीत बदली वाहनांकरिता इंधन म्हणून सीएनजीच्या वापरास मान्यता मिळावी, कोरोना काळात लागू झालेले सानुग्रह अनुदान विक्रम, मिनीडोअर मॅजिक पान २ वर

## जिल्हा परिषदांच्या निवडणुका अधांतरी

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा राखून निवडणुका घेण्याचे स्पष्ट आदेश दिले असल्याने २० जिल्हा परिषदा (ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, हिंगोली, नांदेड, अमरावती, अकोला, वाशीम, बुलडाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली आणि पंचायत समितीमध्ये ५० टक्क्यांच्या वर आरक्षण गेल्याने अहिल्यानगर, जालना, बीड या तीन जिल्हा परिषदा), तसेच ८८ पंचायत समित्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा पुढील निकाल येईपर्यंत निवडणुका न घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. याबाबत माहिती देताना राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, ५० टक्क्यांच्या पान २ वर

### वेधक

## अण्णा हजारेंचा उपोषणाचा इशारा

**मुंबई :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. त्यांनी यासंदर्भात थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना पत्र लिहिलं आहे. या पत्रामध्ये आपण लोकायुक्त विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे. अण्णा हजारे लोकायुक्त कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पुन्हा एकदा आमरण उपोषण करणार आहेत. ३० जानेवारी २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरामध्ये उपोषणाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, अण्णांनी उपोषणाचा इशारा दिल्यामुळे सरकारच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

## सिलिंडरचा स्फोट, बंद घराला आग

**नवीन पनवेल :** पंचशील नगर झोपडपट्टी नवीन पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या बंद घरात सिलिंडरचा स्फोट झाल्याने आग लागली. काही वेळातच ही आग पसरली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, अनेक दुचाकींचे नुकसान झाले. गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास पंचशीलनगर झोपडपट्टी रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या बंद घराला आग लागली. सिलिंडरचा स्फोट होऊन ही आग लागली असल्याचे बोलले जात आहे. या आगीत हाय व्होल्टेजची एक चालू लाईन तुटून घरावर पडली. तर, महावितरणची लाईन तुटून पडल्याने घराला आग लागली असल्याचे काही जण सांगत आहेत. त्यानंतर पान २ वर

## महाराष्ट्र-गुजरात सीमावाद चर्चेत

**मुंबई :** महाराष्ट्र-गुजरात सीमाभागात असलेला वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांच्या सीमेवर वेवजी, गिरगाव, गिमाणीया, झाई, संभा, अच्छाड या ग्रामपंचायतींच्या हद्दीवरील महाराष्ट्र-गुजरात राज्यांच्या सीमा निश्चित करण्याची मागणी होऊ लागली आहे. महाराष्ट्र राज्यातील तलासरी तालुक्यातील वेवजी व गुजरात राज्यातील उंबरगाव तालुक्यातील सोलसुंबा येथील हद्दीच्या भागात अतिक्रमण वाढून महाराष्ट्र व गुजरात राज्यात वादाचे प्रसंग वारंवार उद्भवत आहेत. त्यामुळे गावांची सीमा निश्चित करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. दरम्यान, सीमा मोजणीच्या हालचाली दोन्ही राज्यांकडून काल करण्यात आल्या. पान २ वर

# शिक्षकांना दणका!

## जिल्ह्यातील ९७० शिक्षकांचे एक दिवसाचे वेतन कापणार

## शाळा बंद आंदोलनात सहभाग; शिक्षण विभागाची कारवाई

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी पाच डिसेंबरला राज्यव्यापी शाळाबंद आंदोलन पुकारले होते. या आंदोलनात संपूर्ण महाराष्ट्रातून ९६ हजार ८०० शिक्षकांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील ९७० शिक्षक सहभागी झाले होते. त्यामुळे या शिक्षकांचे एक दिवसाचे वेतन कपात केले जाणार आहे. त्यांच्याविरोधात ही कारवाई केली जाणार असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

टीईटीमधील चुका दुरुस्त करणे, जुनी पेन्शन योजना सुरु करणे, अशैक्षणिक कामातून सुटका करणे, सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची अंमलबजावणी करणे, शिक्षकांना पदोन्नती देणे, अशा विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी पाच डिसेंबरला राज्यव्यापी संपाचा इशारा दिला होता. संपात सहभागी न होण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले होते. संपात सहभागी झाल्यास एक दिवसाचे वेतन कापले जाईल, असे आदेश काढले होते. मात्र, आदेशाकडे दुर्लक्ष करीत पाच डिसेंबरला राज्यातील असंख्य शिक्षकांनी या संपात सहभाग घेतला. प्राथमिक शिक्षकांसह माध्यमिक शाळेतील शिक्षकदेखील या संपात सहभागी झाले होते.



राज्यातून ९६ हजार ८०० शिक्षक संपात सामील झाले होते. आता या शिक्षकांवर मोठी कारवाई होणार आहे. त्यांच्या मासिक वेतनामधील एक दिवसाचे वेतन कापले जाणार आहे. रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमधील ९७० शिक्षकांचे एक दिवसांचे वेतन कापले जाणार आहे. त्यामुळे साधारणतः ३० लाखांहून अधिक रुपयांच्या वेतनाची कपात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून याबाबत गटविकास अधिकारी यांना आदेश देण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. वेतनाचे बिल तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. शासनाच्या आदेशानुसार ही प्रक्रिया राबविली जाणार असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहे.

### संपकरी शिक्षकांच्या भूमिकेवर लक्ष

**राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनात सहभागी होऊ नका, संपात सहभागी झाल्यास एक दिवसाचे वेतन कापले जाणार असल्याचा इशारा शिक्षण विभागाने आधीच दिला होता. तरीदेखील काही शिक्षकांनी संपात सहभाग घेतला. शिक्षक संपावर गेल्याने शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचा ठपका ठेवत त्यांच्याविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. या कारवाईबाबत शिक्षक काय भूमिका घेणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान, रायगड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांतील शिक्षकांनी त्यांच्या न्याय्य हक्कासाठी हा संप पुकारला होता. त्यांच्याविरोधात शिक्षण विभागाकडून कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. शासनाने शिक्षकांबाबत घेतलेला निर्णय स्थिर राहणार की रद्द करणार, याबाबत आता शासनच ठरविणार आहे. दरम्यान, शाळा बंद आंदोलनात जे शिक्षक सहभागी झाले होते, त्यांच्यावर कारवाई करण्यावर शिक्षण विभाग ठाम असून, वेतन कपात करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.**



> **रायगड जिल्ह्यातील ९७० शिक्षकांनी संपात सहभाग घेतला होता. या शिक्षकांचे एक दिवसांचे वेतन कापले जाणार आहे. गटशिक्षण अधिकारी यांना याबाबत सूचना केल्या आहेत. त्याची कार्यवाही लवकरच केली जाईल. – ललिता दहीतुले, शिक्षणाधिकारी**

# पोलीस अधीक्षक कार्यालयात करोडोंचा अपहार

## पोलीस पाटलांची बनावट नावे टाकून बिलं काढण्याचा प्रताप

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

पोलीस पाटील यांची बनावट नावे टाकून मानधनाच्या बिलात फेरफार करण्याचा प्रताप समोर आला आहे. यामध्ये पावणे दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयातील लेखा शाखेतील कनिष्ठ लिपिकांसह चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगड जिल्हा परिषदेतील करोडोरुपयांच्या भ्रष्टाचारानंतर आता पोलीस अधीक्षक कार्यालयातील लेखा विभागातील लिपिकाकडून भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजेश राम जाधव हे पोलीस अधीक्षक कार्यालयातील लेखा शाखा विभागात कनिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी २०२१ पासून ते आजतागायत जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची यादी बनवून त्यामध्ये प्रत्यक्ष हजर नसलेल्या पोलीस पाटलांची बनावट नावे टाकून बनावट देयक तयार केले. त्यानंतर पोलीस पाटील यांची दरमहा मानधनाची मंजुरी कोषागारातून प्राप्त करून घेतली. त्यानंतर पुन्हा या यादीमध्ये फेरफार करून दुसरी बनावट यादी तयार करून स्वतःच्या नावे ७२ लाख ३२ हजार ५०० रुपये, तसेच रिया राजेश जाधव या पोलीस पाटील नसताना त्यांच्या नावाचा मुदतवाढीचा खोटा दाखला बनवून पान २ वर




- **लेखा शाखा विभागातील कनिष्ठ लिपिकासह चौघांविरोधात गुन्हा दाखल**

## नशामुक्ती केंद्रातील मृत्यू संशयास्पद

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील नशामुक्ती केंद्रात एका २२ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मात्र, ही आत्महत्या नसून, संशयास्पद मृत्यू असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. त्यामुळे पोलीस या घटनेचा कशा पद्धतीने शोध घेतील याकडे लक्ष लागून राहिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सरण अनबू हरिजन असे या तरुणाचे नाव आहे. हा तरुण मुंबई येथील रहिवासी आहे. बुधवारी (दि.१०) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पान २ वर

## पेंढाबे सरपंचाच्या मुलाचा प्रताप

### निकृष्ट दर्जाचे काम; बांधकाम विभागाची कारवाई

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

चौल, वावे, बेलोशी येथील रस्त्यावरील संरक्षक भिंतीचा ठेका पेढांबेच्या सरपंचांचा मुलगा रोहित पाटील यांनी घेतला आहे. या संरक्षक भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप भाजपचे अलिबाग तालुकाध्यक्ष अशोक वारगे यांनी केला होता. यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दखल घेत पाहणी करून काम थांबविण्यास सांगितले आहे. निविदेतील अटी-शर्तीनुसार काम केले नसल्याचा ठपका त्यांच्याविरोधात कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी ठेवला आहे.



अलिबाग तालुक्यातील चौल, वावे, बेलोशी रस्त्याच्या बाजूला संरक्षक भिंतीचा पान २ वर

## कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या लढ्याला यश

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

महावितरण कंपनीमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचाऱ्यांनी लढा पुकारला होता. अखेर त्यांच्या लढ्याला यश आले आहे. या कर्मचाऱ्यांना औद्योगिक न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. त्यांना नियमित करण्याचे आदेश न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचारी आता नियमित होण्याच्या वाटेवर आहेत. पान २ वर



- **महावितरण कंपनीत होणार नियमित**
- **औद्योगिक न्यायालयाचा मोठा निर्णय**

> **महावितरणमध्ये २००६ पासून कंत्राटी कामगार म्हणून काम करीत होतो. कायम करण्यासाठी २०११ पासून आंदोलन सुरु होते. ठाणे येथील औद्योगिक न्यायालयात याबाबत सुनावणी झाली. यामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे दिलासा मिळाला आहे. – अमोल राणे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज कंत्राटी कामगार राष्ट्रवादी काँग्रेस (इंटक)**

## सिनारमाससाठी पर्यावरणाचा बळी!

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील शहापूर परिसरातील सुमारे ४००-५०० मीटर कांदळवनांची बेकायदेशीर कत्तल करून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशालाच सरळ आव्हान दिल्याचा आरोप, धेरंड शहापूरच्या पल्लवी पाटील यांनी केला आहे. तालुक्यात सिनारमास प्रकल्पासाठी पोहोच रस्ता तयार करण्याच्या नावाखाली हा विध्वंस उघडपणे करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.



- **कांदळवनांच्या बेकायदेशीर कत्तलीवर संताप व्यक्त**

यााप्रकरणी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना तात्काळ कारवाईची मागणी करणारे निवेदन सादर केले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनादेखील निवेदन दिले आहे. पान २ वर

## केंद्रीय कृषीमंत्र्यांविरोधात अविश्वास ठराव

**नवी दिल्ली :** शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्य सरकारने केंद्राला प्रस्तावच पाठवला नसल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. १४ लाख हेक्टरवर नुकसान झालं असताना केंद्राला मात्र १.१० लाख हेक्टरचाच आकडा देण्यात आला. त्यावरुन आता खा. ओमराजे निंबाळकर यांनी केंद्रीय कृषीमंत्र्यांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. कृषीमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचं ओमराजे यांनी म्हटलं आहे.




### अलिबाग, रोहा, मुरुड तालुक्यात कृषी भवन उभारा | आ. बाबासाहेब देशमुखांची मागणी

# शेतकऱ्यांसाठी शेकाप आक्रमक

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते. अलिबाग, रोहा व मुरूड तालुक्यासह अनेक तालुक्यात शेतकरी प्रगतशील आहेत. त्यामुळे विविध योजनांसाठी येथील शेतकऱ्यांना कृषी भवनाची आवश्यकता आहे, ही बाब शेकापचे आ. बाबासाहेब देशमुख यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. अलिबाग, रोहा व मुरूड तालुक्यासाठी कृषी भवन मंजूर करून भवनाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी अधिवेशात त्यांनी केली. तसेच सांगोला, पंढरपूर येथेही कृषी भवन उभारण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे



त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी नेहमीच रस्त्यावरची असो वा विधिमंडळातील लढाईसाठी आक्रमक असणाऱ्या शेकापची पुन्हा एकदा अधिवेशनात प्रचिती आली.



रायगड जिल्ह्यामध्ये ९३ हजार हेक्टरपेक्षा अधिक भातशेतीचे क्षेत्र आहे. भात पिकांसह आंबा तसेच कडधान्याची लागवड रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. नवनवीन प्रयोग शेतकरी करतात. मात्र, जिल्ह्यामध्ये कृषी भवन नसल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेता येत नाही. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रोहा व मुरूड तालुक्यांसह अनेक तालुक्यात प्रगतशील शेतकरी असून, उत्पादन वाढीसाठी त्यांचे योगदान कायमच महत्त्वपूर्ण राहिले आहे. पान २ वर

### शासकीय निवासी इमारतीची मागणी

अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे मुख्यालय आहे. तालुक्यातील महूसल विभागांतर्गत विविध शासकीय कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारतीची सोय नाही. निवासी उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व इतर कर्मचारी यांच्यासाठी निवासी इमारत बांधण्यात यावी. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवासी इमारतीची गरज आहे. सांगोला येथे शासकिय जमीन उपलब्ध आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार व इतर कर्मचारी यांच्यासाठी निवासी इमारतीचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी आ. बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे.

**पान १ वरून**

## जिल्हा परिषदांच्या निवडणुका अधांतरी

वर जिथे आरक्षण गेले आहे त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरच निवडणुका घेतल्या जाणार आहेत. नागपूर आणि चंद्रपूर या महानगरपालिकांत ५० टक्क्यांच्या वर आरक्षण असले तरी या दोन ठिकाणी निवडणूक वाढीव आरक्षणासह घेता येईल, असे न्यायालयाच्या निर्णयात स्पष्ट आहे. त्यामुळे सर्व महापालिका निवडणुका एकत्रित घेतल्या जाणार आहेत. शिवाय, ही निवडणूक न्यायालयीन निर्णयाच्या अधिन असणार असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. राज्य निवडणूक आयोग १२ जिल्हा परिषदांमध्येच लवकरच निवडणुका घेणार असल्याची माहिती वाघमारे यांनी दिली. पन्नास टक्क्यांच्या आत जिथे आरक्षण आहे, त्याच ठिकाणच्या निवडणुका घेतल्या जातील. जिथे ५० टक्के आरक्षणाची टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे, त्यासाठी इतक्यात नव्याने आरक्षणाची सोडत न काढता न्यायालयाच्या पुढील निर्णयाची वाट पाहिली जाईल, असे वाघमारे यांनी स्पष्ट केले.आरक्षण मर्यादेत असणाऱ्या १२ जिल्हा परिषदांमध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्हा परिषदांचा समावेश आहे. तसेच या जिल्ह्यांमधील १२५ पंचायत समित्यांचा समावेश आहे.

## ... करोडोंचा अपहार

त्यांच्या नावाने एक कोटी पाच लाख ९६ हजार रुपयांची रक्कम कोषागारातून काढली. एकूण एक कोटी ७८ लाख २९ हजार ३०० रुपयांचा अपहार करण्यात आल्याचे उघड झाले आहे. स्वतःच्या व इतर अशासकीय व्यक्तींच्या बँक खात्यात घेऊन शासकीय रकमेचा स्वतःच्या फायद्यासाठी अपहार केला. इतर काही पोलीस पाटील यांच्या नावे दुबारपेक्षा अधिक वेळा त्यांच्या खात्यावर मानधनाची रक्कम टाकण्यात आली आहे. याप्रकरणी राजेश जाधव, रिया जाधव व इतर दोन अशा एकूण चौघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नशामुक्ती केंद्रातील मृत्यू संशयास्पद

त्याने केंद्रातील स्टोअर रुममध्ये पंख्याला दोरीने लटकून गळफास घेतला. ही बाब तेथील मंडळींच्या लक्षात आल्यावर त्याला अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, अपघात विभागातील डॉक्टरांनी तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घोषित केले. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि.११) अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या तरुणाचा मृत्यू संशयास्पद असल्याची चर्चा परहूरपाडा परिसरात सुरु आहे. या तरुणाला बाहेर ठेवण्यात आले होते. त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे. हे प्रकरण दाबण्यासाठी गळफास घेतल्याचे चित्र दाखविण्यात आल्याची चर्चा सुरु आहे.

## कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या लढ्याला यश

महावितरण कंपनीमध्ये अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. संपूर्ण राज्यामध्ये दोन हजार २७४ हून अधिक कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यात रायगड जिल्ह्यात ६४ हून अधिक कर्मचारी आहेत. हे कर्मचारी बाह्यस्त्रोत विभागात कार्यरत आहे. विद्युत खांबावर चढणे, तारा बदलणे, वीजपुरवठा सुरळीत करणे, वीज बिल भरण्यासाठी ग्राहकांना आवाहन करणे, अशी अनेक प्रकारची कामे करतात. गेल्या अनेक वर्षांपासून हे कर्मचारी काम करीत आहेत. या कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात यावे, यासाठी ते गेल्या १३ वर्षांपासून लढा देत होते. मुंबईतील महावितरण कार्यालयाबरोबरच आझाद मैदानात तीव्र आंदोलन करण्यात आले होते. अखेर न्यायासाठी औद्योगिक न्यायालयात धाव घेण्यात आली. ॲड. गायकवाड आणि ॲड. स्मिता पाराठकर यांनी न्यायालयासमोर योग्य बाजू मांडली. केलेला युक्तीवाद सादर, केलेले पुरावे ग्राह्य धरून औद्योगिक न्यायालयाने कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच नोकरीत लागल्यापासून २४० दिवस पूर्ण झालेल्या दिवसांपासून वेतनश्रेणी, पगार फरक लागू, पदोन्नती हा आदेश महावितरणने सहा महिन्यात अंमलात आणावा, अंमलबजावणी न झाल्यास २८ सप्टेंबर २०१२ पासून देणी प्रलंबित राहिलेल्या रकमेस वार्षिक पाच टक्के व्याज आकारणीचे आदेश दिले आहेत. राज्यासह रायगड जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना या निर्णयाने दिलासा मिळाला आहे.

## सिनारमाससाठी पर्यावरणाचा बळी

पल्लवी पाटील यांनी म्हटले आहे की, शहापूर औद्योगिक क्षेत्राला २००६ पासूनच स्थानिक शेतकरी तीव्र विरोध करीत आहेत. त्या काळात रिलायन्स व टाटा पॉवरचे प्रकल्पही लोकविरोधामुळे थांबले होते. तरीही स्थानिकांची मतं, आक्षेप आणि विश्वास पूर्णपणे बाजूला सारून एमआयडीसी सिनारमास हा नवा प्रकल्प रेटत आहे. यासाठी आवश्यक रस्ता तयार करण्याच्या कामात कायदा, शासन निर्देश आणि पर्यावरणीय नियमांकडे संपूर्ण दुर्लक्ष करून मोठ्या प्रमाणावर कांदळवनांची कत्तल करण्यात आली. सदरची घटना १५ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली आहे.

सर्वे नंबर ५९६/अ मध्ये झालेला हा विध्वंस स्थानिकांच्या निदर्शनास आल्यानंतर शेतकऱ्यांनी पोलिसांकडे धाव घेतली, मात्र पोयनाड पोलीस ठाण्याने लेखी तक्रार घेण्यास नकार दिल्याचा तसेच वनविभागाकडेदेखील तक्रार दाखल करूनही अद्यापही त्याच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. हा प्रकार कायद्याच्या राज्यालाच काळिमा फासणारा असून, प्रशासनाने जाणूनबुजून लोकांचा विरोध दाबल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

कांदळवन हे सर्वोच्च न्यायालयाने संरक्षित क्षेत्र जाहीर केले असून, त्यांचे संरक्षण करणे ही राज्य यंत्रणेची कायदेशीर जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत एमआयडीसीने ''आम्हीच कायदा'' या भूमिकेत राहात पर्यावरणाचा उघड विध्वंस केल्याने स्थानिक परिसंस्थेला अपरिवर्तनीय हानी झाली असल्याचे पल्लवी पाटील यांनी नमूद केले आहे. या संदर्भात न्याय मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर आम्हाला थेट जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याकडे न्याय मागण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे चार प्रमुख मागण्या केल्या आहेत. एमआयडीसी अधिकारी व कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करणे, नुकसान झालेल्या कांदळवनांचा वैज्ञानिक पंचनामा करून पर्यावरणीय हानीचा अहवाल जाहीर करणे, शेतकऱ्यांची तक्रार न घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत कंपनीच्या कामांना स्थगिती देणे या मागण्यांचा समावेश आहे.

दरम्यान, कंदवण्याची तोड झाल्याबाबतची तक्रार माझ्याकडे करण्यासाठी शेतकरी आलेले नव्हते त्यांनी फक्त तलावामध्ये कचरा, राख टाकल्या बाबतची तक्रार दिली आहे, असे पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय देशमुख यांनी स्पष्ट केले. आम्ही जनतेच्या सेवेसाठी इथे बसलेला आहोत त्यांच्या तक्रारी घेणे हे आमचे कामच आहे, असे पल्लवी पाटील यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या हक्कांवर आणि पर्यावरणावर असा खुलेआम आघात होत असेल तर आम्ही शांत बसणार नाही. दोषींवर कठोर कारवाई झाल्याशिवाय न्याय मिळणार नाही. यासाठी न्यायालयीन लढाई लढण्यास आम्ही तयार आहोत, असे पल्लवी पाटील यांनी सांगितले.

## आज मिनीडोअर चालकांचा मोर्चा

इको या मीटर टॅक्सी परवानाधारकांना मिळावे, व्यवसाय कराचा भरणा करण्यासाठी दंड व व्याज न आकारता सूट मिळावी. इको टॅक्सीला नवीन डिव्हाईस बसविण्यासाठी अतिरिक्त खर्च होत आहे. ही तांत्रिक लूट थांबविण्यात यावी. ऑनलाईन टॅक्सी परमीट बंद करावे. १५ वर्षांवरील मिनीडोअर पासिंग साडेचार हजार रुपयांवरून नऊ हजार रुपये इतकी करण्यात आली आहे, ती रद्द करण्यात यावी, अशा अनेक मागण्यांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून मिनीडोअर चालक मालक लढा देत आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली होती. मागण्यांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याची कार्यवाही झाली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या चालक व मालकांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत जिल्हा स्तरावर बैठका झाल्या. या बैठकीच्या माध्यमातून मोर्चाची तयारी करण्यात आली आहे. हा लढा तीव्र स्वरुपाचा असून, न्याय मिळेपर्यंत राहणार आहे, असे विजयभाऊ पाटील यांनी सांगितले.

## पेंढाबे सरपंचाच्या मुलाचा प्रताप

ठेका रोहित पाटील या ठेकेदाराला देण्यात आला होता. २९ मार्च २०२५ मध्ये कार्यारंभ आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आला. या संरक्षक भिंतीचे काम करण्यासाठी निविदेप्रमाणे एम.२० ग्रेडची ठोस भराई करणे अपेक्षित होते. परंतु, याबाबत उपविभागातील कोणत्याही क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पूर्वकल्पना न देता मोठे दगड टाकून ठोस भराईचे काम केले जात होते. निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे भाजपचे तालुका अध्यक्ष अशोक वारगे यांच्या ही बाब लक्षात आली. याबाबत त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांच्याकडे लेखी तक्रार केली. या तक्रारीची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कामाची पाहणी केली. त्यावेळी काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून आले. त्यामुळे हे काम तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, चुकीच्या पद्धतीने काम केल्याचा ठपका कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी ठेवला आहे. रोहित पाटील यांनी ज्या ज्या ठिकाणी कामे केली आहेत, त्या कामांची चौकशी करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

## सिलिंडरचा स्फोट, बंद घराला आग

मोठ्या प्रमाणात आग भडकली. यावेळी नवीन पनवेल अग्निशामक दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी ही लाईन बंद केली. या आगीमध्ये घराच्या मागच्या बाजूला असलेल्या दुचाकी पार्किंगमधील जवळपास दहा ते बारा वाहनांचे नुकसान झाले. अग्निशामक दलाने काही तासांनंतर या आगीवर नियंत्रण मिळवले. दोन जेसीबीच्या सहाय्याने विझवलेले साहित्य बाजूला करण्यात आले. मात्र, या आगीमुळे मोठ्या प्रमाणात नवीन पनवेल परिसरात वाहतूक कोंडी झाली होती.

## महाराष्ट्र-गुजरात सीमावाद चर्चेत

यामध्ये पालघर जिल्ह्यातील तलासरी तहसीलदार आणि गुजरात राज्यातील उंबरगाव तहसीलदार यांच्या उपस्थितीत मोजणी करण्यात आली असं सांगण्यात येते. मात्र, स्थानिक उपसरपंच आणि नागरिकांनी या मोजणीवर आक्षेप घेत हे मोजणी स्थगित करण्यात आल्याचा सांगितलं आहे. महाराष्ट्राच्या सीमेलगत वेवजी येथे गुजरातमधील नागरिकांनी घुसखोरी केल्याने महाराष्ट्र-गुजरात सीमा वाद सतत उफाळून येत आहे. महाराष्ट्र आणि गुजरात राज्याचा पालघर जिल्ह्याच्या हद्दीत सुरू असलेला हा सीमावाद लवकरात लवकर मिटवण्यासाठी प्रशासनाने गंभीर पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

## शेतकऱ्यांसाठी शेकाप आक्रमक

देशमुख यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच राज्यातील विविध ठिकाणी कृषी विभागांतर्गत व इतर संबंधित कामे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सांगोला, पंढरपूर तालुके हे कृषीप्रधान आहेत. या ठिकाणी शेतकऱ्यांना कामासाठी कृषी भवनची आवश्यकता आहे. सांगोला व पंढरपूर तालुक्यासाठी कृषी भवन मंजूर करून भवनाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याची कार्यवाही शासनाने करावी, अशी मागणीदेखील त्यांनी केली.

**सहकार संकुल उभारण्याची मागणी**

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सहकार वाढत आहे. जिल्ह्यातील जिल्हा बँकेबरोबरच विविध कार्यकारी संस्था, सहकारी दूध संघ हे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेशी जोडणाऱ्या वाहिन्या आहेत. विविध संस्थांचे लेखा परीक्षण, सहकार न्यायालय, विभागीय सहनिबंधक कार्यालय, जिल्हा सहनिबंधक, उपसहनिबंधक, या सहकार क्षेत्रातील कार्यालयांशी अनेक दैनंदिन कामे होत असतात. सांगोल्यातही मोठ्या प्रमाणात सहकार क्षेत्र कार्यरत आहे. यासाठी सहकार क्षेत्रातील सर्व विभाग एकाच ठिकाणी असावेत, अशी मागणी येथील नागरिकांची आहे. त्यामुळे रायगडसह सांगोल्यामध्ये सहकार संकुलची इमारत उभारण्यात यावी, अशी मागणी शेकाप आ. देशमुख यांनी केली.

---

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे काळिजे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. ७१, एकूण क्षेत्र ००-४८-७० हे.आर. चौ.मी., आकार - ५.६०/- या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजित बळीराम शिर्के व ८, रा. मु. काळीजे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२११० यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची बोलणी केली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमिन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधीत सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी मिळवून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती. अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. ११/१२/२०२५
कार्यालयीन पत्ता,
रा. कसबा पेठ, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सही/-
**ॲड. गोदावरी सुरेश करडे.**
B.Sc. LL.M
खरेदीदाराचे वकील
९३७०२६८५५८

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकतीपैकी निरतंर वहिवाटीच्या करारनाम्याकरिता त्या मिळकतीचे विद्यमान मालक १ जयवंत रामदास साळुंके, २ रमेश रामदास साळुंके, ३ चंद्रकांत रामदास साळुंके, ४ उज्वला अंबाजी पुगांवकर यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चिंचवली, ता.अलिबाग | १८/३/अ | ०-३०-६० पो. ख ०-०५-१० एकुण क्षेत्र ०-३५-७० | ८.६२ |
| | १८/३/ब | ०-३६-४० पो.ख ०-०७-१० एकुण क्षेत्र ०-४३-५० | १०.१७ |

वर नमुद मिळकतींपैकी अंदाजे क्षेत्र ०-१५-०० हे. आर एवढे क्षेत्र निरंतर वहिवाटीच्या करारनाम्याचा विषय आहे.

दिनांक - १२/१२/२०२५

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडुन कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहु जमिनी या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबेकब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे / हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री.नारायण बापु तळपे | ६५/२/अ | ०.३५.०० | ५.४५ |
| श्री.नामदेव तुकाराम लदगे इतर ९ | ६५/४ | ०.१३.९० | २.१९ |
| श्री.दामु रावजी कराळे | ६५/५ | ०.१३.९० | २.१८ |
| श्री. रत्नाकर काशिनाथ तळपे इतर ७ | ६६/२ | ०.२९.१० | ५.४४ |
| श्री. नारायण बापु तळपे | ६६/३ | ०.४५.०० | ५.५६ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. योगेश तानाजी आगज**
बी.ए.एलएल.बी.
पत्ता :- फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी, मुद्रे, कर्जत, जिल्हा-रायगड - ४१० २०१
मो. नं. ७२७६८१७८९०

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
### केंद्र कार्यालय अलिबाग
### निविदा सूचना

बँकेची बोर्लीपंचतन शाखेकरीता मु.पो. बोर्लीपंचतन, माऊली हॉस्पिटल जवळ मार्केट रोड, ता. श्रीवर्धन येथे कार्यालयीन कामकाजाकरीता श्री. संग्राम सदानंद खेऊर यांच्या मालकीच्या जागेत भाड्याने घेण्याचे आलेल्या जागेमध्ये कौन्टर फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

१) सिव्हील वर्क
२) ॲल्युमिनिअम विंडो
३) फर्निचर
४) POP पेंटींग फॉल सिलिंग
५) इलेक्ट्रीकल वर्क
६) नेमबोर्ड
७) इलेक्ट्रीकल फिक्चर
८) प्लंबिंग वर्क
९) वॉटर प्रुफिंग, पेस्ट कंट्रोल
१०) पीव्हीसी फ्लोअरींग
११) कलर इनामिल
१२) वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे

त्याकरीता खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक १९.१२.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

दिनांक : १२.१२.२०२५ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/३ | एकूण क्षेत्र १-१६-०० हे.आर. | ०.४७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- १२/१२/२०२५ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे ओवे, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३६५/२ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर. | ३.६२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :- १२/१२/२०२५ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे सोगांव, ता.अलिबाग जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २७४ या शेतजमिन मिळकतीपैकी ०-९७-०० (हे.आर.) शेतजमिन मिळकत खैरूद्दीन अब्बास कूर, वगैरे, राहणार सोगाव, ता.अलिबाग जि.रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिहकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील खैरूद्दीन अब्बास कूर, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करून, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण,दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| सोगांव ता.अलिबाग | २७४ | २-४९-५० एकूण | २९-९७ |

वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीमधील खैरूद्दीन अब्बास कूर, वगैरे यांच्या मालकी हक्काची ०-९७-०० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ११/१२/२०२५

सही/-
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

दिनांक: ११/१२/२०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर २१३/१, क्षेत्र ०-६७-७० हे. आर., पो.ख. ०-११-१० हे.आर., एकुण क्षेत्र ०-७८-८० हे. आर., आकार ११.१५ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१२-०० हे. आर. पो.ख. ०-०१-८० हे. आर., एकुण क्षेत्र ०-१३-८० हे.आर. आकार १.९८ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक अमित रामचंद्र भगत व सुरेखा रामचंद्र भगत रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ११/१२/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे इंद्रपै, ता. अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गणेश कृष्णा भगत यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| इंद्रपै | १०/१ | ०-१६-५० पो.ख. ०-०२-३० ०-१८-८० | ३.४३ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १२/१२/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, प्रमिला हरिभाऊ ठाकूर, सागर हरिभाऊ ठाकूर, सतिश हरिभाऊ ठाकूर, रा. पाटणी पांडापुर, पो. कासू, ता.पेण,जि. रायगड हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी पाटणी पांडापुर ता.पेण, जि.रायगड येथे असून आम्ही दोघे दर्शन देविदास पाटील आणि मेघा मिलिंद कोठेकर विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | सर्व्हे नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर | प्रमिला हरिभाऊ ठाकूर व इतर दोन | ६७/२/ब | ०.३१.४० | ४.७५ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत आम्ही स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून आमची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आम्ही स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक : १२/१२/२०२५

**दर्शन देविदास पाटील**
मु.पो. डोलवी वरचा पाडा,
ता.पेण, जि.रायगड,
फोन नंबर ९०२८२७६२३१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडुन कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहु जमिनी या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे / हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री.किसन हिरू लदगे इतर ५ | ५०/१ | ०.३६.९० | ६.८७ |
| श्री. रत्नाकर काशिनाथ तळपे इतर ७ | ५१/१ | ०.९७.५० | १५.६९ |
| श्री. प्रदिप ज्ञानेश्वर तळपे इतर ४ | ५१/२ | ०.५४.०० | ९.२५ |
| सौ. लक्ष्मी हरिचंद्र लदगे इतर ३ | ६४/३ | ०.१९.०० | ३.७५ |
| श्री. रामचंद्र बापु लदगे इतर १४ | ६४/४ | ०.३५.५० | ६.५७ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. योगेश तानाजी आगज**
बी.ए.एलएल. बी.
पत्ता :- फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी, मुद्रे, कर्जत, जिल्हा-रायगड-४१०२०१
मो. नं. ७२७६८१७८९०

### कर्जत येथील मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज १८२/२०२५
निशाणी नं.
ने. ता.१५/०१/२०२६
ॲड. नरेश मारूती बैलमारे

### जाहीर नोटीस

१) शालन बबन जुन्नरकर
वय ५७ वर्षे, रा. कोंदिवडे,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१. अर्जदार नं. १
२) राकेश बबन जुन्नरकर
वय ३७ वर्षे, रा. ब्राम्हण आळी, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१. अर्जदार नं. २
२) रीतेश बबन जुन्नरकर
वय ३० वर्षे, रा. ब्राम्हण आळी, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१. अर्जदार नं. ३

ज्याअर्थी, अर्जदार कर्जत येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १८२/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जामधील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै.श्री.बबन महादेव कासार (जुन्नरकर) हे दिनांक २७/१०/२०२० रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असले बाबत दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, कै. श्री.बबन महादेव कासार (जुन्नरकर) यांच्या वारसांबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह या मे. न्यायालयांत दाखल करावी. अन्यथा सदरील अर्जदार हेच कै. श्री.बबन महादेव कासार (जुन्नरकर) यांचे कायदेशिर वारस आहेत, असे समजून सदरील अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर, कर्जत.**

**शिक्का**

सही/-
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर, कर्जत.**

## निवडक

### मोडी लिपी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा



**मुंबई :** श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवायांच्या संयुक्त विद्यमाने शवोत्सव - २०२६ निमित्त मोडी लिपी राज्यस्तरीय निबंधस्पर्धाआयोजित करण्यात आली असून,निबंध लेखनाचे विषयपुढील प्रमाणे आहेत.शिवरायांचे दुर्गविज्ञान, आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज, शिवरायांची युद्धनीती,हिंदूधर्मरक्षक शिवराय, शिवरायांचे बालपण असे आहेत. मोडी लिपीतील निबंधाचे देवनागरीतील लिप्यंतर देखील ठवावे. https://forms.gle/mCj1XriJ1BsWHScR6गूगलफॉर्म मध्ये निबंध उपलोड करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी पंकज भोसले ९८२१००९१३७ किंवा अमित घाटये ९८३३६९१८५६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे.



### वैजनाथ येथे बापुजी महाराजांचा पालखी सोहळा भक्तीभावाने साजरा

**खांब :** रोहा तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या सुप्रसिद्ध घेरासूरगडाच्या पायथ्याशी वसलेल्या श्री. क्षेत्र वैजनाथ येथे ग्रामदैवत श्री. बापुजी महाराजांचा पालखी सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. वैजनाथ ग्रामस्थांच्या श्रद्धा, भक्ती आणि विश्वासाचे प्रतिक असलेल्या श्री.बापुजी महाराज मंदिराचा वर्धापनदिन सोहा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्धापनदिन सोहळ्याच्या निमित्ताने देवतांना अभिषेक व पूजाविधी, श्री.सत्यनारायणाची महापूजा, महाआरती, सामुदायिक हरिपाठ, हरि किर्तन, जागर भजन व बापुजी महाराजांची पालखी मिरवणूक आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांसाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी करून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.तर सर्व कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच नवतरुण मित्र मंडळ व एकता मित्र मंडळ वैजनाथचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी अपार मेहनत घेऊन मोलाचे सहकार्य केले.



### पनवेलकरांना वेध नाताळचा

**कर्जत :** ख्रिश्चन बांधवांचा पवित्र सण नाताळ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, येत्या २५ डिसेंबरला सगळीकडे आनंदाचे वातावरण लाभणार आहे. स्वर्गातून येणारा देवदूत म्हणून ओळखला जाणारा सांता क्लॉज लहानग्यांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना भेटवस्तू देऊन आनंद पसरवतो, अशी श्रद्धा आहे. नाताळची चाहूल लागताच बाजारांत विविध रूपातील आकर्षक सांता क्लॉजची पोस्टर्स, कटआउट्स आणि सजावटीचे साहित्य दिसू लागले असून दुकाने लाल-पांढऱ्या उत्सवी रंगांनी खुलू लागली आहेत.

### शिवबावनी सादरीकरण २०२६ स्पर्धा

**मुंबई :** शिवबावनी म्हणजे कवी भूषण यांनी रचलेली ५२ छंदांची (ओळींची)कविता, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि हिंदू धर्माच्या रक्षणाचे तेजस्वी वर्णन आहे; ही कविता ब्रज भाषेत असून ती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या सैन्याच्या पराक्रमाची कल्पना देते, थोडक्यात, शिवबावनी हे शिवाजीमहाराजांच्या गौरवाचे आणि




त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करणारे एक वीर रसपूर्ण काव्य आहे.श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवबावनी सादरीकरण स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली असून, ही स्पर्धा ऑनलाइनस्वरुपात घेण्यात येईल.प्रवेशिका व सादरीकरण व्हिडीओ पाठवण्यासाठी https://forms.gle/UvJbCHppaNHtgrRR9 संकेत स्थळावर जावे. विजेत्या स्पर्धकांनाएका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यातयेणार आहे. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी पंकज भोसले - ९८२१००९१३७ सुलभा कोरडे - ८०९७३२६६९९ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे.

### करीयर गाईडन्स मार्गदर्शन शिबीर

**आगरदांडा :** उच्च शिक्षणाची जोड मिळाली तर ज्ञानाची क्षितिजे विस्तारतात. परंतु आधी ध्येय निश्चित केले पाहिजे. सातत्य आणि मेहनतीची साथ मिळाली की यश हमखास मिळते. तेंव्हा विद्यार्थ्यांनी भरपूर परिश्रम घ्यावेत. ध्येय निश्चित केल्याशिवाय संधीचे दरवाजे उघडत नाहीत असे महत्वपूर्ण प्रतिपादन कत्तार स्थित उद्योजक डॉ. सनाउल्लाह घरटकर यांनी केले. मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात डॉ. घरटकर फाउंडेशन तर्फे आयोजित करीयर गाईडन्स मार्गदर्शन शिबीरात विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. सनाउल्लाह घरटकर, फांऊडेशनचे अध्यक्ष राशीद फहीम, विश्वस्त शाहिद कलाब, नांदगाव पंचक्रोशी हायस्कूलचे चेअरमन इरफान हलडे, संजीवनी आरोग्य संस्थेचे विभाग प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे, कार्याध्यक्ष विजय सुर्वे, कीर्ती शहा, समुपदेशक वैशाली बोबडे वैद्य (पुणे), अहसान सैय्यद (जळगाव) सईदा कारबारी (मुरुड) आदी मान्यवर उपस्थित होते.

# गेलने जपली सामाजिक बांधिलकी

## खानाव परिसरात विकासाची गंगा; अनुप गुप्ता यांच्या हस्ते उद्घाटन





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

उसर येथील गेल (इंडिया) कंपनीने सामाजिक बांधिलकी जपली आहे. कंपनीच्या माध्यमातून करोडो रुपये खर्च करून खानाव परिसरात विकास कामांचा झपाटा सुरू करण्यात आला आहे. पेव्हर ब्लॉकचे रस्ते, उसर येथील प्राथमिक शाळा सुशोभीकरण, उसर, मुळखानाव, कुणे, वेलवली, भेरसे, वेलतवाडी, भादाणे व वनवली या गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा करण्यासाठी सोलार पॅनल बसविण्यात आले आहे. या कामांचा उद्घाटन समारंभ कंपनीचे कार्यकारी निदेशक तथा प्रभारी अधिकारी अनुप गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी गेल (इंडिया) लिमिटेड, उसर कंपनीचे मानव संसाधन विभागाचे महाप्रबंधक जितिन सक्सेना अन्य वरिष्ठ अधिकारी तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायतीचे सदस्य,वेलवली व आसपासचे गावांतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

गेल (इंडिया) लिमिटेड कंपनी आपल्या कॉर्पोरेट पर्यावरण दायित्वाच्या (सीईआर) अंतर्गत विविध उपक्रमांद्वारे नेहमी शाश्वत विकासाला चालना देते. अशाप्राकरे गेल (इंडिया) लिमिटेड कंपनीने रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील उसर येथे प्रोपेन डिहायड्रोजेनेशन पॉलीप्रोपायलीन (पीडीएच-पीपी) प्रकल्पांतर्गत प्रकल्पाच्या परिसरातील आसपासचे गावांच्या विकासासाठी कॉर्पोरेट पर्यावरण दायित्वाच्या (सीईआर) अंतर्गत अनेक सार्वजनिक विकासात्मक कामे हाती घेतली आहेत. सीईआर योजनेचे अंतर्गत करण्यात येणारी कामे परिसरातील स्थानिक ग्रामपंचायतींच्याद्वारे आणि रायगड जिल्हा परिषदेचे नियंत्रणामार्फत केली जात आहेत. ज्यामध्ये पिण्याचे पाण्यासाठी आरओ प्लांटची व्यवस्था,पाणी साठवणुकीच्या टाक्या, सौरपथ दिवे, शाळा - अंगणवाड्यांचे सुशोभिकरण आणि डिजिटलाझेशन, तलावाचे बांधकाम, बस स्टॉपचे बांधकाम, उंच प्रकाशस्तंभ असलेली लाईट, इत्यादी पायाभूत सुविधांचा समावेश असल्यामुळे अशा विकास कामांचा लाभ संबंधित गावांत राहत असणाऱ्या तळागाळातील सर्व लोकांना निरंतरपणे मिळावा असा गेल कंपनीचा मुख्य उद्देश आहे. गेल कंपनीचे सीईआर योजनेचे अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांच्या आदेशानुसार गेल - उसर प्रकल्पाच्या परिसरातील ग्रामपंचायती व अन्य संस्थांमार्फत आजपर्यंत रु.१४.०२ कोटींची विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी आजपर्यंत रु.३.७३ कोटींची कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित सार्वजनिक विकासात्मक कामे चालू असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

सद्यस्थितीत खानाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये गेल कंपनीचे सीईआर फंडातून पेव्हर ब्लॉक रस्त्यांसाठी ३५ लाख रुपये, प्राथामिक शाळा,उसरच्या सुशोभिकरणासाठी १० लाख रुपये, आणि उसर, मुळखानाव, कुणे, वेलवली, भेरसे, वेलतवाडी, भादाणे व वनवली या गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा करणेसाठी सोलार पॅनलकरिताएकूण ४० लाख रुये इतक्या रकमेची कामे पूर्ण झालेली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उसर, मुळखानाव, कुणे, वेलवली, भेरसे, वेलतवाडी, भादाणे व वनवली या गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा करण्यासाठी सोलर पॅनलचे उद्घाटन मंगळवारी (दि.९) गेल (इंडिया) लिमिटेड, उसर कंपनीचे कार्यकारी निदेशक तथा प्रभारी अधिकारी अनुप गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याप्रसंगी गेल कंपनीचे कार्यकारी निदेशक अनुप गुप्ता यांनी उपस्थित ग्रामस्थांना संबोधित करतांना सांगितले की, वर्ष २०२३ पासून आजपर्यंत ग्रुप ग्रामपंचायत खानाव यांच्या हद्दीत येणाऱ्या गावांकरिता गेल कंपनीचे सीईआर फंडातून २.९२ कोटीं रुपयांची विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत. खानाव ग्रामपंचायतीकरिता इतक्या रकमेची विकासकामे मंजूर करुन सुद्धा अद्यापपर्यंत रु.१.४४ कोटींची कामे खानाव ग्रामपंचायतीने केलेली नाहीत, अशी खंत व्यक्त करीत गेल कंपनीने मंजूर केलेल्या विकास काम पैकी ६२ लाख रुपयांची विकास कामे न करण्याबाबत खानाव ग्रामपंचायतीने लेखी पत्राद्वारे गेल कंपनीस कळविले आहे. अशाप्रकारे गेल कंपनीचे कार्यकारी निदेशक, उपस्थित ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांना विनंतीपूर्वक सांगितले की आपले परिसरात इतका मोठा प्रकल्प आल्यामुळे सीईआर फंडाचा जास्तीत जास्त लाभ खानाव ग्रामपंचायतीस मिळाला पाहिजे. त्यामुळे खानाव ग्रामपंचायतीकडे मंजूर सीईआर फंडातील बाकी असलेली कामे निर्धारित वेळेचे आगोदर लवकरात लवकर पूर्ण करून नविन विकास कामांचे प्रस्ताव गेल कंपीनकडे पाठविले पाहिजेत.

## ‘जीवनाबंदर’ बांधणाऱ्या कंपनीने बुडवला ‘कर’

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

जीवनाबंदर जेट्टीच्या निर्माणाचे बांधकाम सुरू आहे. सदरचा बांधकाम करण्याचा ठेका फोरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने घेतला आहे. यासाठी श्रीवर्धन नगरपरिषदेच्या रस्त्याचा वापर होत असून कंपनीने नगरपरिषदेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही.

कोणताही कर नगर परिषदेला भरलेला नाही. त्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. कंपनीकडून खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात काँक्रिट ओतण्यात येत आहे. जर एखादा अवजड वाहतूक करणारा भरलेला डंपर रस्ता खचून पलटी झाल्यास मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नगर परिषदेला कर न भरता रस्त्यांची वाट लावणाऱ्या कंपनीने मुजोरपणा असाच चालू ठेवला तर जनआंदोलन उभे राहील. कंपनीला कामाचा ठेका देणाऱ्या मेरीटाईम बोर्डानेदेखील पाण्याची पातळी वाढत असल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची तज्ज्ञांकडून पाहणी करून घेण्याची गरज आहे.

> **फोरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने श्रीवर्धन नगर परिषदेकडून वाहतुकी संदर्भात कोणतीही परवानगी घेतलेली नाही. तसेच रस्ता वापरण्याचा कोणताही कर भरलेला नाही. – जीवन पाटील, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद.**

## सिडकोचे दुर्लक्ष; रहिवाशांच्या नशिबी नरकयातना

### रस्ते, गटारे, पाणी, खेळाचे मैदान आणि शाळांचा अभाव

**| उरण | प्रतिनिधी |**



तालुक्यातील सिडकोच्या द्रोणागिरी नोडमधील रहिवाशांना विविध समस्यांचा सामना करावा लागत असून, येथील रहिवाशांना नागरी सुविधा मिळणेही दुरापास्त झाले आहे. यात मुख्य म्हणजे प्रत्येक नोडमध्ये रस्त्याची सुविधा, पाण्याची समस्या, सांडपाणी निचरा होण्यासाठी गटारे, शाळा, खेळाचे मैदान आदी समस्या आहेत. सिडको नोड द्रोणागिरी सेक्टर ५५ मध्ये अपेक्स लॅण्डमार्क बिल्डिंग येथे गटाराचे पाणी रस्त्यावर आले आहे. मच्छरांनी उच्छाद मांडला आहे, त्यामुळे येथे रोगराई पसरण्याचा धोका असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

उरण तालुक्यात जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल या मोठ्या प्रकल्पांसह अनेक वेअर हाऊसेस गोदामे वसली आहेत. त्यात नुकतेच उरणला उरण रेल्वे आणि अटल सेतू या दोन प्रमुख दळणवळणाच्या साधनांनीही जोडले आहे. त्यामुळे सिडकोने विकसित केलेल्या द्रोणागिरी नोडमध्ये रहिवाशांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. मात्र, त्या अनुषंगाने येथे नागरी सुविधा देण्यात सिडको अपयशी ठरली आहे. या वसाहतीत वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी सिडकोची असतानाही अनेक वर्षांनंतर मात्र येथील बहुतांशी सेक्टरमध्ये पाण्याची समस्या आहे, काही इमारतींना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. रहिवाशांना ये-जा करण्यासाठी अद्याप व्यवस्थित रस्ते निर्माण केले नाहीत, त्यामुळे खड्ड्यातून किंवा कच्च्या रस्त्यातून मार्ग काढावा लागत आहे. काही ठिकाणी गटारांची निर्मिती करण्यात आले आहे. तर, काही भागात गटारांची निर्मितीच करण्यात आलेली नाही. गटारांची निर्मिती करण्यात आली आहे तिथे गटारे ओव्हर फ्लो होऊन गटाराचे पाणी रस्त्यावर आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण होत आहे.

येथे मोठ्या प्रमाणात नागरिक आता राहण्यास आले असले तरी येथे अद्याप मुलांसाठी कोणतीही शाळा नाही, त्यामुळे येथे राहणाऱ्या मुलांना उरण शहर किंवा जेएनपीएच्या शाळेत जावे लागते. तसेच येथील मुलांना खेळण्यासाठी मैदानाची उपलब्धताही झालेली नाही. या वसाहतीमध्ये एखादा विरंगुळ्यासाठी गार्डनचीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. अशा अनेक समस्यांचा सामना येथील नागरिकांना करावा लागत आहे. या समस्या सोडवण्यात यावा, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ सोहळा संपन्न

**| रायगड | प्रतिनिधी |**



रायगड जिल्ह्याचा सशस्त्र सेना ध्वजदिननिधी संकलन शुभारंभ कार्यक्रम सोहळा राजस्व सभागृह, येथे जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण समिती किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर जी.एस.हरळय्या तसेच तहसिलदार चंद्रशेखर मोरे उपस्थित होते.

कार्यक्रमात कै.सरला सदाशिव वेलणकर यांचे स्मरणार्थ ध्वजदिन निधीसाठी राजीव सदाशिव वेलणकर रु. ३४,०००, संतोष प्रभाकर म्हात्रे रु.३३,००० व राजश्री अनिल जोशी रु. ३३,००० चे धनादेश दिले. शासनाकडून रायगड जिल्हयाला सशस्त्र सेना ध्वजदिन करीता रु.६८ लाखाचे उद्दीष्ट देण्यात आले होते व रायगड जिल्ह्याने रु. ८४ लाख २० हजार म्हणजेच १२४ टक्के निधी संकलन केले आहे. सशस्त्र सेना ध्वजदिन-२०२४ चे उद्दीष्ट पूर्ण केल्याबद्दल जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड कर्नल राहुल माने यांना जिल्हाधिकारी किशन जावळे शुभहस्ते प्रदान करण्यात आले. सशस्त्र सेना ध्वजदिन-२०२४ करीता देणगी देणाऱ्या देणगीदारांचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते स्मृतिचिन्हे व प्रशस्तीपत्रे देउन सन्मान करण्यात आला.

## सिकलसेल सप्ताहाचे आयोजन !

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षयकुमार सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सिकलसेल सप्ताहाला सुरुवात झाली असून ते १७ डिसेंबरपर्यंत चालणार तरी रुग्णांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सौरभ घरडे, डॉ. प्रसाद उपाध्ये, संतोष पाटील, नंदकुमार घाडगे, रुपेश म्हात्रे, प्रवीण पाटील, अनिकेत हजारे, मनीषा शेलार, जुतिका गावंड, आरोग्य सेविका कविता मासाळ, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी स्थानिक नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

## ‘उमेद’चे नागपुरात उपोषण सुरु

### हजारो महिला न्यायासाठी उपराजधानीत



**| नेरळ | प्रतिनिधी |**

केंद्र आणि राज्य सरकारच्या राष्ट्रीय उपजीविका अभियान अंतर्गत उमेद हि चळवळ राज्य सरकार चालवत आहे. बचत गटांच्या महिलांना एका छत्राखाली आणण्याचे कार्य करणाऱ्या उमेद ला नागपुरात उपोषण करण्याची वेळ आली आहे. उमेदशी संबंधित असलेल्या हजारो महिलांना ऐन थंडीत कुडकुडत उपोषणाला बसण्याची वेळ आली असून शासन या महिलांच्या मागण्या मान्य करणार आहे कि नाही? असा संतप्त सवाल महिला उपस्थित करीत आहेत.

गेल्या वर्षापासून उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्याकडून विविध मागण्या शासनाकडे रेटून धरले आहेत. मागील नऊ महिन्यात राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन मागण्या मान्य करण्याबाबत त्यांच्या अध्यक्षतेखाली दोन बैठके झालेले असून सकारात्मक चर्चा करण्यात आली होती. परंतु अद्यापही संघटनेच्या मागण्या मान्य न झाल्याने शासन निर्णय व अंमलबजावणी झालेली नाही त्यामुळे संघटना दोन लाख महिला किडर व कर्मचारी यांच्या उपस्थितीत आंदोलनाच्या तयारीत आहे.

उमेद संघटनेकडून केंद्र शासनाच्या सूचनानुसार उमेद अभियानाचे नवीन एचआर मॅन्युअल मनुष्यबळ विकास पुस्तिका लागू करणे राज्यातील सर्व समुदाय संसाधन व्यक्तींना ग्राम सखी म्हणून मान्यता देऊन शासनाचे अधिकृत ओळखपत्र व दहा लाखापर्यंत विमा संरक्षण मिळावे शैक्षणिक व अनुभव पात्रता असलेल्या किधरला प्रभाग सभाग या पदावर प्राधान्याने घेण्यात यावे मार्च २०२६ नंतर देखील सर्व कम्युनिटी केडर कार्यरत ठेवून शासनाकडूनच थेट केडरचे खात्यात मानधन वितरण व्हावे अशा अनेक मागणी उमेद कडून सातत्याने पुढे केल्या जात असतात.

अशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांना लागू असलेल्या १० लाख रकमेचा विमा सारखा उमेद अभियानातील सर्व समुदाय संसाधन व्यक्ती यांना देखील अपघात अपंगत्व व नैसर्गिक मृत्यू इत्यादी सारखा संरक्षण विमा लागू करणे उमेद अभियानात बाह्य संस्थेद्वारे कार्यरत असणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना देखील उमेदमधील कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांच्याप्रमाणे वार्षिक वेतन वाढ प्रत्येक महिन्याला वेळेवर मानधन वितरित व्हावे अशा प्रमुख मागण्या संघटनेच्या आहेत.

### वातावरणीय बदलामुळे वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर

## पोपटीसाठी गावठी वालाची प्रतीक्षा

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**



अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्याकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यानाही बसल्याचे चित्र रायगड जिल्ह्यातून समोर येत आहे.

कारण आतापर्यंत वालाच्या शेंगाचे उत्पादनच झालेले नाही. त्यामुळे शेंगा प्रेमींना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे. तत्पूर्वी वालाच्या शेंगांची आवक मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती. मात्र मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधून मधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान सद्यस्थितीतरायगडमधीलभाजीपाला बाजारातील उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा ह्या अधिकतम बाहेरील जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगा प्रेमीच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीणमधील गावठी शेंगांच्या पोपटीच्या माध्यमातून चवीचा आस्वाद घेता घेत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांची हिरमोड होत असून असे ग्राहक बाजारात येणाऱ्या शेंगा खरेदी करण्यास कानाडोळा करत असून गावठी शेंगांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे.

भात कापणीनंतर लागवड केलेल्या वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते.

आता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने कडधान्ये, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असाल्याने शेतकयांना नुकसान सहन करावा लागत आहे.अलीकडील बदलत्या हवामान स्थितीचा पिकांवर परिणाम होत असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात चालू हंगामात पावसाचा कालावधी अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात लांबल्यामुळे जमिनीत जास्त काळ ओलावा टिकून राहिला.

# हा कारभार की चेष्टा

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू आहे. त्यापूर्वी रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची आर्थिक स्थिती बिकट असली तरी राज्य दिवाळखोर झालेले नाही असे पत्रकार परिषदेत सांगितले. हे म्हणजे रुग्ण कोमात असला तरी अजून वारलेला नाही असे म्हणण्यासारखे झाले. त्यानंतर लगेचच राज्य सरकारने ७५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी अपुऱ्या पडतील तिथे काही प्रमाणात पुरवणी मागण्या मांडण्याचा प्रघात आहे. पण या मागण्या आता मूळ अर्थसंकल्पाशीच स्पर्धा करू लागल्या आहेत. गेल्या वर्षी निवडणुकीच्या तोंडावर जून महिन्यात ९४ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेण्यात आल्या होत्या. यंदा पावसाळी अधिवेशनात ५७ हजार कोटी रुपयांच्या अधिकच्या मागण्या मान्य करून घेतल्या गेल्या. म्हणजे २०२५ च्या वर्षात मूळ अर्थसंकल्पाव्यतिरिक्त आणखी सव्वा लाख कोटी रुपयांची उचल हे सरकार करणार आहे. या प्रमाणात सरकारचे उत्पन्न वाढलेले नाही व वाढणारही नाही. त्यामुळे ही रक्कम बाजारातून कर्ज घेऊन उभी करावी लागणार आहे. हे कर्ज व व्याज जनतेच्याच बोकांडी बसणार आहे. लाडकी बहीण योजनेने सरकारच्या तिजोरीची वाट लावली आहे हे अनेकदा स्पष्ट झाले आहे. खुद्द सरकार पक्षाचे आमदारही लाडकी बहीण योजनेमुळे आपल्याला इतर कामांसाठी निधी मिळत नसल्याची तक्रार करीत आहेत. मुख्यमंत्र्यांचे पूर्वीचे पीए व आताचे लातूरचे आमदार अभिमन्यू पवार यांनी तसा उल्लेख परवा केला. त्यावर फडणवीस भडकले व लाडकी बहीणला बोल लावू नका, नाहीतर निवडणुकीत पराभूत व्हाल असा इशारा आपल्याच सहकाऱ्यांना त्यांनी दिला. तिकडे एकनाथ शिंदेही सातत्याने हेच बोलत असून योग्य वेळ येताच लाडक्या बहिणींचे पैसे १५०० वरून २१०० करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. या योजनेसाठी अतिरिक्त ५ हजार कोटी या पुरवणी मागण्यांमध्ये आहेत. म्हणजे वर्षाला सुमारे ४० ते ४५ हजार कोटी रुपये या योजनेवर खर्च होणार आहेत.

## पैशांच्या थप्प्यांचे व्हिडिओ

आता निदान बहिणी या पैशांचा विनियोग कसा करतात व त्याचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो याचा तरी किमान अभ्यास सरकारने करावा. त्यातून निदान या खर्चाला काही शिस्त लावता येईल. एकीकडे ही उधळपट्टी चालू असताना दुसरीकडे राज्यातील शेतकऱ्यांच्या तोंडाला मात्र पाने पुसली जात आहेत. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अगदीच किरकोळ मदत मिळाली आहे. काल या विषयासंदर्भात भास्कर जाधवांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेचे उत्तरच तयार नव्हते. त्यामुळे ती पुढे ढकलावी लागली. एकूणच सरकार विरोधक आणि जनता यांच्याबाबत किती बेपर्वा आहे याचे हे उत्तम उदाहरण आहे. विधानसभा व परिषदेत आज विरोधी पक्षनेता नाही. हे पद मुद्दाम रिकामे ठेवून विरोधकांना आपसात झुंजवण्याचा प्रकार चालू आहे. शिवाय, विरोधी पक्षनेता असला तर विरोधाला अधिक धार येते. तेही सरकार टाळू पाहते आहे. एकूण मन मानेल तसा कारभार चालू आहे. मुळात नागपूर अधिवेशन हाच एक फार्स आहे. यंदा ते केवळ एक आठवडा चालणार आहे. येत्या निवडणुकांच्या आचारसंहितेचे कारण त्यासाठी दिले आहे. पण सरकारकडे पैसे नाहीत आणि विरोधकांपासून त्याला तोंड लपवायचे आहे हाच त्यामागचा खरा हेतू आहे. गंमत म्हणजे एकीकडे सरकारकडे पैसे नाहीत. पण सरकारी आमदार व मंत्र्यांकडे भरभरून पैसा वाहतो आहे असे दिसते. अंबादास दानवे यांनी नोटांच्या थप्प्यांमध्ये बसलेल्या आमदार महेंद्र दळवींचा व्हिडिओ जारी केला आहे. पाठोपाठ महाडवाले भरत गोगावले यांचाही व्हिडिओ शेकापच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी काल जारी केला. दळवी व गोगावले यांनी हे व्हिडिओ खोटे किंवा एआयच्या साह्याने बनवलेले आहेत असे म्हटले आहे. याबाबत दानवे यांना नोटीसही पाठवण्यात आली आहे. पण खरी अपेक्षा सरकारकडून आहे. सरकारने पुढे येऊन या प्रकरणांमधील सत्य शोधण्याची हिंमत दाखवायला हवी. एरवी भ्रष्टाचाराच्या नुसत्या आरोपांवरून विरोधकांना इडी लावली जाते किंवा त्यांच्या घरांवर बुलडोझर चालवले जातात. इथे मात्र संबंधित आमदार व मंत्र्यांनी केलेला इन्कार पुरेसा आहे असे मानून त्यावर पडदा टाकला जातो हे योग्य नाही.

## सकाळी मित्र, दुपारी शत्रू

नागपूर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, म्हणजे सोमवारी आणखी एक तमाशा पार पडला. शिंदे सेना व भाजप यांच्यात कोणतेही मतभेद नाहीत व आगामी निवडणुका महायुती एकत्र लढवणार असल्याचे जाहीर करण्यात आले. फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांची दोन तास बैठक झाली व आपण युतीत आहोत याचा या दोघांना नव्याने साक्षात्कार झाला. दोन आठवड्यांपूर्वी हे व यांच्या पक्षाचे बाकीचे नेते, नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात एकमेकांवर वाटेल ते आरोप करीत होते. त्यात तात्विक मतभेदांचा काही संबंधच नाही. मुळात भाजप व शिंदे यांच्यात असे मतभेद नाहीत हे खरे आहे. कारण, वाटेल त्या मार्गाने सत्ता मिळवणे व विरोधकांना खलास करणे हेच या दोन्ही नेत्यांचे व त्यांच्या पक्षाचे तत्व आहे. निवडणुकीच्या काळात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शिंदे सेनेची माणसे फोडली. शिवाय, शिंदे सेनेला गाडण्यासाठी ठिकठिकाणी फिल्डिंग लावली. ठाणे व सिंधुदुर्गात याचा स्फोट झाला. मालवणात शिंदे सेनेचे आमदार निलेश राणे यांनी भाजपवाले पैशांचे वाटप करीत आहेत असा आरोप करून एका भाजप कार्यकर्त्याच्या घरावर स्वतः धाड घातली होती. नंतर पोलिसांमध्ये फिर्यादही दाखल केली होती. हा गंभीर स्वरुपाचा भ्रष्टाचार होता. याला मतभेद वगैरे म्हणत नाहीत. पण भाजपला आता मुंबई व परिसरातील महापालिकांमध्ये शिंदे सेनेची गरज भासणार आहे. त्यासाठी या प्रकरणांवर पडदा टाकण्याचे नाटक चालू आहे. अधिवेशनादरम्यान रवींद्र चव्हाण यांनी निलेश राणे यांच्या खांद्यावर हात टाकल्याचे फोटो प्रसिद्ध झाले. पण याचा अर्थ एक तर शिंदे सेनेचे आरोप हाच एक खोटा तमाशा होता किंवा आता हे दोघे मिळून जनतेला मूर्ख बनवू पाहत आहेत. अर्थात, जिथे युती शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढती होतील असे कलम भाजपने यात टाकलेले आहेच. म्हणजेच, काही काळापुरती दोस्ती दाखवून पुन्हा केसाने गळा कापायला भाजपवाले मोकळे असतीलच. अर्थात, शिंदे सेनेबाबत कोणालाही सहानुभूती वाटण्याचे कारण नाही. त्यांनी सत्तेसाठी ठाकरे सेनेशी अशीच दगाबाजी केली होती. आम्ही सकाळी मित्र, दुपारी शत्रू आणि संध्याकाळी मित्र असू आणि तरीही जनता आमच्याच मागे उभी राहील असा एक माज या पक्षांमध्ये तयार झाला आहे. फडणवीस सरकारकडे इतके बहुमत असूनही रिकाम्या तिजोरीचा आणि निव्वळ भ्रष्ट चारित्र्याचा कारभार चालू आहे.

विचार

# ‘ब्लू इकॉनॉमी’चे वाढते महत्त्व

***सागरी संपत्तीतून राष्ट्रविकास साधण्यासाठी केंद्र सरकारने ‘मेरिटाइम इंडिया व्हिजन २०३०’ हा उपक्रम सुरू केला आहे. त्याद्वारे बंदरांचे आधुनिकीकरण, सागरी पायाभूत सुविधांचा विस्तार करून, ‘ब्लू इकॉनॉमी’ला चालना दिली जात आहे. सध्या जागतिक पुरवठा साखळी धोक्यात आली आहे. मात्र प्रतिकूल वातावरणातही भारत पूर्ण ताकदीनिशी एखाद्या खंबीर दीपस्तंभाप्रमाणे उभा असून वाटचाल करत आहे.***



**हेमंत देसाई**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी व्यापार आणि नौदल शक्तीला नवीन उंचीवर नेले होते. मातृभूमीच्या प्रगतीसाठी त्यांनी नवी धोरणे तयार केली आणि निर्णय घेतले. आपली ताकद इतकी होती की, संपूर्ण ईस्ट इंडियन कंपनीदेखील समुद्री सेनापती कान्होजी आंग्रे यांच्याशी बरोबरी करू शकली नाही. आता बंदरांचे आधुनिकीकरण केले जात असून जलमार्ग विकसित करण्यात येत आहेत. बहुतेक बंदरांची क्षमता पूर्वीच्या तुलनेत दुप्पट झाली आहे. खासगी गुंतवणूक वाढली असून, जहाजे बंदरात येण्या-जाण्याचा आणि मालहाताळणीचा वेळ कमी झाला आहे. मुंबईजवळ वाढवण हे देशातील जमिनीवरचे नव्हे, तर ऑफ शोअर बंदर असणार आहे. मुंद्रा वा जेएनपीटी बंदराची खोली किंवा ‘ड्राफ्ट’ १७ ते १८ मीटर अशी आहे, तर वाढवणची खोली २० ते २५ मीटरच्या आसपास असणार आहे. बंदरातील पाण्याची पातळी आणि बोटीचा तळाचा बिंदू यामधील अंतराला ‘ड्राफ्ट’ असे म्हणतात. हा ‘ड्राफ्ट’ जास्त असल्यामुळे मोठमोठी जहाजे वाढवण बंदरात आणता येणार आहेत. या बंदराची क्षमता वर्षाला ३० कोटी मेट्रिक टन इतकी प्रचंड असणार आहे. त्यामुळे जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये वाढवणचा समावेश असणार आहे. ‘ब्लू इकॉनॉमी’ हा भारताच्या हरित विकास प्रवासाचा नवा पाया आहे. आपल्याकडे ११ हजार किलोमीटरचा किनारा आणि २.५ दशलक्ष चौरस किलोमीटचे एक विशेष आर्थिक क्षेत्र आहे. ते प्रचंड क्षमता देते. ‘ब्लू इकॉनॉमी’ म्हणजे समुद्राशी संबंधित संपूर्ण आर्थिक पायाभूत सुविधा. त्यात मत्स्यव्यवसाय, बंदरे, जहाजबांधणी, सागरी जैवतंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा आणि खोल समुद्रातील शोध यांचा समावेश आहे.

तज्ज्ञांचा विश्वास आहे, की हे क्षेत्र येत्या काही वर्षांमध्ये भारताला समृद्धी आणि स्वावलंबनाच्या नवीन उंचीवर नेईल. ‘सागरमाला’ कार्यक्रम बंदरांचे आधुनिकीकरण करत आहे आणि व्यापार स्पर्धात्मक बनवत आहे. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना मत्स्यव्यवसाय क्षेत्रात नील क्रांती घडवून आणत आहे. हरित समुद्र मार्गदर्शक तत्त्वे ही बंदरे हरित करण्यासाठी आणि शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्यासाठी एक मोठे पाऊल आहे. याव्यतिरिक्त, ‘मिशन ओशन’ अंतर्गत, खोल समुद्रातील शोधासाठी सहा हजार पाणबुडी विकसित करण्यात आल्या आहेत. ‘नील अर्थव्यवस्था’ केवळ संसाधनांचा वापर करण्याबद्दल नाही. ती समाजाला सक्षम बनवते. महिलांना समुद्री शैवाल शेती आणि ‘इको-टुरिझम’मध्ये नवीन संधी मिळत आहेत. तरुणांना सागरी अभियांत्रिकी आणि डेटा विश्लेषणासारखे कौशल्य दिले जात आहे. ‘स्टार्टअप्स स्मार्ट फिशिंग’, ‘ग्रीन पोर्ट लॉजिस्टिक्स’ आणि सागरी जैवतंत्रज्ञान यासारख्या नवीन क्षेत्रांमध्ये प्रयोग होत आहेत. भारत या दिशेने जागतिक स्तरावर आपली भूमिकादेखील मजबूत करत आहे. फ्रान्समधील युनो महासागर परिषदेत भारताने ‘एसएएचव्ही’ पोर्टल सुरू केले. ते जागतिक समन्वय आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीसाठी एक प्रमुख व्यासपीठ बनेल. साधी बाब अशी आहे की येणाऱ्या काळात भारताचे भविष्य, समृद्धी आणि हरित विकास हे सर्व समुद्राशी जोडलेले आहे.

देशात प्रथमच गुजरातमधील कांडला बंदरात हरित हायड्रोजनची निर्मिती करण्यास सुरुवात झाली आहे. हरित लॉजिस्टिक व्यवस्था, बंदरांची जोडणी आणि सागरी औद्योगिक समूहविकासावर केंद्र सरकार अधिक भर देणार आहे. मध्यंतरी केरळमधील तिरुअनंतपुरममध्ये विळिंजम येथे खोल पाण्यातील आंतरराष्ट्रीय बहुपयोगी बंदराचे उद्घाटन आणि लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते झाले. ८,८०० कोटी रुपये खर्चून उभारलेले हे बंदर देशातील पहिले अर्धस्वयंचलित तसेच खोल पाण्यातील कंटेनर वाहतूक करणारे बंदर ठरणार आहे. विळिंजम बंदरामुळे भारत, मध्य आशिया आणि युरोप यांच्या दरम्यान दळणवळणाचा सोयीचा मार्ग उपलब्ध होणार आहे. भारतीय नौकानयन आणि व्यापारी धोरणे दूरदृष्टीने आखण्यात आली असून, मध्यपूर्व युरोप आर्थिक कॉरिडॉर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. भारताने नौकानयनक्षेत्रात मूलभूत बदल करून आधुनिक काळाशी सुसंगत असे सागरी व्यापार व नौकानयन कायदे अंमलात आणले आहेत. या नवीन कायद्यांतर्गत राज्यांच्या मेरिटाइम बोर्डांना सक्षमता बहाल करण्यात आली असून, आर्थिक विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने हे योग्य पाऊल आहे. बंदर व्यवस्थापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा कालोचित वापर वाढला आहे.सागरी नौकानयन परिषदेचा आरंभ २०१६ मध्ये करण्यात आला आणि आज तिचे स्वरूप जागतिक पातळीवर विस्तारलेले आहे. जगभरातील ८५ देशांचे प्रतिनिधी मुंबईत अलीकडेच झालेल्या मेरिटाइम परिषेदेत सहभागी झाले होते. त्यावेळी पंतप्रधानांच्या उपस्थितीत १२ लाख कोटी रुपयांच्या विविध करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. तसेच शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया त्याचप्रमाणे पंतप्रधानांच्या हस्ते या परिषेदत ड्रेजिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या भविष्यकालीन धोरणयोजनेचे अनावरण करण्यात आले. मोठ्या बंदरांची क्षमता चारपटींनी वाढवण्यासाठी केंद्र सरकार त्यात ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये मेरिटाइम इंडिया व्हिजन अंतर्गत दीडशेहून जास्त उपक्रम राबवले गेले. अंतर्गत जलमार्गांची संख्या तीनवरून ३२ वर गेली आणि मालवाहतुकीत ७०० टक्के वाढ झाली. क्रुझ पर्यटनात वाढ होऊन किनारी भागांमध्ये प्रचंड रोजगारनिर्मिती झाली. समुद्र, किनारे, नद्या आणि जलस्रोत यांचा वापर करून, आर्थिक विकास साधणे, म्हणजेच ‘ब्लू इकॉनॉमी’ची प्रगती करणे होय.

समुद्री साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर करून सागरी परिसंस्थेचे जतन करण्यावरही भर देण्याची आवश्यकता आहे. देशाच्या समुद्री क्षेत्राची क्षमता वाढवण्यासाठी आगामी काळात दोन लाख २३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून ४३७ नवी जहाजे उतरवण्यात येणार आहेत. खनिज तेल उत्खनन, कंटेनर, टँकर, हरित टग, ड्रेजर्स किंवा गाळ काढणाऱ्या जहाजांचा त्यात समावेश असणार आहे. या गुंतवणुकीसाठी मुंबईत ‘भारत कंटेनर शिपिंग लाइन’ या उपक्रमाची घोषणाही करण्यात आली. समुद्रात विविध प्रकारचे मार्ग असतात. त्यांना चॅनेल असे म्हटले जाते. या चॅनेलमधून बंदरापर्यंत पोहोचताना बाहेरून येणाऱ्या जहाजांना ‘टग’ बोटी मार्ग दाखवतात. जी-२० राष्ट्रगटाचे अध्यक्षपद भारताकडे आल्यानंतर ‘ब्लू इकॉनॉमी’ किंवा ‘नील अर्थव्यवस्था’ केंद्रस्थानी आली. ‘नील अर्थव्यवस्थे’च्या विकासासाठी जी-२० राष्ट्रगटाच्या माध्यमातून संशोधन केले जात असून महत्त्वाच्या शिफारशीही केल्या जाणार आहेत.

जागतिक तापमानवृद्धीमुळे सागराची पातळी वाढत आहे. त्यामुळे सागरी परिसंस्था धोक्यात आल्या असून अनेक देशांच्या अस्तित्वापुढे प्रश्नचिन्हही उपस्थित केले जात आहे. म्हणूनच सागरी स्रोतांचा शाश्वत पद्धतीने विकास करून लोकांचे जीवनमान उंचावण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे सागरी परिसंस्थेचे आरोग्य जपणेही आवश्यक आहे. मासेमारी, सागरातून खनिजे, खनिज तेल आणि वायू मिळवणे ही सध्याची ‘नील अर्थव्यवस्थे’ची काही उदाहरणे होत. राज्यांमध्येही सागरी संपत्तीच्या विकासाकडे लक्ष पुरवले जात आहे. खासगी बंदरांच्या मालकांना सवलती दिल्या जात आहेत. या बंदरांपर्यंत जाणारे रस्ते बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा निम्मा बोजा राज्य सरकार उचलत आहे. नवीन जहाजांची बांधणी आणि जुन्या जहाजांच्या काही सुट्या भागांचा वापर करून, पुन्हा त्यांची उभारणी करण्यासाठीही सवलती दिल्या जात आहेत. समुद्रातील दीपगृहे तसेच पर्यटनस्थळांचा विकास, वॉटर स्पोर्टस, हाउसबोट्स यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. ही सर्व पावले महत्वाची असून सागरी वाहतूक वाढवण्यासाठीही ठोस उपाय योजणे आवश्यक आहे.

# अराजकतेला आमंत्रण देणारी यंत्रणा

**सुयोग आंग्रे**

अलिकडे भारतीय विमानतळांवर प्रचंड गोंधळ उडाला होता. ही परिस्थिती कशी व्यक्त करावी? परिस्थितीचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेत, विश्लेषक अनेकदा अशा असामान्य घटनांना ब्लॅक हंस आणि ग्रे हंस यांसारख्या संकल्पनांसह परिभाषित करतात.

यामध्ये ब्लॅक हंस ही एक अनपेक्षित, अनपेक्षित आणि अज्ञात घटना आहे. यामुळे गंभीर आणि प्रतिकूल परिणाम होतात. इंडिगोची उड्डाणे विलंब आणि रद्द करणे या श्रेणीत ठेवता येईल का? याचा तपास केला तर अधिक विश्रांतीचे सरकारी नियम आणि वैमानिकांसाठी सुधारित रोस्टर दोन वर्षांपूर्वी तयार करण्यात आले होते. विमान वाहतूक कंपन्यांना त्याच्या अनुपालनाची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला होता. यात अनपेक्षित किंवा अनिश्चित असे काहीही नव्हते. साहजिकच, अनुपालनाअभावी अराजकता निर्माण होणे साहजिकच होते आणि तसे झाले.

जर आपण वर्षाचा आढावा घेतला तर हे वर्ष भारतीय विमान वाहतूक क्षेत्रासाठी अत्यंत वाईट होते. जूनमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळले होते. काही हेलिकॉप्टरही अपघाताचे बळी ठरले आणि आता इंडिगो विमानांच्या ताफ्याची पडझड झाली आहे. याचा फटका शेवटी ग्राहकांनाच सहन करावा लागतो. पुढे विहीर आणि मागे खड्डा अशी ही कथा आहे. प्रवाशांची सुरक्षितता आणि सुविधा यात संघर्ष होतो ही किती मोठी विडंबना आहे. प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड करायची की वैमानिकांना विश्रांती देणाऱ्या नियमांमध्ये काही शिथिलता आणायची हा वादाचा मुद्दा नाही.

कॉकपिटमध्ये पायलट कधीही नसावेत, जास्त काम केलेले आणि पुरेशा विश्रांतीपासून वंचित असले पाहिजेत, परंतु अशा सर्वसमावेशक सुरक्षेची किंमत केवळ मोठ्या प्रमाणात उड्डाणे रद्द करून आणि गोंधळाला आमंत्रण देऊनच मोजावी लागेल का? यात शंका नाही की सुरक्षा ही सर्वोपरि आहे, परंतु आपल्याला त्यापलीकडे जावे लागेल. जसे की प्रवाशांच्या आरामाची आणि अनुभवाची पातळी. सेवा क्षेत्राचा एक भाग असण्याव्यतिरिक्त, विमानचालन हा आतिथ्य सेवांचा विस्तार मानला जातो. मात्र, वास्तव यापासून दूर आहे. सुविधा विसरून येथे प्रवासी केवळ मूलभूत ग्राहक हक्कांसाठी संघर्ष करतात.

भारतातील प्रवाशांच्या हक्कांशी संबंधित कागदपत्रे निरर्थक आहेत. त्यांच्यावर क्वचितच कारवाई होते. असे झाले तरी ते फक्त अन्न आणि परतावा या मुद्द्यांपुरतेच मर्यादित राहते.

विकसित देशांप्रमाणे, भारतातील विमान कंपन्यांना ऑपरेशनल अकार्यक्षमतेसाठी दंड आकारला जात नाही. जरी तुम्ही कमी भाड्यात आगाऊ तिकीट बुक केले तरीही, नियोजित फ्लाइटला उशीर झाल्यास किंवा रद्द झाल्यास, पर्यायी तिकीट खरेदी करण्यास भाग पाडलेल्या प्रवाशाला मूळ तिकिटातून मिळालेल्या परताव्याच्या तुलनेत जास्त पैसे द्यावे लागतात. एअरलाइन्स पूर्वसूचना न देता उड्डाणे उशीर करू शकतात किंवा रद्द करू शकतात, परंतु कोणत्याही प्रवाशाला उशीर होणे अस्वीकार्य आहे. हे ऑपरेशनल स्तरावर अत्यावश्यक असू शकते, परंतु स्पष्टपणे एकतर्फी आहे. नियमांमध्ये एवढी सुधारणा करणे आवश्यक आहे की, विमान कंपनीने विमान उड्डाण उशीर झाल्यास किंवा त्याच्या चुकीमुळे रद्द झाल्याच्या बदल्यात प्रवाशांना पुरेशी भरपाई देणे बंधनकारक आहे. युरोप आणि अमेरिकेत ही प्रथा आहे. इंडिगोवर कठोर कारवाईची घोषणा करणे, त्यांच्या उड्डाणांची संख्या कमी करणे आणि सुरक्षा निकषांशी तडजोड न करण्याचा सरकारचा उपक्रम कौतुकास्पद आहे.

मार्केट लीडर कमी करण्याचा हा प्रयत्न समाजवादी काळातील अवशेष वाटण्याचा धोका असू शकतो, परंतु सध्याच्या परिस्थितीत हा मुख्य मुद्दा गमावल्यासारखे होईल. राज्याची ही कारवाई कोणत्याही कंपनीवर हल्ला करण्यापेक्षा अनुपालनाची खात्री म्हणून पाहिली पाहिजे. असो, अत्यावश्यक सेवांमध्ये कोणत्याही प्रकारची मक्तेदारी पूर्णपणे अस्वीकार्य असली पाहिजे. भांडवलशाही आणि मुक्त बाजारपेठेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या अमेरिकेतही महत्त्वाच्या सेवांमध्ये मक्तेदारी हाताळण्याबाबत सावधगिरी बाळगण्यात आली आहे. दोन कंपन्यांचे वर्चस्व हे मुक्त बाजाराच्या चांगल्या आरोग्याचे लक्षण म्हणता येणार नाही. भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी विमान वाहतूक बाजार आणि चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, परंतु त्याच्या दोन एअरलाइन्स - इंडिगो (६५ टक्के) आणि एअर इंडिया (३० टक्के) ९५ टक्के वाटा घेऊन जवळपास संपूर्ण बाजारपेठ नियंत्रित करतात.

आम्हाला बाजारपेठेत आणखी काही विमान कंपन्यांची तसेच अर्थपूर्ण धोरणात्मक हस्तक्षेपाची गरज आहे. भारतीय बाजारपेठ झपाट्याने विस्तारत आहे आणि विमान वाहतुकीच्या पायाभूत सुविधांनाही या गतीने पुढे जावे लागेल. प्रवाशांची सुरक्षितता आणि समाधान या महत्त्वाच्या क्षेत्राचा गाभा असायला हवा.

लोकसंसद

## दूरदृष्टीचे नेते

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, देशाचे माजी संरक्षण आणि कृषिमंत्री आदरणीय शरद पवार साहेबांचा आज ( १२ डिसेंबर ) रोजी ८५ वा वाढदिवस आहे याचा मनस्वी आनंद होत आहे. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात गेल्या पाच दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या पवार साहेबांनी आपल्या दूरदृष्टीने महाराष्ट्रात विकासाची गंगा आणली. त्यामुळेच पवार साहेबांना महाराष्ट्राचा आधारवड असे म्हंटले जाते. त्यांच्या पाच दशकांच्या



राजकीय कारकिर्दीत अनेक चढ उतार आले पण साहेब सर्व संकटाना धैर्याने सामोरे गेले. उन, वारा, पावसाची कदर न करता सभा, मेळावे घेऊन महाराष्ट्र पिंजून काढला. महाराष्ट्रातील प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांची नावे माहीत असलेले पवार साहेब हे देशातील एकमेव राजकीय नेते आहेत. फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचे पाईक असलेल्या पवार साहेबांनी सर्व जातीधर्माला सोबत घेऊन राजकारण केले. केवळ राजकारणच नव्हे तर समाजकारण, अर्थकारण, सहकार, शेती, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात त्याचा राबता असतो. त्यांच्या इतका कामाचा आवाका असणारे नेते राजकारणात दुर्मिळच. आज वयाच्या ८५ व्या वर्षीही ते तरुणांना लाजवेल अशा ऊर्जेने काम करतात. ते केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सर्वच क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांसाठी प्रेरणादाई आहेत. त्यांच्यासारखा दूरदृष्टीचा नेता महाराष्ट्राच्या भूमीत जन्माला आला हे आपले भाग्यच. आदरणीय पवार साहेबांना ८५ व्या वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!! साहेब शतायुषी व्हा!!!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

दिनविशेष

# अष्टपैलू अष्टावधानी शरद पवार साहेब

शरद पवार हे भारतातील प्रमुख राजकारण्यांपैकी एक आहेत. शरद पवारांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी पुण्यातील बारामती तालुक्यात झाला. ५० वर्षांहून अधिक काळ संसदीय राजकारण करणारे नेते म्हणून शरद पवारांकडे पाहिले जाते. काँग्रेसपासून वेगळे होऊन त्यांनी १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. मात्र २०२३ साली झालेल्या पक्षातील फुटीनंतर आता त्यांच्या पक्षाचे नाव ‘राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्ष’, असे आहे. तर मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांचे पुतणे अजित पवार यांच्याकडे आहे. शरद पवारांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव शारदाबाई होते. शरद पवार यांना राजकारण आणि समाजकारणाचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांच्या आई शारदाबाई पवार या स्वातंत्र्यपूर्व काळात पुणे जिल्ह्यातील स्थानिक राजकारणात सक्रिय होत्या. तर वडील गोविंदाराव हे देखील सहकारी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते होते. शरद पवार यांचे भाऊ वसंतराव हे देखील शेतकरी कामगार पक्षात होते. त्यामुळे पवारांवर लहानपणापासूनच राजकीय-सामाजिक कार्याचे संस्कार झाले. शरद पवार यांनी बारामतीतील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांनतर पुढे त्यांनी पुण्यातील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय शिक्षण घेतले. याच काळात ते राजकारणात हळूहळू सक्रिय होऊ लागले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांना शरद पवार यांनी त्याचे राजकीय गुरू मानले. पुढे शरद पवार यांनी काँग्रेस पक्षातून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. शरद पवार यांनी त्यांच्या विद्यार्थीदशेत असताना एका कार्यक्रमाला हजर असणाऱ्या तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या समोर जे भाषण केले ते ऐकुन यशवंतराव कमालीचे प्रभावित झाले आणि त्यांनी पवारांना युवक काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यास सांगितले. चव्हाणांचा तो सल्ला ऐकून शरद पवार यांनी वयाच्या २४ व्या वर्षी राज्य युवक काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि ते युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. शरद पवारांनी १९६० मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश घेत आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. १९६७ मध्ये ते पहिल्यांदा बारामतीमधून विधानसभेवर निवडून आले आणि १९७८ मध्ये महाराष्ट्राचे सर्वात कमी वयातील मुख्यमंत्री झाले. त्यांनी तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवले. १९८४ मध्ये ते लोकसभेवर निवडून गेले. केंद्रातही त्यांनी संरक्षण मंत्री, कृषी मंत्री अशी महत्त्वाची खाती सांभाळून त्यावर आपली छाप सोडली. राजकारणाबरोबरच शरद पवार यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे.

आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीमध्ये पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप, अंडरवर्ल्ड संबंध याशिवाय अनेक वाद झाले. तरीही चाणाक्ष पुढाऱ्याप्रमाणे त्यांनी विविध पक्षांसह युती करुन आपले राजकीय अस्तित्व आजही अबाधित ठेवले आहे. २०१९ साली विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवारांनी शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशा तीन पक्षांना एकत्र आणत महाविकास आघाडीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. शरद पवारांच्या या खेळीमुळे १०६ आमदार असलेल्या भाजपाला अडीच वर्ष सत्तेपासून दूर राहावे लागले. २०२३ मध्ये शरद पवार यांचे पुतणे अजित पवार यांनी बंड करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा ताबा घेतला. सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र विधिमंडळात अजित पवार हा दावा टिकवण्यात यशस्वी झाले. पक्ष फुटीनंतरही शरद पवार यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कडवी झुंज देत १० उमेदवारांपैकी ८ उमेदवार जिंकून आणण्यात यश मिळवले. तर दुसऱ्या बाजूला अजित पवार गटाला एकच खासदार निवडून आणता आला. या निवडणुकीत शरद पवार यांच्यावर वैयक्तिक टीका झाली. ते नेतृत्व सोडत नसल्याचा आरोप अजित पवार आणि त्यांच्याबरोबरच्या नेत्यांनी केला. तरीही हे हल्ले पचवून शरद पवारांनी आपल्या पक्षाला यश मिळवून दिले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१२ डिसेंबर**

१) श्री.बळवंत पांडुरंग वालेकर ब्राम्हणआळी, अलिबाग,१२-१२-१९४४
२)श्रीम.जोत्स्ना दिनेश पारेख मु.थळ, अलिबाग १२-१२-१९५०
३)श्री.दत्तात्रेय हरिश्चंद्र राऊत मु.चोंढी, ता.अलिबाग १२-१२-१९५५
४)श्रीम.संगीता हरिश्चंद्र पाटील मु.कुरूळ, अलिबाग १२-१२-१९५५

## लोकल रेल्वेत नशेखोरांचा उपद्रव

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वे मार्गावरील लोकल रेल्वे सेवांमध्ये दिवसाढवळ्या गर्दुल्यांकडून अमली पदार्थचे सेवन केले जात असते. मात्र रेल्वे पोलिसांच्या बेजबाबदारपणामुळे अशा नशेखोरांना आळा घालता येत नाही, असे संतप्त प्रवाशांचे म्हणणे आहे. अलीकडेच कल्याण रेल्वे स्थानकावरील घटना माध्यमांद्वारे समोर आली आहे. दुपारी ३:१२ मिनिटांच्या सुमारास कल्याण रेल्वे स्थानकातून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस प्रवास करणाऱ्या लोकल सेवेच्या माल डब्ब्यामध्ये माथेफिरू तरुणाने अमली पदार्थाचे सेवन खुशालपणे सगळ्या प्रवाशांसमोर काही प्रवाशांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केले असता. माथेफिरू तरुणाने इतर प्रवाश्यांना उलट उत्तरे देत दमदाटी केली. त्याचप्रमाणे ९ डिसेंबर, रोजी एका नशेखोराला कल्याणहून बदलापूर रेल्वे स्थानकात प्रवास करत असलेल्या लोकल रेल्वे सेवेमध्ये इतर प्रवाश्यांद्वारे चांगलाच चोप देण्यात आला. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार रात्रीच्या वेळेत लोकल रेल्वे सेवांमध्ये रेल्वे पोलीस नियुक्त नसल्यामुळे अशा नशे खोरांना अपराध करण्यास वाव भेटते.

# दुचाकी टॅक्सीचालक अडचणीत

## ●'ईव्ही' सक्तीमुळे चालकांसह प्रवाशांचेही हाल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने दुचाकी टॅक्सी सेवेसाठी केवळ इलेक्ट्रिक दुचाकींनाच परवानगी देण्याचा निर्णय घेतल्यानंतर हजारो दुचाकी टॅक्सीचालक बेरोजगार झाले आहेत. कोणतीही पूर्वतयारी न करता लागू करण्यात आलेल्या या ईव्ही सक्तीमुळे चालकांसह दररोज दुचाकी टॅक्सीवर अवलंबून असलेल्या लाखो प्रवाशांचेही हाल होत असल्याचा आरोप बाइक टॅक्सी असोसिएशनने (बीटीए) केला आहे.




असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, आवश्यक चार्जिंग पायाभूत सुविधा, आर्थिक मदत आणि स्पष्ट नियमावली उपलब्ध नसताना ईव्ही सक्ती करणे अव्यवहार्य आहे. बाइक टॅक्सी सेवा ही मुंबईसारख्या महानगरात स्वस्त, जलद आणि विश्वासार्ह लास्ट-माईल प्रवासासाठी महत्त्वाची ठरली आहे. मात्र अचानक लागू झालेल्या या निर्णयामुळे अनेक बाइक टॅक्सी रस्त्यावरून गायब झाल्या असून, प्रवाशांना अधिक वेळ, अधिक पैसे आणि अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, महाराष्ट्राची ईव्ही पॉलिसी २०२१ ही स्वैच्छिक आणि प्रोत्साहनाधारित असून, आवश्यक चार्जिंग सुविधा व आर्थिक सहाय्यावर आधारित असल्याचे त्यात स्पष्टपणे नमूद आहे. या धोरणानुसार २०२५ पर्यंत नव्या वाहन नोंदणीपैकी १० टक्के वाहने ईव्ही असावीत, असा उद्देश ठेवण्यात आला आहे; मात्र बाइक टॅक्सी या एका क्षेत्रात १०० टक्के ईव्ही सक्ती करण्याचा हेतू या धोरणात नसल्याचा दावा असोसिएशनने केला आहे.

> **ऑटो-टॅक्सी सहज उपलब्ध नसलेल्या भागांतील प्रवाशांसाठी हा सुरक्षित, जलद आणि किफायतशीर पर्याय आहे. सरकारने ही सेवा एका रात्रीत बंद करू नये. आम्हालाही ईव्हीच्या भविष्याचा भाग व्हायचे आहे; मात्र त्या दिशेने जाण्यासाठी आम्हाला योग्य वेळ आणि संधी द्यावी.**
> **- अमित गावडे, अध्यक्ष- बाइक टॅक्सी असोसिएशन**

### उदरनिर्वाहाचा प्रश्न

सरकारच्या निर्णयामुळे अनेक रायडर्स घरी बसले आहेत. बहुतेक रायडर्सच्या दुचाकींवर बँक कर्जाचे हप्ते सुरू आहेत. कामच बंद झाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारकडून जाहीर केलेली ईव्ही सबसिडी, सोपी नोंदणी प्रक्रिया आणि सर्वत्र चार्जिंग स्टेशनची हमी प्रत्यक्षात अद्याप पूर्णपणे उपलब्ध नसल्याचेही रायडर्सचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर, इंजिन वाहनांवरून इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्यासाठी किमान एक वर्षाचा संक्रमण कालावधी देण्यात यावा, अशी मागणी बाइक टॅक्सी असोसिएशनने केली असून, त्या कालावधीत आवश्यक सुविधा आणि मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## रेशन दुकानदारांच्या खात्यात कमिशन जमा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्यातील ९५२ रेशनदुकानदारांचे जून महिन्यापासून म्हणजेच पाच महिन्यांचे कमिशन थकीत होते. त्यामुळे दुकानदारांसमोर आर्थिक संकट उभे राहीले होते. अखेर जिल्ह्यातील रत्नागिरी तालुका वगळता उर्वरित तालुक्यातील रेशनदुकानदारांचे ऑक्टोबरपर्यंतचे कमिशन जमा झाले असून नोव्हेंबर महिन्याचे कमिशन बाकी आहे. लवकरात लवकर तेही कमिशन देण्यात येईल, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी रोहिणी राजपूत यांनी बोलताना दिली.



रेशन दुकानदारांना १०० किलो धान्य विक्रीवर १५० रुपये कमिशन मिळत होते. दरम्यान, २० ऑगस्टपासून हा दर वाढवून १७० रुपये प्रतिक्विंटल करण्यात आला आहे. सुरळीत कमिशन मिळत असताना जून महिन्यापासून रेशन दुकानदारांना कमिशन रखडले होते. त्यामुळे दुकानदार आर्थिक संकटात सापडले होते.

जिल्ह्यासह राज्यातील रेशन दुकानदार कमिशनच्या प्रतिक्षेत होते. रेशन दुकानदार संघटनेच्या वतीने जिल्हा पुरवठा विभाग, पुरवठा मंत्र्यांनाही निवेदन देण्यात आली होती. अखेर जिल्ह्यातील रेशन दुकानदारांचे थकीत कमिशन मिळण्यास सुरुवात झाली आहे. ऑक्टोबरपर्यंतचे कमिशन दुकानदारांच्या खात्यावर जमा झाले असल्याचे सांगण्यात आले. उर्वरित १ महिन्याचे कमिशन लवकरात लवकर देण्यात येणार असल्याचे रजपूत यांनी सांगितले.

> **रत्नागिरी जिल्ह्यातील दुकानदारांचे कमिशन जिल्हा पुरवठा विभागाकडून ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केले आहे. दुकानदारांच्या खात्यावर कमिशन जमा होत आहे. ऑक्टोबर महिन्याचे कमिशन केवळ रत्नागिरी तालुक्याचे शिल्लक आहे. लवकरच खात्यावर रक्कम जमा होईल. तसेच शिवभोजन केंद्र चालकांचे जुलैपर्यंतचे कमिशन देण्यात आले आहे.**
> **- रोहिणी राजपूत, जिल्हा पुरवठा अधिकारी, रत्नागिरी**

## रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**चिपळूण :** चिपळूण तालुक्यातील पेढे येथील एका तरुणाचा रेल्वेची धडक लागून मृत्यू झाला. ही घटना वालोपे रेल्वे स्टेशन येथील फरशी तिठा येथील पूल परिसरात घडली. याप्रकरणी चिपळूण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गणेश शंकर पानकर (३१, पेढे-पानकरवाडी) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश याला वंदे भारत या ट्रेनची धडक बसली. यात गंभीररित्या जखमी झाल्याने गणेश पानकर याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात आई-भाऊ असा परिवार आहे.

## विद्यामंदिरात विज्ञान प्रदर्शन

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटी पेण या संस्थेच्या श्री चंडीकाईदेवी माध्यमिक विद्यामंदिर आराव या प्रशालेत शालेय स्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. या कार्यक्रमास उपाध्यक्ष लीलानाथ धर्मा पाटील, ग्रुप ग्रामपंचायत आरावचे प्रशासक प्रसाद गजानन म्हात्रे, माजी सरपंच सुचिता दिनेश शेलार, स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष मनेश शिवाजी भोसले, गोगोदे केंद्र प्रमुख दत्तात्रेय कोठेकर, मुख्याध्यापक उल्हास भगवान नागावकर, ग्रामसेविका तृप्ती पुगावकर, अंगणवाडी सेविका चंद्रभागा कृष्णा भोसले, हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटी पेण या संस्थेतील सर्व मुख्याध्यापक आणि विज्ञान शिक्षक, पालक, ग्रामस्थ, आजी-माजी विद्यार्थी, उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र जयवंत पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले. सर्व परीक्षकांनी विज्ञान प्रतिकृती आणि रांगोळीचे परीक्षण केले. दुसऱ्या सत्रामध्ये निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा व प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व स्पर्धांचे निकाल जाहीर करण्यात आले. वंदेमातरम या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## गॅस सिलिंडर चोरीचा पर्दाफाश

**पालघर:**सफाळे व केळवे पोलिसांनी गॅस सिलिंडर चोरीच्या मालिकेचा पर्दाफाश केला. पालघर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार केळवे व सफाळे परिसरात घरफोडी करून गॅस सिलिंडर चोरीच्या घटना वाढल्या होत्या. पोलिसांच्या पाठपुराव्यामुळे दोन संशयितांची नावे निष्पन्न झाली. याप्रकरणी अजय अंबात्त (३२) व चंदू वळवी (२५) या दोघांना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून २३ गॅस सिलिंडर तसेच १ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## काळा घोडा परिसरातील सुशोभीकरण अंतिम टप्प्यात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दक्षिण मुंबईतील काळा घोडा परिसरातील डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग, रुदरफोर्ड मार्ग आणि बी. भरूचा मार्ग येथे सुरू असलेले सुशोभीकरण अंतिम टप्प्यात आले आहे. सुशोभीकरणानंतर मुंबईकरांसह, देश-विदेशातील पर्यटकांसाठी हा परिसर खुला करण्यात येणार आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या सुशोभीकरण कामांचा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, माजी मुख्य सचिव तथा महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष नितीन करीर यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन गुरुवारी (दि.११) सकाळी आढावा घेतला. सहायक आयुक्त (ए विभाग) जयदीप मोरे, संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक वारसा आणि पुरातन वास्तू असलेला परिसर म्हणून काळा घोडा परिसराची ओळख आहे. नागरिक, पर्यटकांची या भागात नेहमीच वर्दळ असते. येथे संग्रहालये, कला दालने आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारती आहेत. या परिसरात फेरफटका मारताना, खरेदी करताना, चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेतांना पर्यटकांना इतर सुविधाही पुरविण्यासाठी महानगरपालिकेने सुशोभीकरणाची कामे हातात घेतली आहे. परिसरात अवजड वाहनांना बंदी घालण्यात येणार आहे. या परिसराच्या चारही बाजूंना अद्ययावत बॅरिकेटस् लावण्यात येणार आहेत. बी. भरूचा मार्गावरील चौकात 'प्लाझा' साकारण्यात येणार आहे. या प्लाझाजवळ टेबल-खुर्चीवर बसून मुंबईकर, पर्यटक या परिसराचा, येथील स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेऊ शकणार आहेत.

याच पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या कामांचा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी तथा प्रशासक यांनी आढावा घेतला. हा परिसर अधिकाधिक सुंदर करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

## आठ दिवसांतच रस्ता उखडला

**रत्नागिरी :** अनेक वर्षे नादुरुस्त असलेल्या पाचल-जवळेथर रस्त्यांतर्गत तळवडे आंबेवाडी ते ताम्हाणे फाटा रस्त्याचे पंधरा दिवसांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र आठ दिवसातच रस्ता उखडला आहे.पुरेशा प्रमाणात डांबराचा वापर न झाल्याने रस्ता जागोजागी उखडला आहे. काही जागरूक नागरिकांनी ठेकेदारांच्या व्यवस्थापकाला याबाबत विचारणा कली असता तुम्ही कुठेही तक्रार करू शकत नाही, अशी उध्दट भाषा वापरून काम रेटण्याचा हा प्रकार करण्यात आला आहे.

## गरीब, निराधारांना ब्लँकेट वाटप

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल रेल्वे स्थानक व पनवेल बसस्थानक परिसरातील थंडीचा सामना करणाऱ्या गरीब, निराधार आणि उघड्यावर झोपणाऱ्या नागरिकांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. वाढत्या थंडीपासून संरक्षण मिळावे आणि सर्वांना माणुसकीची ऊब मिळावी, हा या उपक्रमामागील हेतू असल्याचे समजते. संस्थेचा हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबवला जात आहे. यावर्षीही सेवाभाव, सामाजिक जाणीव आणि सामूहिक सहभागाच्या जोरावर हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पूर्ण झाला. यावेळी अरुण जाधव, अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तथा तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना, यांनी स्वतः उपस्थित राहून उपक्रमाचे मार्गदर्शन केले. तर मनोज महाडिक, रेश्मा कुरुप (सामाजिक कार्यकर्त्या-पनवेल), सुनील कुरुप, रोहित इंगळे, शीतल आंबेरकर तसेच इतर मान्यवर महिला सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत कार्यक्रमाला बळकटी दिली.

## मुंबईतील हवा प्रदूषण अत्यंत घातक

### तातडीने उपाययोजना करा : वर्षा गायकवाड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी व जागतिक कीर्तीचे शहर आहे. आज मुंबईत हवा प्रदुषणाने उच्चांक गाठला असून श्वसनाच्या आजारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मुंबईत १५० ते २०० पर्यंत आहे, तर काही भागात तो ३०० आहे. विषारी वायुचे वाढलेले हे प्रमाण मुंबईकरांसाठी मोठे संकट बनले आहे. मुंबईकरांना स्वच्छ हवा मिळाली पाहिजे. त्यासाठी बांधकाम थांबविणे, अँटी-डस्ट गन, बांधकामाच्या ठिकाणी व्हील वॉश सिस्टम यासारख्या उपाययोजना तात्काळ करणे आवश्यक आहे, असे मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

खा. वर्षा गायकवाड यांनी सोमवारी (दि.०८) लोकसभेत मुंबईतील हवा प्रदुषणाचा प्रश्न उपस्थित केला. यावेळी त्या म्हणाल्या की, मुंबईतील एक्यूआय हा संपूर्ण शहरात सातत्याने घातक बनत चालला आहे. बेसुमार बांधकामे आणि अनियंत्रित वृक्षतोडीमुळे महाराष्ट्र राज्यातील पर्यावरणावर गंभीर परिणाम झाला आहे. आरे कॉलीनीत मेट्रो कार शेडसाठी २००० झाडांची कत्तल केली, धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठीही मोठी वृक्षतोड केली जात आहे. नाशिकमध्ये साधुग्राम साठी १७०० झाडांची कत्तल केली जाणार आहे. मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केल्याने पर्यावरणावर परिणाम होऊन हवा प्रदुषणात वाढ होत आहे आणि ते चिंताजनक आहे. आमच्या मुंबई स्वच्छ एअर जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे लवकरच उपाययोजना केल्या नाहीत, तर मुंबईची अवस्था दिल्लीपेक्षा वाईट होईल, असा इशाराही वर्षा गायकवाड यांनी दिला.

**प्रतापगड परिसरात स्वच्छता मोहीम** | **आरंभ अकॅडमीतर्फे शैक्षणिक सहल**

# विद्यार्थ्यांनी घेतला दुर्ग संवर्धनाचा वसा

**। तळा । प्रतिनिधी ।**

केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचा, छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास आणि संस्कृतीशी जोडून, आरंभ अकॅडमी श्री क्लासेस, इंदापूरने शैक्षणिक उपक्रमांमध्ये सातत्य राखत, गेल्यावर्षी किल्ले रायगड येथे यशस्वी उपक्रम राबविले. त्यानंतर, संस्थापक श्रीकांत खताळ यांच्या संकल्पनेतून यंदादेखील ६ वी ते १० वीचे ८६ विद्यार्थी प्रतापगडाच्या साक्षीने इतिहासाचे साक्षीदार झाले.

यावेळी विद्यार्थ्यांनी 'दुर्ग संवर्धन हेच ध्येय' हा वसा घेऊन गड परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा सांगणाऱ्या ऐतिहासिक किल्ले प्रतापगड येथे एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक आणि



समाजोपयोगी उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

या उपक्रमात अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी केवळ किल्ला पाहिला नाही, तर दुर्ग संवर्धन हेच ध्येय हा वसा घेऊन किल्ले परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबवली. यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासाच्या साक्षीने सामाजिक बांधिलकीचे धडे मिळाले. तसेच, या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांना शिवकालीन परिस्थितीची प्रत्यक्ष जाणीव करून देणे हे होते.

**खालील गोष्टींचा इतिहास जिवंत करण्यात आला-**

**शिवकालीन खेडी:** शिवकालीन जीवनशैली, साधेपणा आणि स्वराज्याच्या उभारणीतील सामान्य लोकांचे योगदान विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.

**स्वराज्य निर्मितीचा प्रवास:** छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या कठीण काळात, प्रतिकूल परिस्थितीत कशाप्रकारे स्वराज्य निर्माण केले, याचे प्रेरणादायी कथन.

**प्रतापगडाचा थरार:** प्रतापगड कसा काबीज केला गेला आणि अफजलखानाच्या वधाची ऐतिहासिक घटना, या संपूर्ण थरारक इतिहासाचे कथन मुलांसमोर उभे करण्यात आले.

**संपूर्ण गडदर्शन:** गडावरील भवानी माता मंदिर, समाधी, बुरुज आणि युद्धनीतीसाठी महत्त्वाची असलेली प्रत्येक ठिकाणे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली, ज्यामुळे त्यांचा अभ्यास अधिक दृढ झाला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ इतिहासाचे धडे मिळाले नाहीत, तर आपल्या देशाच्या अमूल्य वारशाचे संरक्षण करण्याची जबाबदारीची जाणीव झाली. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान न करता दरवर्षी एका गडावर विद्यार्थ्यांसहित मोहीम राबविण्याचा संकल्प या अकॅडमीने केला आहे.

# निवडक

## आंतरराष्ट्रीय पर्वत दिन साजरा



**महाड :** महाडजवळील कोल गावातील प्राचीन बौद्धकालीन लेणी परिसरामध्ये यावर्षीचा आंतरराष्ट्रीय पर्वत दिन उत्साहात साजरा करण्यात आला. युनेस्कोच्या अन्न व कृषी विभागातर्फे गेल्या वीस वर्षांपासून जगभरात हा दिन पर्वत संवर्धन, त्याचे मानवजातीशी असलेले नाते आणि जागरूकतेसाठी साजरा केला जातो. यंदाचा जागतिक पर्वत दिन 'जगाला शुद्ध पाणी, ऊर्जा आणि अन्न पुरवणाऱ्या हिमनद्यांचे संवर्धन' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित होता. अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाच्या उपक्रमांतर्गत, महाड येथील सह्याद्री मित्र गिरीभ्रमण संस्था यांच्या वतीने कोल लेण्यांमध्ये पर्वतपूजनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात रा.जि.प. शाळा कोल आणि रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिरगाव शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी सह्याद्री मित्राचे गिर्यारोहक व इतिहास अभ्यासक संकेत शिंदे यांनी लेण्यांचा इतिहास, शिलालेखांचे वाचन तसेच प्राचीन महाड बंदरातून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापाराविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तर सरपंच किशोर लोखंडे यांनी या प्राचीन लेण्यांची दुरवस्था अधोरेखित करत पुरातत्त्व विभागाने याचे संवर्धन करण्याची गरज व्यक्त केली.

## महाविद्यालयात अटळ वाणी कार्यशाळा



**रसायनी :** भारत सरकारच्या अटल अकॅडमी वाणी या उपक्रमांतर्गत पिल्लई एचओसी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, रसायनी संस्थेत अटल वाणी या तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा उद्देश मराठी भाषेतून शिक्षक, संशोधक व अभ्यासक यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या बदलत्या प्रवाहांची जाणीव करून देणे व त्यांच्या अध्यापन आणि संशोधन कार्यात त्यांचा प्रभावी उपयोग करता येईल, यासाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा होता. दि. ९ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आयोजित या कार्यशाळेत नामवंत तज्ज्ञ वक्त्यांनी आपले विचार मांडले. त्यांनी औद्योगिक ४.० मधील उदयोन्मुख संधी, डिजिटल शिक्षण साधनांचा वापर, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती तसेच संशोधनातील नवे दृष्टिकोन या विषयांवर सखोल माहिती दिली. प्रत्येक सत्रानंतर सहभागींसोबत संवादात्मक चर्चा झाली, ज्यामुळे शिक्षक व संशोधकांना प्रत्यक्ष अनुभवाधारित शिकण्याची संधी मिळाली. या कार्यशाळेला पन्नासहून अधिक प्राध्यापक व औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



## वडगाव शाळेत आरोग्य तपासणी

**रसायनी :** रायगड जिल्हा शासकीय रुग्णालय, अलिबागच्या परिचर्या प्रशिक्षण केंद्र अलिबाग येथील एएनएम आणि जीएनएमच्या विद्यार्थिनींचे ग्रामीण आरोग्य अनुभव शिबीर रसायनी पाताळगंगा येथील लोहोप आरोग्य उपकेंद्रात सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत गुरुवारी (दि.११) रा.जि.प. उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, बीएमआयएस व आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. यात आरोग्य विषयक चांगल्या सवयी, घ्यावयाची काळजी तसेच किशोरवयीन मुलांना मार्गदर्शन, किशोरवयीन मुलींना स्वच्छता व शारीरिक बदल तसेच घयाव्याची दक्षता व मासिक पाळी व्यवस्थापन विषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता जिल्हा रुग्णालय रायगड, अलिबागच्या अधिसेविका गायत्री म्हात्रे व परिचर्या प्रशिक्षण केंद्र जिल्हा रुग्णालय रायगड, अलिबागच्या परिचर्या अधिकारी सारिका पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. यावेळी पाठ्यनिर्देशिका धनश्री पाटील, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्याध्यापक सुभाष राठोड व इतर शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.




## प्रकल्प निरामायातर्फे आरोग्य शिबीर

**वावोशी :** हुमाना पीपल टू पीपल इंडिया संस्था आणि मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या प्रकल्प निरामायामार्फत खोपोली परिसरात आरोग्य जनजागृतीसाठी सक्रीय कार्य सुरू आहे. महिलांचे व किशोरवयीन मुलींचे गट तयार करून त्यांना दर महिन्याला आरोग्य प्रशिक्षण देणे, तसेच किशोरवयीन मुलींसाठी मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. बुधवारी (दि.१०) खोपोली नगरपरिषद उर्दू शाळा, हाळ बुद्रुक येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात गर्भाशयाच्या मुखाची तपासणी, स्तन तपासणी, मधुमेह व रक्तदाब तपासणी अशा विविध चाचण्या करण्यात आल्या. हाळ बुद्रुक येथील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या उपक्रमात प्रकल्प निरामाया, मुंबईखोपोली परियोजनेचे प्रोजेक्ट लीडर विठ्ठल ठाकरे, हेल्थ ॲक्सिलरेटर सरीता पेदाम आणि कम्युनिटी मोबिलायझर रविना गायकवाड यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## एसटी बसचा अपघात

**मंडणगड :** मंडणगड तालुक्यातील नारगोली टेकडी घाटात रात्री दोन वाजता एसटी बसचा भीषण अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे. ही बस वाकडा आंजर्ले परळ पालवणी मार्गे अशी मार्गस्थ झाली होती. बसचे चालक विनोद सोनवणे हे नव्यानेच महामंडळात रुजू झाले असल्याची माहिती प्राप्त होत आहे. या अपघातात एसटीचे ब्रेक निकामी झाल्याने बस रस्ता सोडून खाली झाडी झुडपात अडकून पडली. यात जखमी झालेल्या बस चालक व वाहक यांना तातडीने उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# गरुड भरारी घेणारे, दोस्तीच्या दुनियेतील राजाशेठ



दत्तात्रेय म्हात्रे

नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात रस्ते बांधकाम क्षेत्रात अग्रक्रमाने घेतले जाणारे नाव म्हणजे पी. पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन कंपनी. उच्च गुणवत्ता आणि टिकाऊपणा हे पी. पी. खारपाटील कंपनीच्या कामाचे वैशिष्ट्य. व्यवस्थापकीय संचालक पी. पी. खारपाटील यांच्या नेतृत्वाखाली या कंपनीच्या भरभराटीत सह व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र शेठ खारपाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. राजेंद्रशेठ खारपटील यांचा जन्म १२ डिसेंबर १९६५ रोजी चिरनेर येथे शेतकरी कुटुंबात झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुठलेही साधन नसताना, कंत्राटदारी क्षेत्रात अवघ्या ३६ वर्षात पी. पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कायद्यांतर्गत नव्या कंपनीमध्ये विलीन करण्यात आली. बैलगाडीपासून कंत्राटी कामाला सुरुवात केलेल्या या कंपनीने आता अद्यावत अशी परदेशी बनावटीची यंत्रसामग्री पदरी बाळगली आहे. रस्ते बांधकामात जिल्ह्यात दर्जा हे कंपनीचे ब्रीदवाक्य आहे. उरण परिसरात गत दहा–बारा वर्षात कोट्यावधी रुपयांपेक्षा जास्त रस्त्यांची कामे पूर्ण केली आहेत. चिरनेरचे यशस्वी उद्योगपती पी. पी. खारपाटील यांचे उद्योगपती राजेंद्रशेठ खारपाटील हे धाकटे बंधू आहेत. अत्यंत प्रेमळ, मनमिळावू, कुटुंबावर जीवापाड प्रेम करणारे आणि मनाला पटेल तेच करणारे असे राजाशेठ या नावाने ओळख असणारेराजेंद्रशेठहेगरजूंचेआधारवड आहेत. चिरनेर गावावर त्यांचे नितांत प्रेम आहे. आधुनिकता तत्पर सेवा आणि विनम्रता या आधारे रस्ते बांधकाम व्यवसायात या खारपाटील बंधूंनी आपली अनोखी मोहर उमटविली आहे. परिणामी व्यवसायाचा वाढलेला प्रचंड आवाका तरीही त्यातून आपल्या कुटुंबासाठी सदैव उपलब्ध असणारे हे दोन्ही बंधू कुटुंबवत्सल म्हणूनच ओळखले जातात. त्यांच्या एवढ्या मोठ्या कामाच्या व्यापातून कुटुंबासाठी वेळ देण्याची सहसा न जमणारी कला या दोन्ही बंधूंना चांगलीच अवगत आहे. त्यांच्यासाठी कुटुंब हे सर्वस्व आहे. उतारवयात त्यांचे आई–वडील ज्यावेळी आजारी होते. त्यावेळी राजेंद्रशेठ खारपाटील यांनी आई–वडिलांना दैवत मानून त्यांची खूप प्रामाणिकपणे सेवा केली. आज त्यांचे आई–वडील हयात नाहीत. केवळ कुटुंबासाठीच नव्हे तर अडल्या–नडल्यांना मदतीचा हात देणाचे काम हे दोन्ही बंधू आजही करीत आहेत. चिरनेर विभागातील प्रत्येक व्यक्ती त्यांच्या संपर्कात असून, सर्वांना संघटित करून, ते गावातील समस्या सोडवण्यासाठी हवी ती मदत करतात. गावातील कोणतीही समस्या चर्चा करून सोडविण्यात त्यांचा हातखंडा आहे. राजेंद्रशेठ खारपटील यांचा मित्रवर्ग देखील भरपूर आहे. मैत्री करताना ते निस्वार्थी पद्धती–ने ते आपले मित्र जोडतात. आज त्यांच्याकडे उद्योग, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक आणि शालेय जीवनातील देखील मित्रांचा अफाट संग्रह आहे.

सामाजिक कार्यात त्यांनी चिरनेर गावातील श्रीराम मंदिराचा जीर्णोद्धार, संत गोरोबा काका मंदिराचा जीर्णोद्धार, चिरनेर महागणपती मंदिराच्या सभा मंडपाचे सुशोभीकरण, कातळपाडा दत्त मंदिराच्या दुरुस्तीसाठी मदत, चिरनेर येथील श्री महागणपती स्वागत कमानीचे काम, चिरनेर प्राथमिक शाळेच्या इमारतीसाठी आर्थिक मदत, चिरनेर स्मशानभूमीच्या सुशोभीकरणाबरोबर खाडीवर दशक्रिया विधी चौथारा बांधून, येथील जनतेची दशक्रिया विधीची गैरसोय दूर केली आहे. तर रांजणपाडा येथील शिवाजी महाराजांच्या नियोजित स्मारकास १५ लाख रुपयांची आर्थिक मदत. आणि महत्त्वाचे म्हणजे चिरनेर परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी शाळा महाविद्यालय तसेच इंग्रजी माध्यमाचे विद्या संकुल उभारले आहे. या विद्या संकुलनाच्या वास्तूला आपल्या आई–वडिलांचे नाव देऊन त्यांची आठवण जपली आहे. जनसामान्यांसाठी काम करणारा एक कार्यकर्ता अशीही त्यांची ओळख आहे. त्यांनी आपल्या कंपनीच्या माध्यमातून चिरनेर गावात अनेक विकास कामे केली आहेत. समाजातील उदयोन्मुख खेळाडूंना संधी मिळावी, यासाठी ते क्रिकेटच्या स्पर्धांना सहकार्याची मदत करतात. सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमात समाधान शोधणाऱ्या राजेंद्रशेठ खारपाटील यांच्या मजबूत खांद्यावर उद्योगपती पी.पी. खारपाटील यांचा हात आहे. प्रत्येक यशस्वी व्यक्ती पाठी एक स्त्री असते. असे म्हणतात. राजेंद्रशेठ यांना अगदी तशीच साथ सहचारिणी सुनिताताई यांची लाभली आहे. राजेंद्रशेठ खारपाटील यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या यशाचा आलेख असाच चढता राहो, अशा त्यांच्या जन्मदिनी शुभेच्छा देताना, मनस्वी आनंद होत आहे. त्यांना उत्तम आरोग्य व आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

## निवडक



### परप्रांतियांना जमीन न देण्याचा ठराव

**तळा :** तालुक्यातील कलमशेत ग्रामस्थ व मुंबई मंडळाने क्रांतिकारी निर्णय घेतला असून गावची जमीन बाहेरील व्यक्ती व परप्रांतियांना न विकण्याचा ठराव गावस्तरावर मंजूर करण्यात आला आहे. गावकरी व मुंबईकर यांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. गेल्या काही वर्षांपासून गावातील काही शेतकरी आपल्या आर्थिक लाभासाठी परप्रांतियांना जमीन विकत आहेत. त्यामुळे या जमीनवर कपांऊड तयार करुन इतर शेतकरी बांधवांना रस्ता सुद्धा मिळत नाही. त्यामुळे ग्रामस्थ व परप्रांतीय यांच्यात वाद होत असतात. यामुळे ग्रामस्थांनी एकजूट होऊन परप्रांतियांना शेतजमिनी न विकण्याचा निर्णय घेतला असून तसा ठराव करून गावा बाहेरील अगर परप्रांतियांना व्यक्तीच्या लाभात महसूल तालुका कार्यालयाकडे मौजे कलमशेत येथील खरेदी खत बक्षीस पत्र कोणतेही मालकी हक्क हस्तांतरित होणारे दस्त महसूल दप्तरी नोंदणी करु नये अशा आशयाचे पत्र तळा तहसीलदारांना देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग, पोलीस निरीक्षक तळा तहसीलदार कार्यालय, दुय्यम निबंधक तळा, तलाठी सजा कार्यालय, सरपंच ग्रुप ग्रामपंचायत सोनसडे, यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी महादेव कुंभेकर, चंद्रकांत वतारे, प्रभाकर खांडेकर, मंगेश शेंपुडे, केशव बाईत, महादेव करण, मंगेश शेंपुडे, जानु अडखळे, हिराजी खांडेकर, पांडुरंग किंजळे, भागोजी कुंभेकर यांच्या सारख्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे गावातील शेतकरी बांधवाच्या जमीन वाचतील अशी आशा गावकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

### तरुणाच्या खात्यातून रक्कम लंपास

**पनवेल :** नवी मुंबई बँक तसेच गुगल पे अकाऊंट ब्लॉक झाल्याचे सांगत एका सायबर चोरट्याने ऑनलाइन पद्धतीने तळोजा येथे राहणाऱ्या २२ वर्षीय तरुणाकडून तब्बल २२ लाख ८९ हजार रुपये ऑनलाइन उकळल्याची घटना समोर आली आहे. पवन असे या तरुणाचे नाव असून त्याच्या वडिलांनी त्याच्या ना–वावर बँकेत ठेवलेली फिक्स डिपॉझिटची संपूर्ण रक्कम या सायबर चोरट्याने लाटली. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. गेल्या ऑगस्टमध्ये रविकुमार यादव असे नाव सांगणाऱ्या एका सायबर चोरट्याने या तरुणाशी संपर्क साधून त्याचे बँक अकाऊंट व गुगल पे ब्लॉक झाल्याचे सांगत हे अकाऊंट पुन्हा सुरू करायचे असेल तर ओटीपी पाठवावा लागेल, असे सांगितले. त्यामुळे घाबरलेल्या पवनने त्याच्या मोबाईलवर आलेले सर्व ओटीपी रविकुमार याला पाठवले. या ओटीपींचा गैरवापर करून सायबर चोरट्याने २९ ऑगस्ट रोजी १८ लाख रुपये आणि १ सप्टेंबर रोजी आणखी ४ लाख ८९ हजार रुपये असे एकूण २२ लाख ८९ हजार रुपयांचा ऑनलाइन व्यवहार करून रक्कम लंपास केले. ही माहिती पवनला समजल्यावर त्याने ती घरच्यांना सांगितली व त्यानंतर त्याने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### एड्सविषयी जनजागृतीचे आयोजन

**उरण :** यु.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजना तसेच रेड रिबन क्लब आणि इंदिरा गांधी हॉस्पिटल, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार (दि.९) रोजी एड्स विषयी जनजागृती आयोजन केले होते. कार्यक्रमाला इंदिरा गांधी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कोडेल, महादेव पवार, लॅब टेक्निशियन तृप्ती परजणे, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. इंदिरा गांधी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कोडेल यांनी विद्यार्थ्यांना एड्स विषयी माहिती तसेच समुपदेशा याबद्दल मार्गदर्शन केले. हॉस्पिटलतर्फे मोफत एड्सची तपासणी करुन घेऊ शकतात असे सांगितले.



### सागरी सुरक्षा अभियान अंतर्गत रॅली

**उरण :** उरण दिल्ली येथील बॉम्बस्फोटानंतर देशभरात अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये या निमित्ताने कडेकोट बंदोबस्तासह, तपासणी सुरु करण्यात आली आहे. पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला आहे. जिल्ह्या–तील सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी दोन दिवस सागरी सुरक्षा कवच अभियान नवीमुंबई, रायगड पोलीसांच्या वतीने राबविण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून संशयास्पद बोटींवरील हालचालीवर लक्ष ठेवण्याबरोबरच रस्ते, खाडी, नदी, समुद्रकिनाऱ्यावरील हालचालींवर नजर ठेवण्याचे काम केले जाणार आहे.त्याचा एक भाग म्हणून पनवेल पोलीस ठाण्याच्या वतीने नूकताच केळवणे ग्रामपंचायत हद्दीत सागरी सुरक्षा कवच अभियान अंतर्गत मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

# सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे टीव्ही संच भेट



**। सोगाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बांधण येथील अनाथ आश्रम संपर्क बालग्राम येथील विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमातून अभ्यासाचे धडे गिरवता यावेत यासाठी शनिवार (दि.६) डिसेंबर रोजी सक्षम एज्युकेशन सोसायटी तर्फे स्मार्ट टीव्ही संच भेट देण्यात आला. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना सकस खाऊचे वाटप करण्यात आले. अमृता दुर्वे, दिनेश ठाकूर, विशाल आमले, ओंकार आमले यांच्या आर्थिक मदतीतून सदर स्मार्ट टीव्ही संच भेट देण्यात आला.

अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सक्षम एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून भेट देण्यात आलेला स्मार्ट टीव्ही संच मदत करेल अशी अपेक्षा शार्दूल काठे यांनी व्यक्त केली. तर आभार प्रदर्शन करताना विद्यार्थी प्रतिनिधीनी सक्षम सोसायटीतर्फे वेळोवेळी झालेल्या मदतीची आठवण करून देत आभार मानले.

या कार्यक्रमाप्रसंगी सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे विशाल आमले, परेश सुर्वे, ओंकार आमले, गणेश पाटील, सिध्दराज तरंगे, दिनेश ठाकूर, वासुदेव आमले, श्रुषण पाटील, शार्दूल काठे उपस्थित होते.

## वलप येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** आळंदी येथे पायी दर्शनाला जातो, असे सांगून वलप येथील राहत्या घरातून गेलेला २८ वर्षीय तरुण अद्याप घरी परत आला नाही. त्यामुळे तो हरव–ला असल्याची तक्रार त्याच्या घरच्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. परेश टेंभे असे त्याचे नाव असून, तो साई मंदिर–वलप येथे राहणारा आहे. त्याची उंची पाच फूट सहा इंच, रंग गोरा, वाढलेली दाढी, मिशी वाढलेली आहे. मात्र कमी ऐकू येते. असा तरुण कोणाला आढळल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसंनी केले आहे.



## महिला सुरक्षेसाठी युवती सेनेचा पुढाकार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील वि. के. हायस्कूल तसेच वडाळे तलाव परिसरात विद्यार्थिनी, विद्यार्थी, पालक व नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये–जा होत असल्याने अलीकडे या परिसरात काही असामाजिक प्रवृत्तीच्या व्यक्तींची हालचाल वाढल्याचे दिसून येत आहे. विशेषतः शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत गर्दी वाढत असून परिसरात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर धनश्री भगत, राजोल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. परिसरातील वाढत्या हुल्लडबाजी, छेडछाड, महिला सुरक्षा यांसंदर्भात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

## आगरी समाज संस्थेतर्फे रक्तदान शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या पुढाकाराने आणि कच्छ युवक संघ व लायन्स क्लब अलिबाग यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार, (दि.१४) डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत कच्छी भवन, श्रीबाग अलिबाग येथे करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरासाठी कच्छी युवक संघ, लायन्स क्लब अलिबाग तसेच अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला प्रमाणपत्र व अल्पोपहार देण्यात येणार आहेत. उपक्रम यशस्वी करण्यासाठी अलिबागमधील युवक–युवती, महिला–भगिनी उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन आगरी समाज संस्था, अलिबागतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क पुढील नंबरवर संपर्क करावा निलेश पाटील ८३८०००६०६३, केतन शहा ९७६२४०१४००, महेश कवळे ९४२११७१४८०

# चंद्रकांत लोखंडेंना आदर्श शेतकरी पुरस्कार



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठान यांचा ९ वा. वर्धापन दिन मंगळवार (दि.९) डिसेंबर रोजी रोहा येथील शासकीय विश्राम सभागृहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आंबेवाडी येथील प्रगत शेतकरी चंद्रकांत गणपत लोखंडे यांनी शेतीमध्ये चांगली प्रगती करून नावलौकिक प्राप्त केल्या बद्दल रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानतर्फे आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी कृषीरत्न अनिल पाटील, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. मनोज तलाठी, पंचायत समिती कृषी अधिकारी रंजित लवाटे, किरण लेले, कोंडू पाष्टे, गणेश भगत, अनंत मगर, प्रशांत धामणसे, रमेश पाटील, नितीन पिंपले, धनंजय जोशी, हसन म्हसलाई, खेळू थिटे, भाऊ डिके, विनोद पाटील, संतोष दिवेकर, रतिश मगर, किशोर मोरे, रघुनाथ कडू, पांडुरंग भेरे, रामचंद्र म्हात्रे, दगडू बामुगडे, गोपीनाथ गंभे यांच्या उपस्थितीत चंद्रकांत लोखंडे यांना आदर्श शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल चंद्रकांत लोखंडे यांचे विविध स्थरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

# महिला अत्याचाराविरोधात ‘ऑरेंज द वर्ल्ड’ कॅम्पेन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महिलांच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी, विर वुमेन्स फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी या तिन सामाजिक संस्थानी एकत्र येऊन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मदतीने ‘ऑरेंज द वर्ल्ड’ या जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते.

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी ही महिलांमार्फत चालवली जाणारी सामाजिक संस्था आहे. इथे वेगवेगळ्या स्तरातील महिला एकत्र येऊन विविध प्रकारचे समाजकार्य तसेच जनजागृती पर उपक्रम राबविले जातात. या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर या क्लबने ‘ऑरेंज द वर्ल्ड’ या थीम अंतर्गत सर्व क्लबना महिलांच्या विरोधात होत असलेल्या अन्यायाविरोधात आपापल्या क्लबमध्ये वेगवेगळ्या माध्यमांतून जनजागृती करण्याचे आवाहन केले होते.

या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून तसेच महिलां विषयी बांधीलकी जपण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीने या रॅलीचे आयोजन केले होते. वडाळे तलाव येथुन त्याचा श्रीगणेशा करण्यात आला. रॅलीमध्ये पनवेल पोलिसांनी बाईकवरून रॅलीच्या अग्रस्थानी व अन्य सर्व सदस्य शिस्तीत त्यांच्या मागोमाग यापद्धतीने रॅली प्रामुख्याने पनवेल येथील वडाळे तलाव येथुन सुरु होऊन क्रमशः जेष्ठ नागरिक हॉल, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, जय भारत नाका, शिवाजीपुतळा, आंबेडकर पुतळा व नंतर ब्रीजखालून पनवेलबस स्टॅंडच्या रोडने पुन्हा वडाळे तलावावर येऊन रॅलीची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी अर्चना ठाकुर, सिंपल आंचलिया, युक्ती शाह, पीपी ध्वनी तन्ना, प्रतिभा डांगी, ममता ठक्कर, मौसमी गोगुला, वैशाली कटारिया, सीसी. प्रिया चतुर्वेदी, नम्रता बांठीया ,शिला शाह, डॉ . भावना मुरुडकर, किर्ती मुनोत, दुर्गा चौधरी, पुनम जैन, श्रुती निस्सर, सीमा जैन, हर्मेश तन्ना, रोहित जाधव, दिप्ती जाधव उपस्थित होते

## माथेरांनमध्ये मोफत नेत्र तपासणी



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानचे सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा व रीटाबेन शहा यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त माथेरांनमध्ये मोफत नेत्र तपासणी व डिजिटल बॉडी चेकअप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ ज्येष्ठ नागरिकांसह अनेक नागरिकांनी घेतला. शिबिरासाठी बदलापूर येथील श्रीजी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी सहकार्य केले.

डिजिटल बॉडी चेकअपसाठी डॉ. भूषण तर नेत्र तपासणीसाठी डॉ. सुशील रायकर, डॉ. किशोर काळे यांनी सेवा दिली. रक्तदाब, साखर तसेच डोळ्यांची तपासणी करण्यात आली. डोळ्यांच्या मोफत तपासणीमध्ये एकूण १९० तर बॉडी चेकअपसाठी १२० जणांनी लाभ घेतला. शिबिराच्या दरम्यान नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे, शैलेश चाफेरकर, सुनील शिंदे, दिनेश कदम, जहुर चिपाडे यांसह अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संपर्क - ९८२३५८५३२१
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे घरकामासाठी बाई, मुलगी पाहिजेत वेळ ९ ते ६. फोन ८१४९८६५६२५.
- लीफ एक्सोटिका विला वाडगाव येथे राहण्यासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे त्यासाठी पुढील नंबर वर संपर्क करावा ९८२२९३८४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## महाराष्ट्राच्या माऊंट एव्हरेस्टवर फडकवला तिरंगा | अथक मेहनतीनंतर गाठले सर्वोच्च शिखर

# ऋषिकेशची कळसुबाई शिखरावर चढाई

**। तळा । प्रतिनिधी ।**

**सेरेब्रल पाल्सी या मेंदूच्या पक्षाघाताच्या आजारावर मात करून कळसूबाई सर करणारा रायगडचा २२ वर्षीय ऋषिकेश माळी याने महाराष्ट्राच्या माऊंट एव्हरेस्टवर तिरंगा फडकवत जिद्द दाखवली. महाराष्ट्राचे माऊंट एव्हरेस्ट म्हणून ओळखल जाणारे १६४६ मीटर उंच कळसूबाई शिखर रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील सेरेब्रल पाल्सी असलेल्या ऋषिकेश माळी या युवकाने मन बुद्धी, इच्छाशक्ती, धैर्य, चिकाटी आणि अविरत प्रयत्नांच्या जोरावर सर केले आहे.**



शिखरावर पोहोचताच त्याने भारतीय तिरंगा फडकवत आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरवले. सेरेब्रल पाल्सी असू–नही असामान्य कामगिरी जन्मतः च असाध्य आणि आजन्म सोबत राहणाऱ्या सेरेब्रल पाल्सी या आजाराशीझुंजदेतानाहीऋषिकेशने शिक्षणातही उत्तुंग यश मिळवले आहे. तो रसायनशास्त्र विषयात पदवीधर असून औषध शास्त्र पदविका देखील पूर्ण केले आहे. नुकत्याच संभाजीनगर येथे झालेल्या पॅरा ऑलिम्पिक राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत त्याने तिसरा क्रमांक पटकावला होता.

बहुधा सेरेब्रल पाल्सी असलेल्या दुर्लभ श्रेणीतील असा पराक्रम करणारा तो महाराष्ट्रातील एकमेव गिर्यारोहक असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात पात्र झाला असून शास–नाने योग्य सन्मान करावा अशी मागणी दिव्यांग संघटनेकडून केली जात आहे. पालकांची भक्कम साथ मनात सुप्त इच्छा असूनही संधी मिळत नव्ह–ती. परंतु शिव ऊर्जा प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांनी आवश्यक प्रेरणा दिली आणि त्याच्या पालकांनी दिलेल्या निस्वार्थ पाठिंब्यामुळे हे स्वप्न साकार झाले.

ऋषिकेशच्या आई शितल माळी यांनी त्याला आयुष्यभर परिस्थितीशी लढण्याचे बळ, धैर्य आणि सकारात्मकता दिली. त्यांनी दिव्यांग पालकाना संदेश देताना दिव्यांग मुलांना देवघरची फुले न समजता त्यांना उभे करणे, चालायला शिकवणे, आणि जीवनात पुढे नेणे ही आपल्या पालकांची जबाबदारी आहे. असे आत्मविश्वासाने सांगत कठीण मार्ग, खाचखळगे आणि धोके ओलांडत त्याने शिखर सर केले. धुकं, अंधुक प्रकाश, काटेरी मार्ग, दगडगोटे, तीव्र चढ–उतार, ८०/९० अंशाच्या उतारांच्या शिड्या सर्व अत्यंत धोकादायक अडथळ्यांवर मात करत ऋषिकेशने आपली प्रत्येक पायरी स्थिर आणि मजबूत करत अथक मेहनतीनंतर सर्वोच्च शिखर गाठले.

> **दिव्यांग मुलांमध्ये कमतरता नसतात, त्यांची क्षमता दाखवण्यासाठी संधी आणि प्रेरणा दिली पाहिजे. प्रेरणा देणारे आणि साथ करणारे हात गिर्यारोहणासाठी अनेक व्यक्तींचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.**
> **–ऋषिकेश माळी**

ऋषिकेशला पीएनपी एज्युकेशन सोसायटी, अलिबाग ाच्या कार्यवाह चित्र–लेखा पाटील, शाळा चेअरमन समीर बनकर, शिवाजी गाडे, कचरू चांभारे, सागर बोडके, अर्जुन सोनकांबळे, चंद्रकांत शेळके, माया जगताप, फजल हलदे, राजाराम धुमाळ, रमेश जैन, नारायणसिंग राजपूत या मंडळींनी ऋषिकेशला शुभेच्छा दिल्या आहेत.

## चालत्या दुचाकीला आग

**खोपोली :** सध्या अनेक ठिकाणी दुचाकी, चारचाकी व इतर वाहने शॉर्टसर्किट व वाहनातील बिघाडामुळे जळत असल्याच्या अनेक घटना घडत असताना खोपोली शहरातील ज्येष्ठ पत्रकार रवींद्र मोरे यांच्या चालत्या दुचाकीने १० डिसेंबरच्या दुपारच्या सुमारास चिंचवली येथे अचानक पेट घेतला. यामध्ये दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाली असून, दुचाकीला शॉर्टसर्किटने आग लागल्याची समोर आले आहे. तर, आगीत सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही. सध्या वातावरणातील बदलामुळे अनेक ठिकाणी वाहनांमध्ये बिघाड होत असताना यामध्ये प्रामुख्याने शॉर्टसर्किट व सी.एन.जी इंधन वाहने उन्हामुळे तापत असल्यामुळे अनेक वाहनांमध्ये अचानक पेट घेण्याच्या घटना वारंवार घडत असताना, खोपोली शहरातील ज्येष्ठ पत्रकार रवींद्र मोरे हे १० डिसेंबरच्या दुपारच्या सुमारास वृत्त संकलन करण्यासाठी जात असताना चिंचवली गावातील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेसमोर त्यांच्या प्लेजर स्कूटीने अचानक पेट घेतली.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### CHANGE OF NAME

I have changed my name from PREM VITHAL MHATRE to PREM VITTHAL MHATRE as per Affidavit No. 26856/2025 dated - 11/12/2025

### दस्त हरविलेला आहे

श्री.हरेश रोचीराम दुहलानी रा. मुंबई, खार पाली रोड नं.१४ खार रोड यांचा पाली सब रजिस्टर कार्यालय मधून घेतलेला ओरिजिनल खरेदीखत दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सुधागड पाली ते मुंबई खार, पाली असा प्रवास करीत असताना हरविलेला आहे.

दस्त नंबर. २२७/२०१६, २२८/२०१६

सदर दस्त कोणाला सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क : यशवंत शांताराम पाडेकर**
**मो.नं. ७०४५४५६०१२**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडुन कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहु जमिनी या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे / हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. एकनाथ नथु लदगे | ६४/५ | ०.१३.०० | ० |
| श्री. दामु रावजी कराळे | ६४/६ | ०.०९.७० | १.३७ |
| श्री. तुकाराम बापु लदगे इतर १ | ६४/७ | ०.०४.६० | ०.७८ |
| श्री. रामचंद्र बापु लदगे | ६४/८ | ०.०४.८० | ०.७८ |
| श्री. एकनाथ हिरू लदगे | ६५/१ | ०.०३.०० | ०.०३ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. योगेश तानाजी आगज**
बी.ए.एलएल. बी.
पत्ता :- फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी, मुद्रे, कर्जत, जिल्हा- रायगड - ४१० २०१
मो. नं. ७२७६८१७८९०

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकतीपैकी निरंतर वहिवाटीच्या करारनाम्याकरिता त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. महेश वामन पाटील यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| चिंचवली, ता.अलिबाग | १६/२/अ | ०-६२-५० पो.ख ०-०६-८० एकुण क्षेत्र ०-६९-३० | १६.४४ |

वर नमुद मिळकतींपैकी अंदाजे क्षेत्र ०-१०-०० हे. आर एवढे क्षेत्र निरंतर वहिवाटीच्या करारनाम्याचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक - १२/१२/२०२५

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय-रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल:ddrrgd123@gmail.com

जा.क्र./जिउनिर/गृह/मोफा क११(३)/मा.अभि/दळी प्लाजा/अलिबाग/जाहिर नोटिस/सन २०२५/२४५५

दिनांक १०/१२/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ चे कलम ११(३) अन्वये अर्जावरील जाहिर नोटिस**

अर्जदार दळी प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., वेश्वी ता. अलिबाग जि.रायगड यांनी गैरअर्जदार क्र.१ श्री संजय रमेश कौल रा.लिंकींग रोड, मुंबई आणि गैरअर्जदार क्र. २.श्री सत्यजित जि. दळी रा.मातृछाया बाजारपेठ, अलिबाग ता.अलिबाग, जि. रायगड यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

मौजे गोंधळपाडा ता. अलिबाग जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १०/२/२/अ क्षेत्र ४५५.२५ चौ.मी. व त्यावरील अर्जदार संस्थेची इमारत

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना दि.२०/११/२०२५ रोजीची नोटीस नोंदणीकृत पोच देय डाकेने बजावणी केली असता गैरअर्जदार क्र. १ यांना नोटीस बजावणी झाली आहे आणि गैरअर्जदार क्र. २ यांचे नोटीस पाकीट अपुरा पत्ता अशा शेऱ्याने परत आली आहे.

दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या सुनावणीस सर्व गैरअर्जदार गैरहजर आहेत व अर्जदार हजर आहे. अर्जदाराचा गैरअर्जदार यांना जाहिर पेपर नोटिस देणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला. सबब सर्व गैरअर्जदार यांना कळविण्यात येते की. त्यांनी अर्जदाराच्या वर नमूद अर्जाबाबत लेखी म्हणणे दाखल करण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात दिनांक १२/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित रहावे. यात कसूर झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे निष्कर्ष नोंदविण्यात येईल आणि आपले गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करून अर्जदाराच्या अर्जावर उचित निर्णय देण्यात येईल.

ठिकाण : अलिबाग
दिनांक १०/१२/२०२५

सही/-
**(डॉ. सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

### जाहीर नोटीस
### (टायटल व्हेरिफीकेशन कामीची)

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन:-** तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालूका पनवेल पैकी, **मौजे चिंध्रण** या गावचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी गट क्रमांक व उपविभाग क्र. ११०/२ यांसी **एकूण क्षेत्र ०३ हेक्टर ४६ आर** यांसी आकार रु.५८.८२ पैसे हि मिळकत **श्री महेंद्र मिलापचंदजी कानुगो व पारस मेघराज जैन यांचे मालकीची तसेच श्री अमृतलाल मनरुपजी कोठारी व श्री महेशकुमार डुगरमलजी चांडक ध्रुव लॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार.**

सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफीकेशन कामी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द करण्यात येते आहे. तरी सदर मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे, चार्ज, बोजे, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, जनरल मुखत्यार, विकसन करारनामा, संपादन, आरक्षण, जप्ती, कोर्ट कारवाई, अशा कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास सदरच्या संबंधित इसमांनी सदरची जाहीर नोटीस **प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत** आमचे खालील नमुद पत्यावर लेखी व साक्षांकीत कागदपत्रांनिशी हरकती नोंदवाव्यात तरी दिलेल्या मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजनेत येईल, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही तसेच परस्पर वर्तमानपत्रात येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे ही जाहीर नोटीस.

**पनवेल.**
**दिनांकः- ११-१२-२०२५**

सही/-
**ॲड. सुरेश एस. धामणे**
ऑफीस नं. पी-२, मेघदुत शॉपींग सेंटर, जिल्हा व सत्र न्यायालय,
नाशिक समोर, नाशिक. ४२२००८ मो.नं. ९४२३५६९१३७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर ७७३, एकूण क्षेत्र ०-२८-३० हे.आर., आकार ७.२२ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०४-०० हे. आर., आकार १.१० रू.पैसे ही मिळकत, (तदनंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक सोनाली सुर्यकांत पाटील रा. बी ५०२, राज मंदिर कॉम्प्लेक्स, मीरा भायंदर रोड, विनय नगरच्या मागे, ठाणे. ४०११०७ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख ११/१२/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,रूम नं.५,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, यांजकडून अधिसूचना

### भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये.

क्रमांक उविअ/कात-२/भूसं./ महान / एस.आर.०९/२०२३. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ / अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड- अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची- एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे) मौजे महान, ता. अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्पाकरिता संपादन या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची- दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची - चार मध्ये दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, दिनांक ऑक्टोबर ७, २०२५ अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १० क द्वारे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत लोक हितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण-दोन च्या आणि प्रकरण-तीन च्या तरतूदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आलेली आहे. (सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास).

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची- पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे हेतुपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांचेकडील आदेश क्रमांक भुसं/टे-६/९८१९३३/मौजे महान/२०२३, दिनांक २९ नोव्हेंबर २०२३ अन्वये उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची- एक जमिनीचे वर्णन
### गावाचे नाव :- मौजे महान, ता. अलिबाग, जि. रायगड

| अ. क्र. (१) | स.नं./हि.नं./ गट नंबर (२) | आवश्यक जमिनीचे आदमासे क्षेत्र (हे.आर.) (३) | अ. क्र. (४) | स.नं./हि.नं./ गट नंबर (५) | आवश्यक जमिनीचे आदमासे क्षेत्र (हे.आर.) (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४ पै. | ०-११-३५ | ८ | १९८ पै. | ०-१३-०५ |
| २ | १५ पै. | ०-०१-४० | ९ | १९९ पै. | ०-३२-९० |
| ३ | ३७ | ०-००-०६ | १० | २०० पै. | ०-२४-५० |
| ४ | ४२ | ०-३६-०० | ११ | २०१ पै. | ०-१३-१० |
| ५. | १५६ | ०-००-०५ | १२ | २०२ पै. | ०-१७-७० |
| ६ | १७९ | ०-०२-०० | १३ | २०३ पै. | ०-४१-५५ |
| ७ | १८५ | ०-१६-२० | | **एकूण** | **२-०९-८६** |

### अनुसूची- दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** मौजे महान, ता. अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्पाकरिता संपादन

**प्रकल्पकार्याचे वर्णन :** मौजे महान, ता. अलिबाग येथील जमीन सांबरकुंड मध्यम प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रासाठी भूसंपादन करण्यात येणारी जमीन महान गावठाणाच्या हद्दीत येत आहे. प्रस्तावित भूसंपादनाच्या जमिनीशेजारी महान गावातील १३० ते १४५ घरांची वस्ती आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :** अलिबाग शहराचे औद्योगिक महत्त्व वाढते नागरीकरण व वाढते पर्यटन यांचे महत्त्व विचारात घेता येत्या दशकात अलिबाग शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल. वाढत्या शहरीकरणाच्या दृष्टीने पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, तसेच अलिबाग तालुक्यातील ३३ गावांमधील २५२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यास मदत होईल. सांबरकुंड धरणामुळे पूर नियंत्रणाचा प्रश्न मार्गी लागेल. लोकांच्या मते (१) पोहोच रस्त्यामुळे पुनर्वसन गावठाणात राहणाऱ्या नागरीकांची जाण्यायेण्याचे सोय होणे (२) नागरीकांना पिण्याच्या पाण्याची सोय करणे, (३) प्रकल्पामुळे सिंचन निर्मिती होणे (४) ओद्योगिकरणामुळे रोजगार निर्मिती होणे (५) धरणामुळे पूर नियंत्रणाचा प्रश्न मार्गी लागणे. (आर्थिक रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा व इतर लाभांसंदर्भात)

### अनुसूची- तीन

**बाधीत व्यक्तींची विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :** बाधीत व्यक्तींची जमीन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे त्यांचे विस्थापन करणे आवश्यक आहे.

### अनुसूची- चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :** अलिबाग शहराचे औद्योगिक महत्त्व, वाढते नागरीकरण व पर्यटन यांचे वाढते महत्त्व लक्षात घेता, येत्या दशकात अलिबाग शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल. वाढत्या शहरीकरणाच्या दृष्टीने पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, तसेच, अलिबाग तालुक्यातील ३३ गावांमधील २५२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यास मदत होईल. सांबरकुंड धरणामुळे पूर नियंत्रणाचा प्रश्न मार्गी लागेल. या प्रकल्पाच्या प्रस्तावित खाजगी जमिनीचे भूसंपादनाकरिता सामाजिक परिणाम निर्धारणामधील उक्त अधिनियमाच्या कलम १० क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत महाराष्ट्र शासन याद्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून शासनाच्या एसआयए-२०२४/प्र.क्र. ३१८/अ-२, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ अन्वये उक्त प्रकल्पाचे भूसंपादन करण्याकरिता सूट प्राप्त झालेली आहे. तरी सदरची भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

### अनुसूची-पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा :** निरंक

(टीप - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.)

ठिकाण : अलिबाग,
दिनांक २१ नोव्हेंबर २०२५.

**मुकेश चव्हाण,**
**उप विभागीय अधिकारी, अलिबाग,**
**उप विभाग अलिबाग.**

**क्र. जिमाका/राअ/जाहि/३०९/२०२५-२६**

# अतितीव्र दिव्यांगांना मिळणार आर्थिक बळ

## दैनंदिन गरजा भागविण्यासाठी योजनेचा होणार फायदा



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील अतितीव्र दिव्यांगांना निर्वाह भत्ता मिळणार आहे. रायगड जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पामध्ये या योजनेचा समावेश केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो दिव्यांगांना आर्थिक बळ या योजनेच्या माध्यमातून मिळणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या संकल्पनेतून या योजनेचा फायदा दैनंदिन गरजा भागविण्यासाठी दिव्यांग व्यक्तींना होणार आहे.

रायगड जिल्ह्यातील दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने वेगवेगळ्या योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये स्कुटरविथ ॲडपशन तसेच दिव्यांग व्यक्तींना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे, यासाठी फिरते वाहनदेखील देण्यात आले होते. एकूण १०० हून अधिक दिव्यांगांना या योजनेचा लाभ मिळाला होता. या योजनेच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय उभारण्याची संधी दिव्यांग व्यक्तींना मिळाली. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या संकल्पनेतून दिव्यांग कल्याण निधीमधून दिव्यांग व्यक्तींसाठी एक नाविन्यपूर्ण योजना राबविला जाणार आहे. अतितीव्र दिव्यांग व्यक्तींसाठी निर्वाह भत्ता देणे ही योजना आहे.

योजनेसाठी लाभार्थी निवडीबाबतचे निकष, अटी व शर्ती आवश्यक कागदपत्रे निश्चित करण्यात आले आहेत. योजनेसाठी विहित नमुन्यातील अर्ज तयार करण्यात आलेले असून, अर्ज गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गाव पातळीवर सर्व ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे दिव्यांगत्वाचे प्रमाण ६० टक्के किंवा ६० टक्क्यापेक्षा जास्त असावे. जिल्हा शल्यचिकित्सक, सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्रधारक असावा, अर्जदाराकडे केंद्र शासनाच्या नवीन कायद्यानुसार दिव्यांगत्वाचे फक्त युडीआयडी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. जुने इतर प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती हा ग्रामीण भागासह रायगड जिल्ह्यातील रहिवासी असणे गरजेचे आहे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

लाभार्थ्याकडे ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे, लाभार्थ्यांचे वय १८ वर्ष व त्यापेक्षा जास्त असावे. उत्पन्नाचा दाखला अथवा दारिद्र्यरेषेखालील दाखला. (उत्पन्न मर्यादा १ लाखाचे आत) कुटुंब दारिद्र्यरेषेखालील असल्यास ग्राम सेवक किंवा गटविकास अधिकारी यांचा त्याबाबतचा संयुक्त दाखला, कुटुंब दारिद्र्यरेषेखालील नसल्यास उत्पन्नाचा दाखला तहसीलदार यांच्याकडील आवश्यक आहे, लाभार्थी शासकीय, निमशासकीय कर्मचारी किंवा निवृत्ती वेतन (पेन्शन) धारक कर्मचारी नसावा, अशी अटी-शर्ती लागू करण्यात आल्या आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये २९ हजारांहून अधिक दिव्यांग आहेत. त्यामध्ये साधारणतः पाच हजारांहून अधिक अतितीव्र दिव्यांग असल्याची शक्यता आहेत. त्यामुळे हजारो दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ मिळणार आहे. रायगड जिल्हा परिषदेने दिव्यांग कल्याण निधीमधून दिव्यांग व्यक्तींसाठी नाविण्यपूर्ण योजना म्हणून अतितीव्र दिव्यांग व्यक्तींना निर्वाह भत्ता देणे या योजनेचा अर्थसंकल्पामध्ये समावेश केला आहे. त्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव ३१ डिसेंबरपूर्वी गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयामध्ये सादर करावेत, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.

> उत्पन्नातील ५ टक्के निधी खर्च करण्याची तरतूद आहे. त्यामध्ये ५० टक्के सार्वजनिक व ५० टक्के वैयक्तीक लाभ दिला जातो. वैयक्तीक लाभ वस्तू देण्यापेक्षा दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन गरजा भागविण्याबरोबरच इतर कामांसाठी हा निधी उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे अतितीव्र दिव्यांग व्यक्तींसाठी निर्वाह भत्ता योजना सूरू केली जाणार आहे.
>
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

# निवडक



## पर्यावरण संवर्धनासाठी रॅलीचे आयोजन

**वेणगाव** : गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूल, कर्जततर्फे मंगळवार (दि. ९) डिसेंबर रोजी पर्यावरण संवर्धनासाठी पेडल फॉर प्लॅनेट या प्रभावी रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रदूषण नियंत्रण, हरित वाहतूक, अन्न वाया न घालवणे, सृष्टी संवर्धन या विषयांबद्दल जनजागृती घडवून आणणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता. रॅलीची सुरुवात कर्जत मार्केट, पोलीस ग्राऊंड, कन्या शाळा, नगरपरिषद, मारवाडी पेठ मार्गे पुन्हा शाळेत विद्यार्थ्यांनी फेरी मारत पूर्ण केला. प्रदूषण टाळा, सृष्टीची काळजी घ्या, अन्न वाया घालवू नका, हरित ग्रह निर्माण करा अशा समाज प्रबोधनात्मक घोषणा असलेले फलक घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. रॅलीचे प्रमुख आकर्षण म्हणजे सायकलस्वार विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग. पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेश देत त्यांनी पेडल फॉर प्लॅनेट या संकल्पनेला अधिक बळकटी दिली. या रॅलीत रोटरी क्लबचे अरविंद जैन, दीपचंद जैन, जितू ओसवाल, सचिन ओसवाल, योगेश राठी, सचिन पटेल, हुसेन जमाली तसेच कर्जत पोलीस दलाचे कर्मचारी उपस्थित होते.



## बार्न्स कॉलेजमध्ये जागरूकता व्याख्यान

**नवीन पनवेल** : कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, पनवेल येथे (दि.१०) डिसेंबर रोजी मानवाधिकार दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पनवेल शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांनी विद्यार्थ्यांना मानवाधिकारांचे संवैधानिक महत्त्व, कायदेविषयक सजगता आणि तरुण वर्गाची सामाजिक जबाबदारी याबाबत सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या ज्ञानसमृद्ध कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सीईओ डॉ. शिवदास कांबळे, प्राचार्य डॉ. कल्पेश भोईर तसेच उपप्राचार्या के.डी. शारा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी उत्तमरित्या पार पाडले. या प्रसंगी पनवेल शहर पोलीस स्टेशनचे मनोज पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मानवाधिकारा विषयी जागरूकता वाढवत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व कायदेविषयक भान दृढ करणारा हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.



## क्रिएटिव्ह रायटिंग स्पर्धा उत्साहात

**नवीन पनवेल** : कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, पनवेल येथे (दि.८) डिसेंबर रोजी डीएलएलई व एन एस एस विभागातर्फे क्रिएटिव्ह रायटिंग स्पर्धा व वकृत्व स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपली चमकदार कामगिरी नोंदवली. कार्यक्रमासाठी डॉ. शिवदास कांबळे, प्राचार्य कल्पेश भोईर, उपप्राचार्या के.डी. शारा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेसाठी दिलेले स्वयंचलित विषय विद्यार्थीमित्र आणि सामाजिक भान जागवणारे होते. अन्न वाचवा, महिला सक्षमीकरण, सोशल मीडिया, पर्यावरणाचे रक्षण, माझे करिअर, आरोग्य सेवा, भारताचे संविधान, निवडणूक साक्षरता, ज्येष्ठ नागरिकांची काळजी इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार जोमदारपणे व्यक्त केले. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. तर प्रा. रुपाली अहिवले, प्रा. शुभांगी जोशी, प्रा. तेजल जाधव यांनी परीक्षक म्हणून परीक्षणाची जबाबदारी पार पाडली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. चंद्रकांत मुकादम, प्रा. गीता कोरके व चेतना मॅडम यांचेही विशेष सहकार्य लाभले. एकंदर कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला नवी दिशा देत ज्ञान, विचार आणि अभिव्यक्तीचा सुंदर संगम घडवून आणला.



## नुकसानग्रस्त कुटुंबाला मदत

**चिरनेर** : रसायनी तालुक्यातील कांबे गावात विठ्ठल म्हात्रे व वसंत म्हात्रे, योगेश म्हात्रे यांच्या घराला रविवारी (दि.७) शार्टसर्किटमुळे भीषण आग लागली. मात्र, आगीत कोणतीही जीवितहानीची दुर्घटना झाली नव्हती. आगीच्या दुर्घटनेचे वृत्त समजताच सामाजिक बांधिलकी जपणारे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी मंगळवार (दि.९) घटनास्थळी धाव घेऊन, घरांची पाहणी करुन म्हात्रे कुटुंबीयांना ५० हजार रुपयांची मदत करून, त्यांना सहकार्य केले. यावेळी ज्येष्ठ नेते नाना म्हात्रे, राम कुरंगळे, देविदास म्हात्रे, निखिल डवळे, डॉ. संजय कुरंगळे, विनायक डवळे, शैलेश कुरंगळे, समाधान म्हात्रे, के. डी. म्हात्रे, नितीन म्हात्रे, दिनकर म्हात्रे, जनार्दन म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, नयन म्हात्रे, नरेश म्हात्रे, अतुल कुरंगळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कांबे गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## ईट-प्ले रीड अभियानातर्फे जनजागृती

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

उत्साहवर्धक उपक्रमात, ईट प्ले रीड या ना-नफा संस्थेने निरोगी खाणे, आनंदी खेळ आणि उत्सुक वाचनाला नवीन उंचीवर नेण्याचे ध्येय हाती घेतले आहे. अलीकडेच, संस्थेने दैनंदिन जीवनात या महत्त्वाच्या घटकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी चिपळूणमधील शाळा कळंबस्ते येथे भेट दिली. सकारात्मक प्रभाव पाडण्याच्या वचनबद्धतेने संतुलित जीवनशैली राखण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ईट प्ले रीड टीमच्या सदस्यांनी तेथील विद्यार्थी आणि शिक्षक यांना एक सादरीकरण दिले. सादरीकरणाने केवळ सकस आहाराचे फायदे अधोरेखित केले नाहीत तर खेळाचा आनंद आणि उत्सुक वाचनाच्या परिवर्तनीय शक्तीवरही भर दिला. या संदेशांना बळकटी देण्यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये लक्षवेधी प्लेकार्ड आणि विचारपूर्वक तयार केलेल्या डायरीचे वाटप केले.

ईट प्ले रीड टीमने पोहोचलेल्या मुलांचा आत्मविश्वास वाढल्याने त्याचा परिणाम दिसून आला. यापैकी अनेक विद्यार्थ्यांना, ज्यांनी यापूर्वी असे प्रोत्साहन अनुभवले नसेल, त्यांना संस्थेच्या संदेशातून प्रेरणा मिळाली. संवादात्मक आणि माहितीपूर्ण सादरीकरणाने कुतूहल जागृत केले, असे वातावरण निर्माण केले जेथे मुले केवळ शिक्षित नसून सकारात्मक जीवनशैली निवडी करण्यासाठी सक्षम आहेत.

## लक्ष्मण शिंदे यांचे निधन

| रसायनी | प्रतिनिधी |



रसायनी परिसरातील मोहोपाडा, खाने आंबिवली गावचे लक्ष्मण शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे रसायनी आणि आसपासच्या परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांचा अंत्यविधी पाताळेश्वर मंदिराजवळील स्मशानभुमीवर करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधीही होणार आहे. तसेच उत्तरकार्य त्यांच्या खाने आंबिवली येथील राहत्या घरी होणार आहेत.

## एलएसपीएम महाविद्यालयातर्फे एड्स जनजागृती




| अलिबाग | प्रतिनिधी |

एल. एस. पी. एम. महाविद्यालय चोंढी- किहीम राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग यांच्या माध्यमातून रेड रिबन क्लब अंतर्गत कीहीम आदिवासी वाडी येथे सोमवार (दि. ८) डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन जनजागृती पंधरवडानिमित्त रा.से.यो. स्वयंसेवक, अधिकारी वर्ग यांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन एड्स बाबत तरुण वर्गात माहिती तसेच हॅन्डबील वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात आदिवासी वाडीतील तरुण वर्गातील महिला, युवक यांचा चांगला सहभाग लाभला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविंद्र ठाकूर, प्राचार्या लीना पाटील, संजय माने यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. सचिन गोंधळी, प्रा.रवींद्र म्हात्रे, कल्पना गाडे, अमित सोनावणे, करुणा म्हात्रे, मिताली म्हात्रे, लिंक वर्कर, सामाजिक विकास ट्रस्ट पेण, आशा सेविका यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग यांच्या माध्यमातून प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

## ‘विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण द्या’

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड तालुका विज्ञान प्रदर्शनाचा बक्षीस वितरण सोहळा माध्यमिक विद्यालय काशिदच्या भव्य प्रांगणात संपन्न झाला. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता व्यवसायाकडे वळण्याच्या दृष्टीने व्यवसायाभिमुख शिक्षणाची समज शिक्षकांनी करुन देण्यास सूचवले. त्यांनी विज्ञानाचे महत्त्व विशद करताना, प्रतिकृतींची संख्या कमी असली तरी चालेल, पण त्यात नावीन्य हवे असे सांगून येथील विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. नवीन शैक्षणिक धोरण, क्टिव्हीटी बेस लर्निंग, शैक्षणिक साधनांचा अध्यापनातील वापर, लेखन, वाचन, गणन या मूलभूत कौशल्यांसह व्यावहारिक चतुराई बरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्त होण्यावर भर दिला. तसेच माजी विद्यार्थी संघ कार्यान्वित करण्यावर भर देऊन, या माध्यमातून शाळांचा कायापालट करण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी केले.

यावेळी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्न मंजुषा, विज्ञान प्रतिकृती,प्रयोग शाळा परिचर प्रतिकृती, माध्यमिक व प्राथमिक शिक्षक साहित्य आदी स्पर्धेमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

यावेळी पंचायत समिती मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, राजश्री मिसाळ, महेश कवळे, सुनील पाटील, दिनेश म्हात्रे, निलेश वारगे, सुधाकर दांडेकर, पांडुरंग आरेकर, उदय दांडेकर, अभय दिवेकर, सरोज राणे, किशोर गंभे, जितेंद्र मकू, गालिब, अपेक्षा म्हात्रे यांच्यासह बालवैज्ञानिक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि चिकणी, काशिद, सर्वे गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जमीनविक्रीतून लाखोंची फसवणूक

**पनवेल** : चेरवलीतील ६० गुंठे जमीनविक्रीच्या बहाण्याने कोपरखैरणेतील एकाची ९२ लाख ७३ हजारांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल आहे. कोपरखैरणे येथे राहणारे रमेश वेटा (६९) यांची नोव्हेंबर २०११ मध्ये भीमराव राठोड याच्यासोबत पनवेलमध्ये भेट झाली होती. राठोड याने त्याच्या मालकीची चेरवली येथे ६० गुंठे जमीन असल्याचे सांगून प्रती गुंठा एक लाख रुपयाप्रमाणे ६० लाख रुपयांमध्ये विकत घेण्याचे सांगितले. त्यावेळी राठोडने बनावट सातबारा उतारे दाखवून जमीन नावावर असल्याचे भासवले होते. मार्च २०१२ मध्ये पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात जमीन खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणी करण्यात आली. त्यामुळे वेटा यांनी राठोड यांना चेकद्वारे पैसे दिले; मात्र मे २०१२ मध्ये जमिनीचे मूळ मालक वासुदेव, बाळाराम लाड दोघे असल्याचे समजले. त्यानंतर याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

## वाजेकर महाविद्यालयात कार्यशाळा

| उरण | प्रतिनिधी |



रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉमर्स कॉलेज मालन विभाग फुंडेच्या स्कूल कनेक्ट उपक्रम अंतर्गत प्राणिशास्त्र विभागाने शाळकरी विद्यार्थ्यांसाठी आकर्षक प्राणी नमुना प्रदर्शनाचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना प्राणिवैविध्याच्या अद्भुत जगाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता.

प्रदर्शनामध्ये प्राणीशास्त्राकडे उपलब्ध असलेले विविध संरक्षित प्राणि नमुने ठेवण्यात आले होते, लेखी माहिती व डॉ. धरती घरत यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन ज्यामध्ये प्राण्यांची शारीरिक वैशिष्ट्ये, बाह्य रचना आणि विविध प्राणी गट ओळखण्यासाठी उपयोगी ठरणारी प्रमुख लक्षणे यांची सविस्तर माहिती दिली.

भागुबाई चांगू ठाकुर विद्यालय, द्रोणागिरी तसेच तुकाराम हरी वाजेकर हायस्कूल, फुंडे येथील सुमारे २५० विद्यार्थ्यांनी ह्या प्रदर्शन भेट दिली. कार्यक्रमाची सांगता सहभागी शाळांचे प्राचार्य व यशस्वितेसाठी सर्वांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून झाली. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध आणि अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभव ठरले.

## बळीराजाला रब्बी हंगामाचे वेध

**अलिबाग** : तालुक्यात रब्बी हंगामात सफेद कांदा मिरची, भाजीपाला पिकांमध्ये टोमॅटो, वांगी, वेलवर्गीय पिकांमध्ये दुधी भोपळा, फुलशेतीसह तेलवर्गीय पिकांची लागवड केली जाते. मागील काही दिवसांपासून अवकाळीचे संकट सुरू असल्याने रब्बीचा हंगाम लांबला आहे. अवकाळीने विश्रांती घेतल्यानंतर आता तालुक्यातील शेतकरीवर्ग रब्बी हंगामातील पिकांच्या लागवडीकडे वळला असून, पूर्व मशागतीची कामे वेगाने सुरू आहेत. खरीप हंगामातील भातपिकाची कापणी झाली असून, झोडण्याची कामे अंतिम टप्प्यात आहेत.


## एचआयएल कंपनीत कोल्ह्याचे दर्शन

### कर्मचारी वर्गात भीतीचे सावट

| वावोशी | प्रतिनिधी |

केंद्र सरकारचा उपक्रम असणाऱ्या एच. आय. एल कंपनीच्या परिसरात नुकताच कोल्हा दिसल्याची घटना उघड झाल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. टेक्निकल बिल्डिंगच्या आवारात कर्मचारी अविनाश तांबे यांनी दुपारच्या सुमारास कोल्हा पाहिल्याचा दावा केला आहे. त्यांनी तत्काळ मोबाईलमध्ये फोटो टिपण्याचा प्रयत्न केला, मात्र कोल्हा क्षणात निसटल्याने प्रतिमा स्पष्ट मिळू शकली नाही. तरीही मिळालेल्या फोटोंच्या आधारे तो कोल्हाच असल्याचे अनेक कर्मचारी सांगत आहेत.





एच.आय.एल कंपनीचा काही भाग घनदाट झाडांनी व्यापलेला असल्यामुळे परिसर जंगलमय बनला आहे. त्यामुळे मागील काही वर्षांत या भागात विविध वन्यप्राण्यांचा वावर वाढला आहे. ३ ते ४ वर्षांपूर्वी रानडुक्करांचे संचार येथे सहज पाहायला मिळत होते. माकडे तर अजूनही संध्याकाळी झाडांवरून उड्या मारत प्लांटमधील साहित्याची तोडफोड करताना दिसत आहेत. याच दरम्यान काहींनी मोर तसेच नव्या प्रजातींचेपक्षी दिसल्याचेही सांगितले आहे.

अचानक कोल्हा आढळून आल्याने कंपनीतील कर्मचारी आता सावधगिरी बाळगण्याच्या तयारीत आहेत. वनक्षेत्र जवळ असल्यामुळे वन्यप्राणी कधीही कंपन्यांच्या आवारात शिरकाव करू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### माजी आ. बाळाराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती | दिवसभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

# गोपाळ भगतांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

| पनवेल | प्रतिनिधी |



शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक १० मधील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नागरिक, मित्रपरिवार, समर्थक आणि विविध पक्षांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने सोहळ्याला उत्साही वातावरण लाभले. पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसाला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने दिवसभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तळोजा येथील वृद्ध अनाथ आश्रमात फळ वाटप कळंबोलीतील विविध रुग्णालयांमध्ये फळांचे वितरण, अनाथ मुलांच्या शाळांमध्ये फळ वाटप, तरुणांसाठी आयोजित ङ्गमहा रोजगार मेळावाफ्ला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तरुण पिढी व्यसनाधीन होण्याची कारणे व उपाय या विषयावर गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमांमुळे दिवसभर सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि सेवाभावाची भावना जागृत राहिली.

आगामी निवडणुकीत विजयाचा आत्मविश्वास गोपाळ भगत हे प्रामाणिक, सर्वसमावेशक आणि जनतेशी नाळ जुळवणारे नेते म्हणून कळंबोलीत ओळखले जातात. नागरिकांच्या समस्यांवर मनापासून संवाद साधणे, विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे आणि कार्यात पारदर्शकता ठेवण्याची त्यांची शैली लोकांमध्ये लोकप्रिय आहे. कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवर व कार्यकर्त्यांनीही प्रभाग क्रमांक १० मधील आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीत गोपाळ भगत मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाला शेकाप पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, अनिल नाईक, प्रकाश म्हात्रे, अरविंद कडव आदी मान्यवरांनी उपस्थिती लावून अभिष्टचिंतन सोहळ्यास शुभेच्छा दिल्या आहेत.




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाची कामं विलंबानं होतील. आर्थिक बाबतीत विचारानं रहावं. नोकरीत स्थैर्य लाभणार आहे.
- **वृषभ** : कर्ज प्रकरणं मार्गी लागतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. खर्च वाढला तरी प्राप्ती वाढेल.
- **मिथुन** : मोठी गुंतवणूक तुर्तास नको. नोकरीत मान-सन्मानाचे योग आहेत. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **कर्क** : विशिष्ट कार्यावर खर्च होईल. नोकरीसाठी मुलाखतीत यश मिळेल. ओळखीतून विवाह ठरतील.
- **सिंह** : महत्त्वाची कामं वेगानं होतील. सुखद घटनांनी समाधान मिळेल. सरकारी कामं मनाजोगी होतील.
- **कन्या** : घरासंबंधी कामं मार्गी लागतील. घरात पाहुण्यांची ये-जा राहील. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.
- **तूळ** : प्रिय व्यक्तिच्या भाग्योदयाचे योग आहेत. नोकरीत स्वास्थ्य वाढेल. बदली, बढतीचे योग आहेत.
- **वृश्चिक** : कार्यास प्रसिध्दी मिळेल. अचानक धनलाभ संभवतो. व्यवसायात बदल लाभदायक ठरतील.
- **धनु** : व्यवसायात तेजी राहील. कर्जाचा भार कमी करता येईल. नव्या ओळखींपासून फायदा होईल.
- **मकर** : आर्थिक चिंता राहील. मुलांच्या प्रश्नांचा ताण वाढेल. घरगुती प्रश्नांमधून वेळीच मार्ग काढावा.
- **कुंभ** : प्रापंचिक प्रश्नातून मार्ग निघेल. व्यवसायात फसवणुकीची शक्यता आहे. विचारानं रहायला हवं.
- **मीन** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. बेरोजगारांना मनाजोगा दिलासा मिळेल. बाकी चिंता करू नये.

## दिनविशेष

### १२ डिसेंबर

१९४० : ज्येष्ठ राजकारणी शरद पवार यांचा जन्म.
१९५० : प्रख्यात अभिनेता रजनीकांत तथा शिवाजीराव गायकवाड यांचा जन्म.
२००१ : बालासोर येथे मोठ्या पल्ल्याच्या पृथ्वी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
२०१३ : अंतिम चर्चा आणि मंजुरीसाठी बहुचर्चित लोकपाल विधेयक राज्यसभेत येणार.
२०१५ : पाकिस्तानने जमिनीवरुन जमिनीवर मारा करण्याची क्षमता असणाऱ्या ‘शाहीन-३’ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.

## आरोग्यमंत्र

### रिकाम्या पोटी फळं खा!

आपल्या सर्वांना वाटतं की फळं खाणं म्हणजे फक्त फळं विकत आणून कापून खाणं. तर तसं नाही. प्रत्यक्षात रिकाम्या पोटी फळं खाल्ल्यामुळे शरीरातली विषद्रव्यं बाहेर टाकली जातात. इतकंच नाही तर तुम्हाला वजन कमी करण्यासाठी आणि इतर जीवन कार्यांसाठी मोठ्या प्रमाणात ऊर्जाही मिळते. रिकाम्या पोटी खाल्लेली फळं सहज पचतात. मात्र जेवणानंतर खाल्लेली फळं पचायला वेळ लागतो. जेवणासोबत किंवा नंतर फळं खाल्ल्यानं फळांचं संपूर्ण



सडणं आणि आंबणं घडतं. त्यातून आम्ल बनतं. म्हणून कृपया फळं रिकाम्या पोटी किंवा जेवणापूर्वी खा! सकाळी न्याहरी केल्यानंतर किंवा जेवणानंतर फळं खाल्ल्यास अनेक त्रास उद्भवतात. पोट फुगणं, शौचास जावंसं वाटणं, अपचन अशा तक्रारी निर्माण होतात. मात्र रिकाम्या पोटी फळ खाल्ल्यास हे त्रास होणार नाहीत. अन्य खाद्यपदार्थांसोबत फळं खाल्ल्यामुळे पोटात वायू तयार होतो आणि म्हणूनच पोट फुगल्यासारखं वाटतं. केस पांढरे होणं, गळणं, टक्कल पडणं, अस्वस्थ वाटणं आणि डोळ्यांखाली काळी वर्तुळं येणं हे सर्व टाळण्यासाठी आणि निरोगी राहण्यासाठी रिकाम्या पोटी फळं खाणं केव्हाही चांगलं.

## सफर देशांची

### असा हा बेलारूस

बेलारूस हा पूर्व युरोपमधला देश. ‘मन्स्क’ ही त्याची राजधानी. १९९१ पर्यंत ‘सोव्हियत युनियन’चा भाग असणाऱ्या बेलारूसच्या सीमा रशिया, युक्रेन, पोलंड, लिथुआनिया आणि लॅटव्हियाशी जोडलेल्या आहेत. २५ ऑगस्ट १९९१ या दिवशी बेलारूसला स्वातंत्र्य मिळालं. बेलारूसियन आणि रशियन या इथल्या अधिकृत भाषा. या देशात तब्बल अकरा हजार तळी असून तिथून तीन प्रमुख नद्या वाहतात. बेलारूसच्या सर्व बाजूंना जमीन असून देशाचा बराचसा भाग सपाट तर काही भाग डोंगराळ आहे. इथे कडक उन्हाळा आणि कडाक्याची थंडी अनुभवता येते. बेलारूसमध्ये वर्षाला साधारण ३० इंचांपर्यंत पाऊस पडतो. वसंत ऋतू कोरडा असतो. इथल्या जंगलांमध्ये २८ प्रकारची झाडं आणि ७० प्रजातींची झुडपं पहायला मिळतात. विविध प्रकारचे प्राणी आणि ३०० प्रजातींचे पक्षी इथे मुक्तपणे वावरतात. या देशात पाच राष्ट्रीय उद्यानं आहेत. बेलारूस जगातला ७२ व्या क्रमांकाचा श्रीमंत देश आहे. युरोपातले आघाडीचे देश आणि अमेरिकेशी फारसे चांगले संबंध नसल्यामुळे बेलारूसला बऱ्याच अडचणींना समोरं जावं लागतं. पण रशियाकडून त्यांना मदत मिळते.

## फॅशन पॅशन

### इंडो-वेस्टर्न लूक मिळवण्यासाठी...

इंडो-वेस्टर्न लूक मिळवण्यासाठी जीन्सवर पारंपरिक कुर्ती घालता येईल. कॅज्युअल ऑकेजनला तुम्ही असा पेहराव करू शकता. कुर्ती आणि जीन्सचं कॉम्बिनेशन करून हटके लूक मिळवू शकता.

लाँग कुर्ता आणि जीन्स हा लूकही बेस्ट! सध्या डेनिमच्या जेगिंग्ज मिळतात. त्यावर कुर्ता घालता येईल. जीन्सवर कोणत्याही रंगाचे कुर्ते शोभून दिसत असल्याने मॅचिंग लेगिंग शोधण्याचा त्रास वाचतो. पायघोळ फ्लोरल कुर्तीचा ऑप्शनही आहे. दीपिका पदुकोणने हा लूक कॅरी केला होता. कुर्तीवर ट्रेंडी लाँग नेकलेस घालू शकता. सिंपल कुर्तीवर लांब कानातली घालता येतील. थंडीचा अंदाज घेता कुर्ती आणि जीन्सवर बूट घालता येतील. वेगवेगळ्या स्टाईलच्या, प्रकारच्या कुर्ती बाजारात उपलब्ध आहेत. तर सखींनो, आवडत्या कु र्ती जीन्ससोबत कॅरी करा आणि व्यक्तिमत्त्वाला आगळी झळाळी द्या.

## पंचांग

**शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ. ८, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : उ. फाल्गुनी, योग : प्रीति, सूर्योदय ७.०४, सूर्यास्त १८.०१

## फॉरवर्डस

**गुरूर होनें लगा हैं उसें अपनें गुनाहगार होनें पऱ...**

**जबसें उसनें शरीफ़ लोगों क़ी असलियत देखीं...!**

## फॅशन पॅशन

थंडीच्या या काळात वॉर्डरोबमध्ये ऊबदार जॅकेट्स असायलाच हवीत. लेअरिंगसाठीही त्यांचा वापर करु शकता. स्टायलिश दिसण्यासाठी तुमच्याकडे योग्य प्रकारचं डेनिम किंवा लेदरचं जॅकेट असायला हवं. जॅकेट्सच्या विविध प्रकारांविषयी जाणून घेऊ या.

✻ या दिवसांसाठी तुमच्याकडे एखादं लेदर जॅकेट असायला हवं. योग्य कपड्यांसोबत कॅरी केलं तर या जॅकेटमुळे तुम्ही खूपच स्टायलिश आणि फॅशनेबल दिसता. महागडं असलं तरी लेदर जॅकेट पैसे वसूल लूक देतं याबद्दल कोणतीही शंका नाही. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

### यश मिळवायचं तर...

आयुष्यात नेमकं काय साध्य करावं असा प्रश्न पडणाऱ्यांची संख्या कमी नाही; परंतु हातातलं काम सोडून आवडणाऱ्या अन्य कामाची सुरुवात करण्यापूर्वी नवीन काम यशस्वीरित्या पूर्ण करण्याची किंवा त्या दिशेनं पावलं टाकण्याची क्षमता आपल्यात आहे का, याचा विचार करावा. नवीन कामातील लाभ किंवा होणारी हानी याचाही विचार व्हावा. नवीन कामात किती



भांडवल गुंतवावं लागेल, मिळणारा नफा किती असेल, तो सध्याच्या प्राप्तीच्या मानानं अधिक असेल का यावरही प्रकाश टाकला जावा. किमान सध्याच्या कमाईइतकी रक्कम नवीन कामातून मिळायला हवी. नवीन कामात हमखास यश मिळवू असा आत्मविश्वास हवा हे मान्य. पण, अतिआत्मविश्वास किंवा आंधळा विश्वास असू नये. विवाहित मित्रांनी हातातील काम सोडून नवीन काम सुरू करताना कुटुंबीयांचा विचार अवश्य करावा. नवीन कामातून अपेक्षित प्राप्ती होईपर्यंत कुटुंबीयांच्या गरजा कशा भागवणार, त्याची काही व्यवस्था आहे का हे मुद्देही महत्त्वाचे ठरतात. हाती घेतलेल्या कामात यश प्राप्त करायचं तर सातत्यपूर्ण प्रयत्न गरजेचे ठरतात. त्यासाठी चिकाटी, परिश्रमाची तयारी आणि आत्मविश्वास या बरोबरच अंगी पुरेशी सहनशीलता असण्याची आवश्यक असते. त्या दृष्टीनंही आत्मपरीक्षण करावं.

## खेचाखेची

### यादीतून गायब!

यादीतून नाव गायब होणं हा प्रकार माझ्यासाठी अजिबात नवीन नाही.

पूर्वीपासूनच या राजकारणाचा मी बळी ठरलो आहे.

.
.
.
.

दहावी बारावीच्या मेरिट लिस्टमधून सुद्धा असंच माझं नाव गायब करण्यात आलं होतं!

## वेगळं काही

सध्या व्हिएतनाममधल्या पुरूष आणि महिलांना सुंदर दिसण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलं आहे. इथली सलून्स आणि स्पा ‘फायर थेरपी’द्वारे त्यांना सुंदर बनवण्यास सज्ज आहेत. या उपचारात अंगावर टॉवेल टाकून त्याला आग लावण्यात येते. ३० सेकंद ते एक मिनिटापर्यंत हा प्रकार सुरू राहतो. या प्रकारामुळे सौंदर्यवृद्धी होतेच शिवाय निद्रानाश, डोकेदुखी, अंगदुखी यासारख्या समस्याही दूर होत असल्याचा दावा आहे. फायर थेरपीमुळे सुरकुत्यांचं प्रमाण कमी होत असल्याचं सांगितलं जातं. चीनमध्येही या तंत्राची चलती आहे. तिथे याला ‘फ्लेम फेशियल’ असं म्हणतात. ही थेरपी देताना अंगावर टाकल्या जाणाऱ्या टॉवेलवर अल्कोहोल शिंपडतात.

## फॅशन पॅशन

### प्रोफेशनल जगात वावरताना...

आजकालच्या व्यावसायिक जगात आकर्षक आणि इतरांवर छाप पाडणारं व्यक्तिमत्त्व ही महत्त्वाची बाब ठरत आहे. त्यादृष्टीनं फॅशनची काळजी घेताना स्टेटसकडंही पाहावं लागतं. त्यामुळं कपड्यांच्या निवडीबाबतचा विचार गरजेचा ठरतो. तुम्हीही प्रोफेशनल असाल, तर पेहरावाकडं लक्ष द्या.



✻ ऑफिसमध्ये शॉर्ट ड्रेस किंवा स्कर्ट घालत असाल, तर विशेष काळजी घ्यायला हवी. लोकांचं लक्ष केंद्रित होऊ नये, यासाठी योग्य ती खबरदारी घ्या. जास्त आखूड ड्रेस घालू नका. स्कर्ट आरामदायी वाटत नसेल तर पँट घाला.

✻ ऑफिसमध्ये पारदर्शक कपडे घालू नका.

✻ लहान मुलांसारखे प्रिंटेड किंवा झगमगाटी कपडे घालू नका. यामुळे तुमच्या इमेजवर परिणाम होतो.

✻ पेहरावाची निवड गरजेनुसार करा. ऑफिसचं वातावरण कसं आहे हे आधी जाणून घ्या. त्यानुसार कपडे घाला.

✻ स्थूल महिलांनी सिल्कचे कपडे घालू नयेत. यामुळे जास्त जाड दिसता. बारीक महिलांवर सिल्कचे कपडे उठून दिसतात.

## सुडोकू ३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७ | | २ | ९ | ३ | ८ | १ | |
| | ३ | | | | १ | | ५ | ६ |
| १ | ४ | ९ | | ५ | | | | |
| | | | | | | ४ | | ८ |
| | | २ | | | | ५ | | |
| ६ | | ७ | | | | | | |
| | | | | ७ | | ६ | ८ | १ |
| ७ | ६ | | ९ | | | | ४ | |
| | १ | ५ | ६ | २ | ४ | | ३ | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | १ | ६ | ५ | ८ | ९ | ४ | ७ | ३ |
| ९ | ५ | ७ | १ | ४ | ३ | ६ | ८ | २ |
| ८ | ४ | ३ | ६ | २ | ७ | ९ | १ | ५ |
| ३ | ७ | ४ | ९ | ५ | २ | ८ | ६ | १ |
| ५ | २ | १ | ४ | ६ | ८ | ७ | ३ | ९ |
| ६ | ९ | ८ | ७ | ३ | १ | २ | ५ | ४ |
| १ | ६ | २ | ३ | ७ | ४ | ५ | ९ | ८ |
| ७ | ८ | ९ | २ | १ | ५ | ३ | ५ | ६ |
| ४ | ३ | ५ | ८ | ९ | ६ | १ | २ | ७ |

## शब्दकोडे क्रमांक ३९

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | ७ | ८ | | ■ | ९ | ■ |
| १० | | | ■ | ११ | | | | | | ■ | १२ | | |
| | ■ | १३ | १४ | ■ | | ■ | ■ | १५ | | १६ | | | ■ |
| १७ | १८ | | | ■ | १९ | २० | | ■ | २१ | | ■ | २२ | २३ |
| २४ | | ■ | २५ | २६ | ■ | | ■ | २७ | | ■ | २८ | ■ | |
| ■ | २९ | ३० | ■ | ३१ | ३२ | | ३३ | ■ | ■ | ३४ | | ३५ | |
| ३६ | ■ | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ४० | | ■ | | ■ |
| ४१ | | | ■ | ४२ | | ४३ | ■ | ४४ | | ■ | ४५ | | ४६ |
| | ■ | ४७ | ४८ | | ■ | ४९ | | | ■ | ५० | | | |
| ५१ | ५२ | ■ | ५३ | | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | | ■ | |
| ५७ | | ५८ | | ■ | | ■ | ५९ | | | ■ | | ■ | ■ |
| | ■ | | ■ | ६० | | ६१ | | ■ | ■ | ६२ | | ६३ | ६४ |
| ■ | ६५ | | | | ■ | | ■ | ६६ | | | ■ | ६७ | |
| ६८ | | | ■ | ६९ | | | | | ■ | ■ | ७० | | |

**आडवे शब्द :-**
१) आपले राष्ट्रगीत
६) येणे, येऊन पोहचणे
१०) मंदोदरीचा पती
११) येरझार, जाणे व परत येणे
१२) इच्छा, वासना
१३) पणजीचे राज्य
१५) नकला करणारा
१७) अटीच्या भाषेतील जोडीने येणारे शब्द
१९) गावाखालची जमीन
२१) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ, वड
२२) मनाला टोचणारे दु:ख
२४) गवंडी
२५) सदोदित
२७) बारीक दगड, अंगठीतील रत्न
२९) होडी
३१) कमीज बरोबरचे वस्त्र
३४) रात्रभर
३७) कुबेराचा सेवक
३८) कष्ट, मेहनत, त्रास
४१) माया, प्रेम
४२) उद्याच्या नंतरचा दिवस
४४) अंगातील जोम, मस्ती
४५) भारतीय सैनिक
४७) उपयोग
४९) पृष्ठभागावरील निघालेला तुकडा
५०) आंबट-गोड चवीचे काटेरी फळ
५१) घेतलेले व्रत
५३) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
५५) सर्प
५७) खिडकीची पातळ काच
५९) बातमीचे शीर्षक
६०) नौदल, लढाऊ गलबतांचा ताफा
६२) गणेशाचे एक नाव
६५) मस्त स्त्री
६६) समोरासमोरची लढाई
६७) चामखीळ
६८) पायजमा
६९) घट्ट मिठी
७०) चुणीदार पट्टी.

**उभे शब्द :-**
१) सटरफटर
२) नूतन
३) नात्यातील मंडळी
४) नंतर
५) वंदन
६) दाह, ज्वाला, जाळ
७) प्रस्थान, जाणे
८) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
९) तादाम्य, एकरुप
१२) चुलता
१४) उत्तराधिकारी
१६) तरंग, लहर
१८) चांदी
२०) कट्टर, ठाम मताचा
२३) मनाची फिरणारी इच्छा
२६) सेवक
२८) मुलाची किंवा मुलीची मुलगी
३०) प्रजा, कुळे, कुळावरील कर
३२) सैन्यदल
३३) चेहऱ्यावरील तेज, कांती
३४) रजनी
३५) उंट हाकणारा
३६) श्री विष्णूचा पाचवा अवतार
३९) तारकांचा स्वामी असलेला चंद्र
४०) यज्ञ
४२) पुन्हा
४३) वितरण
४५) लोकसंख्येची मोजणी
४६) नको असता
४८) पडणे
५२) प्रामाणिक, सज्जन
५४) वेतन
५६) घसा, अन्नमार्ग
५८) वैरी, दावा लावणारा
५९) करपलेला भाग
६०) चहा पिकवणारे राज्य
६१) शिक्षक
६२) च्या शिवाय
६३) जुळा, जावळा
६४) वाळवी, उणीव
६५) मौज, गंमत
६६) बुद्धी नाठी करणारे वय, च्या करिता

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गो | त | पा | त | ■ | स | दा | चा | र | ■ | पि | च | का | री |
| ■ | पा | त | ळ | स | र | ■ | क | सा | ब | सा | ■ | पा | त |
| ता | स | ■ | वा | ■ | दा | द | र | ■ | द | रा | रा | ■ | भा |
| प | नी | र | ■ | भा | र | ■ | मा | द | क | ■ | ग | व | त |
| ■ | स | मा | धा | न | ■ | ■ | नी | र | ■ | वा | ■ | र | ■ |
| र | ■ | ना | म | ■ | स | खा | ■ | ड | ■ | ■ | स | पी | ट |
| वि | स्म | य | ■ | स | व | ल | त | ■ | बा | व | न | क | स |
| ■ | र | क | म | पा | त | ■ | रु | पा | या | ■ | द | ■ | र |
| ऋ | ण | ■ | ल | ट | ■ | बा | ण | ■ | बा | प्पा | ■ | द | ■ |
| ण | ■ | सी | मा | ■ | पा | ठ | ■ | को | प | ■ | स | मा | स |
| को | रा | ■ | स | गो | त्र | ■ | सा | ■ | | ■ | | ■ | |
| ■ | स | म | ■ | पा | ता | ळ | यं | त्री | ■ | दी | ■ | ज | र |
| वि | मा | न | त | ळ | ■ | ■ | का | ■ | प | र | वा | न | गी |
| प्र | था | ■ | ळ | ■ | क | पा | ळ | मो | क्ष | ■ | टा | ■ | त |

# निवडक

## सुनील स्पोर्टस् दुसऱ्या फेरीत



**मुंबई :** सिद्धी प्रभा, शिवशक्ती मंडळ यांच्या बरोबर सुनील स्पोर्टस् ने 'सुवर्ण चढाईत', तर गुड मॉर्निंगने ५-५ चढाईत आंबेकर चषक पुरुष प्रथम श्रेणी गटात दुसरी फेरी गाठली. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मुंबई यांच्या विद्यमाने ग. दि. आंबेकर सप्ताहनिमित्त अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे विविध गटातील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या सामन्यात सुनील स्पोर्टस्ने 'सुवर्ण चढाईत' विजय क्लबला ३५-३४ असे चकविले. पूर्वार्धात सुनीलकडे २२-१० अशी आघाडी होती. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात विजय क्लबने पूर्ण डावात ३१-३१ अशी बरोबरी साधली. ५-५ चढायांचा डाव देखील बरोबरीत सुटला. शेवटी सुवर्ण चढाईकरिता नाणेफेक करण्यात आली. ती सुनीलने जिंकली व चढाईत गुण घेत संघाला दुसरी फेरी गाठवून दिली. रोहन जाधव, शोहेब मुल्ला सुनीलकडून, तर राज नाटेकर विजयकडून उत्कृष्ट खेळले.

## एंजल पारचेची नॅशनलसाठी निवड



**नवीन पनवेल :** डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेने क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. शाळेचे क्रीडा शिक्षक कांतीलाल पाटील यांची नुकतीच नॅशनल कोच म्हणून निवड झाली असून, बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांना सक्षम खेळाडू म्हणून घडविण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. अहमदनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेत शाळेतील विद्यार्थिनी एंजल पारचे हिने उत्कृष्ट कामगिरी करत नॅशनल सायकलिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तसेच या स्पर्धेत नेहाला चोरघे याने कठीण स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकवून शाळेच्या क्रीडा कामगिरीत भर घातली.

## कुंभार करणार विभागाचे प्रतिनिधीत्व

**रसायनी :** सर नोबत नेताजी पालकर विद्या मंदिर चौक शाळेचे क्रीडा शिक्षक शरद कुंभार यांची राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुंबई येथे झालेल्या शिक्षक अधिकारी क्रीडा स्पर्धांमध्ये रायगड जिल्हा खो-खो संघाने मुंबई विभागस्तरीय स्पर्धेत मुंबई शहर, ठाणे जिल्हा,



पालघर जिल्हा व मुंबई उपनगर अशा बलाढ्य संघांचा पराभव करत अंतिम विजेतेपद पटकावले आहे. या देदीप्यमान यशाचे शिल्पकार, सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक शाळेतील क्रीडा शिक्षक शरद कुंभार यांच्या कुशल नेतृत्वाखाली रायगड संघाने ही चमकदार कामगिरी केली. विजयी रायगड संघ राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये मुंबई विभागाचे नेतृत्व करणार आहे.

## केवाळे हायस्कुल वार्षिक क्रीडा स्पर्धा



**नवीन पनवेल :** सुधागड एज्यूकेशन सोसायटी पालीचे माध्यमिक विद्यालय केवाळे, विद्यासंकुलामध्ये ९ डिसेंबर रोजी सशालेय वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विदयार्थ्यांच्या शैक्षणिक व शारीरीक ज्ञानात भर होण्यासाठी, तसेच विध्यार्थ्यांचे सात्विक गुणांना वाव आणि मनोबल वाढवण्याच्या दृष्टीने या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या क्रीडा स्पर्धेचे आयोजन शाळेचे मुख्यध्यापक ढोले यांनी केले. त्या प्रसंगी स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन सदस्य मिलन पालकर, योगेश माळी, कृष्णा गायकर, मोहन माळी आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच शाळेचे संस्थापक शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये व अध्यक्ष वसंत वोसवाल यांच्या प्रतिमेचे पूजन करून क्रीडा स्पर्धेला सुरुवात केली.

## कर्जत अभिनव प्रशाला अजिंक्य



**नेरळ :** नेरळ येथील लॉर्ड आयाप्पा एज्युकेशन सोसायटीच्या वतीने जलजादेवी नायर मेमोरियल स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेत कर्जत तालुक्यातील माध्यमिक विद्यालयाचे विद्यर्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेचे सांघिक विजेतेपद कर्जत येथील अभिनव ज्ञान मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी पटकावले. लॉर्ड आयाप्पा एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक जलजादेवी नायर यांच्या स्मृती प्रित्यर्थ नेरळ येथील एलएईएस हायस्कुल आणि ज्युनियर कॉलेज येथे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जलजादेवी नायर मेमोरियल स्पर्धेमध्ये कर्जत तालुक्यातील सर्व माध्यमाइक विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.स्पर्धेचे उद्घाटन एलएईएस शाळेचे मुख्याध्यापिका अजिता नायर यांचे हस्ते झाले. स्पर्धेला गौळवाडी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गालगले यांनी भेट दिली. मोठी आर्थिक आणि सनमानचिन्ह अशा स्वरूपतातील पारितोषिके असल्याने मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा सहभाग या स्पर्धेला लाभला होता.

---

### कनिष्ठ हॉकी विश्वचषक स्पर्धा २०२५

# भारताने जिंकले कांस्यपदक

■ शेवटच्या ११ मिनिटांत ४ गोल
■ अर्जेंटिनाला ४-२ ने हरवले

| चेन्नई | वृत्तसंस्था |

भारताने ९ वर्षांनंतर ज्युनियर हॉकी विश्वचषकात कांस्यपदक जिंकले आहे. ज्युनियर टीम इंडियाने शेवटच्या ११ मिनिटांत ४ गोल करून २०२१ च्या विजेत्या अर्जेंटिनाला ४-२ ने हरवले. दोन वेळा (होबार्ट २००१ आणि लखनऊ २०१६) विश्वविजेत्या भारतीय संघाने शेवटचे पदक २०१६ मध्ये जिंकले होते. मागील २ वेळा संघ कांस्यपदकाच्या लढतीत हरून चौथ्या स्थानावर राहिला होता.





३ क्वार्टरपर्यंत २ गोलने पिछाडीवर पडल्यानंतर भारताने शानदार पुनरागमन केले. टीम इंडियाने शेवटच्या ११ मिनिटांत ४ गोल करून गर्दीने भरलेल्या मेयर राधाकृष्णन स्टेडियममध्ये जणू प्राण फुंकले.भारतासाठी अंकित पाल (४९वे), मनमीत सिंग (५२वे), शारदानंद तिवारी (५७वे) आणि अनमोल इक्का (५८वे) यांनी गोल केले. तर, अर्जेंटिनाच्या निकोलस रॉड्रिगेज (पाचवे) आणि सँटियागो फर्नांडिस (४४वे) यांनी गोल केले.

कांस्यपदक जिंकल्यानंतर हॉकी इंडियाने ज्युनियर टीम इंडियाच्या प्रत्येक खेळाडूला ५-५ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा केली. इतकंच नाही तर, हॉकी इंडियाने सपोर्ट स्टाफला २.५ लाख रुपये देण्याची घोषणा केली.आधी ४९व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरला अंकितने गोलमध्ये बदलून भारताचे खाते उघडले. ५२व्या मिनिटाला भारताला पुन्हा पेनल्टी कॉर्नर मिळाला, ज्यावर अनमोल इक्काच्या शॉटवर चेंडू डिफ्लेक्ट होऊन मनमीतच्या स्टिकला लागून गोलमध्ये गेला.

स्कोअर २-२ ने बरोबरीत सुटल्यानंतर सामना शूटआउटमध्ये जाईल असे वाटत होते, पण अंतिम शिट्टी वाजायला तीन मिनिटे बाकी असताना भारताला महत्त्वाचा पेनल्टी स्ट्रोक मिळाला, जो शारदानंद तिवारीने गोलमध्ये रूपांतरित करून पहिल्यांदा भारताला आघाडी मिळवून दिली. पुढच्याच मिनिटाला अर्जेंटिनाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण गोलकीपर प्रिन्सदीप सिंगने पुन्हा एकदा उत्कृष्ट बचाव केला. भारताला ५८व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरचे अनमोल इक्काने गोलमध्ये रूपांतर केले.

पहिल्या तिसऱ्या मिनिटातच गोल गमावल्याने भारतीय संघ पहिल्या संपूर्ण क्वार्टरमध्ये दबावाखाली दिसला. स्पर्धेच्या राउंड रॉबिन टप्प्यात २९ गोल करणाऱ्या यजमान संघ अर्जेंटिनाविरुद्ध गोल करण्यासाठी झगडताना दिसला. मागील सामन्यात जर्मनीने त्यांची फॉरवर्ड लाईन रोखून धरली होती, तर या सामन्यात पहिल्या हाफमध्ये अर्जेंटिनाच्या गोलमध्ये जास्त घुसता आले नाही. एकही पेनल्टी कॉर्नर मिळवण्यात अपयशी ठरले.

सामना सुरू होताच अनमोल इक्काच्या चुकीमुळे अर्जेंटिनाला पेनल्टी स्ट्रोक मिळाला, जो निकोलस रॉड्रिगेजने गोलमध्ये रूपांतरित करून मेयर राधाकृष्णन स्टेडियमवर मोठ्या संख्येने जमलेल्या प्रेक्षकांना निराशा झाली.

पहिल्या क्वार्टरच्या शेवटच्या मिनिटात भारताला बरोबरी साधण्याची संधी मिळाली, जेव्हा आमिर अलीकडून चेंडू घेऊन सौरभ आनंद कुशवाहा पुढे सरकला आणि अंकित पालला चेंडू दिला, पण अजित यादव हा डाव पूर्ण करण्यात अपयशी ठरला.

सँटियागो फर्नांडिसने (४४ वे) गोल केला. तिसरा क्वार्टर संपायला एक मिनिट बाकी असताना सँटियागो फर्नांडिसने भारतीय बचावाला पूर्णपणे चकमा देऊन गोलच्या डाव्या बाजूने अचूक शॉट मारून चेंडू गोलपोस्टमध्ये टाकला.

---

## रायगड तायक्कॉंडो असोसिएशनचा राज्यस्तरीय सुवर्णसोहळा

| चिरनेर | प्रतिनिधी |

लातूर येथे झालेल्या ३५व्या क्योरगी व ११व्या पूम्से महाराष्ट्र राज्य वरिष्ठ तायक्कॉंडो स्पर्धा २०२५ मध्ये रायगड तायक्कॉंडो असोसिएशनच्या वरिष्ठ संघाने चमकदार कामगिरी करत एकूण १३ सुवर्ण, ८ रौप्य आणि १ कांस्य पदक जिंकत पूम्से विभागात एकूण प्रथम क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी आपल्या नावे केली.

३० वर्षांखालील गट व्यक्तिगतमध्ये शुभम पोवार रौप्य, सेजल काणेकर कांस्य, मिक्स्ड पेअरमध्ये सनी पासवान, रतिका अहुजा यांना रौप्य, ग्रुप पुरुष मध्ये शुभम पोवार, दिनेश म्हात्रे, सोहम कुरघोडे यांना रौप्य, ग्रुप महिला मध्ये सेजल काणेकर, अनन्या चितळे, गायत्री महाजन यांना सुवर्ण, ४० वर्षांखालील गटामधील व्यक्तिगतमध्ये प्रशांत घरत सुवर्ण, प्राजक्ता प्रकाश अंकोलेकर सुवर्ण, मिक्स्ड पेअर मध्यये प्रशांत घरत, मुग्धा भोसले यांना सुवर्ण, फ्रीस्टाईल पूम्से गटात व्यक्तिगतमध्ये सनी पासवान सुवर्ण, मिक्स्ड ग्रुपमध्ये राज बादल, दक्षय थोंबरे, तनिष कोनकर, भाग्यश्री भोंडवे, रुतुजा टुपसुंदर यांनी सुवर्णपदक पटकावले. रायगड तायक्कॉंडो असोसिएशनने पूम्से चॅम्पियनशिपमध्ये एकूण प्रथम क्रमांक पटकावून राज्यात भक्कम अस्तित्व सिद्ध केले.

## माणगावच्या मयूर बांगारा याची राज्यस्पर्धेसाठी निवड

| माणगाव | प्रतिनिधी |

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आयोजित फिल्ड कंपाउंड आर्चरी जिल्हास्तरीय स्पर्धा चिंतामणराव केळकर विद्यालय अलिबाग येथे उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत अशोक दादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता ११वी सायन्सचा विद्यार्थी मयूर पांडुरंग बांगारा याने नेम कौशल्याचे अफलातून प्रदर्शन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.



मयूरची कामगिरी इथेच थांबली नाही. पुढे ८ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई, कांदिवली येथे झालेल्या वयोगट १७ वर्षे मुले फिल्ड कंपाउंड आर्चरी विभागीय स्पर्धेतही त्याने प्रथम क्रमांकाची बाजी मारत आपली गुणवत्ता सिद्ध केली. सलग दोन स्पर्धांतील विजयानंतर त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अधिकृत निवड झाली आहे. माणगावातील क्रीडा क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण असून, मयूरच्या या उज्ज्वल कामगिरीचे कौतुक सर्वत्र होत आहे.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीवजी साबळे, सचिव कृष्णा भाई गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, तसेच संस्थेचे सन्माननीय सदस्य माजी आमदार अनिकेतभाई तटकरे, नितीन सेट बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ॲड. विनोद घायाळ,यांनी मयूरचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.अशोक दादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक व प्राचार्य डी. एम. जाधव, उपमुख्याध्यापक उभारे, उपप्राचार्य बिरादार, पर्यवेक्षक सोनावणे यांनी मयूरचे मनापासून अभिनंदन केले.

### सेंट मेरीचे विद्यार्थी चमकले

सेंट मेरीकॉन्व्हेंट स्कुल चेंढरे अलिबाग येथील नववी इयत्तेत शिकणाऱ्या धनुर्धर आशय सुयोग आंग्रे, इयत्ता आठवीमध्ये शिकणारी धनुर्धर तनिषा मंदार वर्तक आणि साई पिळणकर या दोघींची देखील राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

---

## राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा संपन्न

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्गनगरी येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. राज्यभरातून तब्बल ४०० हून अधिक कुस्तीपटूंनी सहभाग नोंदवला. मुंबई विभागातून पुरुष आणि महिला मिळून १० खेळाडूंनी सहभाग घेतला. यामध्ये पोलीस मुख्यालयातील ६ कुस्तीगीरांनी प्रभावी कामगिरी करत एकूण ६ पदके पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यापैकी ३ कुस्तीपटूंची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत सोहम ढगे, वेदांत येळकर, स्वप्निल लावंड यांनी सुवर्णपदक पटकावले. या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. यश घुगे, हृषिराज पाटील, संशिखा शर्मा यांनी कांस्यपदक पटकावले. या सर्व विजेत्यांनी राज्यस्तरावर चमकदार कामगिरी करत मुंबई विभागाचे नाव उज्ज्वल केले आहे.

## इंडियन स्ट्रीट प्रिमीयर लीगमध्ये कर्जतचे दोन खेळाडू

### टेनिस क्रिकेट स्पर्धेत व्यावसायिक खेळाडू म्हणून सन्मान

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत क्रिकेट असोसिएशन यांच्या माध्यमातून टेनिस क्रिकेटला चालना देण्याचा मागील अनेक वर्षे प्रयत्न सुरु आहे. असोसिएशनच्या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे. या असोसिएशन मधील खेळाडू असलेल्या दोघा क्रिकेटपटू यांना इंडियन स्ट्रीट प्रिमीयर लीगमध्ये संधी मिळाली आहे.कडाव येथील नितेश माळी याला तब्बल तीन लेखाला नवी दिल्ली सुपर हिरोज संघाने करारबद्ध केले आहे.तर मागील वर्षाप्रमाणे यंदादेखील उमरोली गावातील साहिल लॉंगले याला देखील आयसीपीएलमध्ये संधी मिळाली आहे.



टेनिस क्रिकेटमध्ये आपले नशीब घडवत असलेल्या क्रिकेटपटूना देशपातळीवर संधी दिली जात आहे. इंडियन क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेत देशभरातील टेनिस क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंचे टॅलेन्ट शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रामीण शहरी भागातील खेळाडूंना संधी देण्यासाठी हि प्रिमीयर लीग भारावली जात असून दिल्ली सुपरहिरोज (सलमान खान) आणि अहमदाबाद लायन्स (अजय देवगण) हे दोन नवीन संघ सहभागी झाले आहेत. हे संघ विद्यमान टीम्ससोबत स्पर्धा करतील, ज्यात बचावात्मक विजेते माझी मुंबई (अमिताभ बच्चन), टायगर्स ऑफ कोलकाता (सैफ अली खान करीना कपूर खान), श्रीनगर के वीर (अक्षय कुमार), चेन्नई सिंगम्स (सूर्या), बेंगळुरू स्ट्रायकर्स (हृतिक रोशन) आणि फाल्कन रायझर्स हैदराबाद (राम चरण) यांचे संघ सहभागी झाले आहेत.

आयएसपीएलच्या सिझन तीनमध्ये कर्जत तालुक्यातील दोन उभरत्या खेळाडुंचे भविष्य उजळले आहे. मागील वर्षाप्रमाणे उमरोली गावातील साहिल लॉंगले याला करारबद्ध केले आहे. तर यावर्षी कडवं गावातील शिवशक्ती क्रिकेट संघाचा खेळाडू नितेश गजानन माळी या खेळाडूला नवी दलाली सुपर हिरोज या संघाने करारबद्ध केले आहे.

## गुरुकुल तायक्कांदो अकॅडमीचे घवघवीत यश




| रसायनी | प्रतिनिधी |

विभागीय क्रीडा संकुल, नाशिक येथे पाच दिवसीय महाराष्ट्र राज्यस्तरीय खुली तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धा संपन्न झाली.

स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील गुरुकुल तायक्कांदो अकॅडमीने उत्कृष्ट कामगिरी करत ३ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्य पदके जिंकली. यामध्ये श्रवण भोसले, ओमकार भोसले, वियोना थेस्मा यांनी सुवर्ण पदक पटकावले. रेहान सय्यद, मोहित गांधी यांनी रौप्यपदक पटकावले. सिद्धार्थ शाही, प्रणूशा रावत, संस्कृती जांभळे यांनी कांस्यपदक पटकावले. वेदश्री भोर, अंश मोरे, धुर्वी पाटोळ यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला.

ही स्पर्धा जागतिक तायक्कांदो संघटनेची संलग्न असलेल्या इंडिया तायक्कांडो या राष्ट्रीय संघटनेची संलग्न व महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनने आयोजित केली होती.

---

राजश्री मिसाळ यांच्या हस्ते दिपप्रज्वलन | २४ संघांमध्ये रंगणार सामने

# बोर्ली येथे मुरुड प्रिमिअर लीगच्या खेळाडूंचा लिलाव

| रेवदंडा | प्रतिनिधी |

शिवसेना उबाठा उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ पुरस्कृत मुरूड तालुका टेनिस बॉल क्रिकेट मर्यादीत षटकांच्या प्रिमिअर लीगचा भव्य ऑक्शन सोहळा मोठ्या जल्लोषात नजमा हॉल बोर्ली येथे संपन्न झाला.

शिवसेना उबाठा उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ पुरस्कृत मुरूड तालुका टेनिस बॉल क्रिकेट मर्यादीत षटकांच्या प्रिमिअर लीग स्पर्धा दि. २८,२९,३०,३१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजीत करण्यात आली आहे. या स्पर्धेचा खेळाडू ऑक्शन सोहळा रविवारी (दि. ७) नजमा हॉल बोर्ली येथे घेण्यात आला.



यावेळी शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शिवसेना उबाठा उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ, माजी जिल्हा परिषद सदस्य राजश्री मिसाळ, वळके ग्रा.प.माजी सरपंच किशोर काजारे, सनी ठाकूर, शिवसेना मुरूड तालुका प्रमुख निलेश घाटवळ आदी मान्यवराची उपस्थिती होती. मुरूड प्रिमिअर लीग ऑक्शन सोहळ्याचा शुभारंभ माजी जिल्हा परिषद सदस्या राजश्री मिसाळ यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंलचन व खेळाडू ऑक्शन समालोचन वेदांत कंटक यांनी केले.

मुरूड प्रिमिअर लीग स्पर्धेत एकूण २४ संघ खेळविण्यात येत आहेत, यामध्ये सिध्दी इलेव्हन काशिद आकाश महाडिक, वन फॅमिली सर्वे निखिल धार्वे, आई एकविरा बोर्ली सुनिल पाटील, इगल ११ येसदे कृतार्थ चवरकर, युवी स्पोटर्स सुरई राज पाटील, तुळजा भवानी कोर्लई शिवतेज पाटील, युवा सरपंच जम्बो, शंभुराजे ताडवाडी सनी डोलकर, लबैक मांडळाफहाद कळबसकर, राध्या ११ साळाव अक्षय कांबळी, वन सोल्युशन कोर्लई जयेश म्हात्रे, पठाण ११ कोर्लई उमेश घाणेकर, जन्नत मांडळा प्रज्वल पालवणकर, दाब धाबा तळेखार नितू भुरे, भाई ११ तळेखार विजय घाणेकर, पि.पि. स्पोर्ट्स मिठेखार तेजस काटकर, दक्ष ११ बारशीव निलेश किंजले, गुरू इलेव्हन चेहेर निशांत पालवणकर, एस. के. कंस्ट्रशन मजगाव पराग खोत, वाघोबा मुरूड दिवेश ब्रावो, प्रदिप रामा खेडेकर पुरस्कृत खेडेकर ११ चिकणी विकास खेडेकर, जंजिरा पांईट मुरूड खारआंबोली हुसेन टाकी, अजिक्य ११ बोर्ली राज धार्वे, राज ११ आगरदांडा आशिष चिंदरकर या टिम व कर्णधार यांच्या सहभाग आहे. शिवसेना उबाठा उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ पुरस्कृत मुरूड तालुका टेनिस बॉल क्रिकेट मर्यादीत षटकांच्या प्रिमिअर लीग स्पर्धेत प्रथम क्रमांकास भव्य चषक व रोख रक्कम १ लाख रूपये, द्वितीय क्रमांकास भव्य चषक व रोख रक्कम ५० हजार रूपये, तृतीय क्रमांकास भव्य चषक व ३५ हजार रूपये तसेच सर्वोकृष्ट खेळाडूस मोटर सायकल, उत्कृष्ट संघमालक मोटर सायकल व सामनावीर, उत्कृष्ट गोलदांज व फलदांज यांना बक्षिसे दिली जातील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)